सोमवार
१
सप्टेंबर २०२५

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १८०
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत



गौरी गणपतीच्या आगमना,
सजली अवघी धरती, सोनपावलांच्या रुपाने
ती येवो आपल्या घरी, होवो आपली प्रगती,
लाभो आपणास सुख समृद्धी




# मराठा बांधवांना 'सरसकट कुणबी' संबोधण्यास न्यायालयांनी दिला होता नकार!

**मुंबई: दि. ३१** वृत्तसंस्था

ऐन गणेशोत्सवात मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून राज्याचे राजकारण ढवळून निघाले आहे. मनोज जरांगे यांचे मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण सुरु आहे. मात्र मराठा बांधवांना 'सरसकट कुणबी' संबोधण्यासंर्भात उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल या मार्गातील सर्वात मोठे अडसर आहे. बाळासाहेब रंगनाथ चव्हाण यांना जात




पडताळणी समितीने २००१ मध्ये कुणबी प्रमाणपत्र दिले होते. त्यांना मिळालेल्या कुणबी प्रमाणपत्रावर जगन्नाथ होले यांनी तक्रार दाखल केली होती. त्यांना दाद न मिळाल्याने होले यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. यात महाराष्ट्र शासन आणि बाळासाहेब चव्हाण यांना प्रतिवादी करण्यात आले होते. या प्रकरणी १७ ऑक्टोबर २००३ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी. एच. मार्लापल्ले आणि न्या. ए. एस. बग्गा यांच्या खंडपीठाने निकाला दिला. न्यायालयाने या आदेशातील परिच्छेद १७ मध्ये म्हटले आहे की, या प्रकरणात सदर प्रमाणपत्र मान्य केले तर महाराष्ट्रात संपूर्ण मराठा समाज हा कुणबी म्हणून स्वीकारावा लागेल आणि असे झाले तर तो सामाजिक मूर्खपणा (सोशल ॲब्सर्डिटी) ठरेल. बाळासाहेब चव्हाण यांनी उच्च न्यायालयाच्या निकालास सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. बी. एन. अग्रवाल आणि न्या. पी. के. बालसुब्रमण्यम यांच्या खंडपीठाने १५ एप्रिल २००५ रोजी हे प्रकरण निकाली काढताना मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय योग्य (पान २ वर)

### कुणबी प्रमाणपत्र देणे हे सामाजिक मूर्खपणा

मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या निकालांमुळे सरसकट कुणबी प्रमाणपत्र देणे कठीण असल्याचे यात म्हटले आहे. या निकालांचा संदर्भ म्हणून बाळासाहेब चव्हाण आणि सुहास दशरथे यांच्या प्रकरणांचा उल्लेख केला आहे. उच्च न्यायालयाने सरसकट कुणबी प्रमाणपत्र देणे हे सामाजिक मूर्खपणा आणि महाराष्ट्रातील सामाजिक वास्तवाच्या विरोधात असल्याचे म्हटले होते आणि सर्वोच्च न्यायालयानेही हा निर्णय योग्य ठरवला होता.

# आरक्षणाची विजयी यात्रा नाहीतर माझी अंत्ययात्रा!

## मनोज जरांगे यांचा सरकारला इशारा

**मुंबई: दि. ३१** वृत्तसंस्था

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आक्रमक झालेले आंदोलक नेते मनोज जरांगे-पाटील यांनी मुंबईत आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी सरकारला स्पष्ट शब्दांत इशारा देत आरक्षणासाठी निर्णायक लढ्याची घोषणा केली. 'मुंबईतून एकतर आरक्षणाची विजयी यात्रा निघेल किंवा माझी अंत्ययात्रा,' अशा शब्दांत जरांगे यांनी आपली भूमिका ठामपणे मांडली.**



मराठा समाजाला आरक्षण दिलं नसल्याने प्रचंड मोठी वेदना आहे. मुंबईत मराठा बांधवांची केवळ गर्दी झाली आहे, असे सरकारने समजू नये, तर वेदना समजावी. उद्यापासून पाणीही बंद करणार आहे. आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असा इशारा मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज राज्य सरकारला दिला. ते आझाद मैदानावर पत्रकार परिषदेत बोलत होते.
मराठा मोर्चा आणि आर क्षणाबाबत सर्व गोष्टींची उत्तरे एकनाथ शिंदेच देऊ शकतील. मनोज जरांगे (पान २ वर)

### मराठा आंदोलकांचा सुप्रिया सुळेंना घेराव, बॉटल फेकल्या!



राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे या मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी मुंबईच्या आझाद मैदानावर दाखल झाल्या. या भेटीत त्यांनी जरांगे यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. मात्र, यावेळी सुप्रिया सुळे या आझाद मैदानावरून निघत असताना त्यांची गाडी मराठा आंदोलकांनी अडवल्याचा प्रकार घडला. यावेळी सुप्रिया सुळे यांना मराठा आंदोलकांनी घेराव घातला होता. मराठा आंदोलकांनी सुप्रिया सुळे (पान २ वर)

### सामाजिक संतुलनाचा मोठा प्रश्न- फडणवीस



दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षणाच्या प्रश्नावर महत्त्वाची टिप्पणी केली आहे. ते म्हणाले, आम्ही चर्चेतून मार्ग काढण्याचा आणि कायदेशीर मार्गाने आरक्षणाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत आहोत. फडणवीस म्हणाले, मनोज जरांगे ज्या काही मागण्या करत आहेत त्याकडे आमचं सरकार सकारात्मकतेने पाहात आहे. कुठलीही मागणी मान्य करायची असेल तर ती कायद्याच्या चौकटीत बसली पाहिजे. मराठ्यांचा सरसकट ओबीसीत समावेश करा ही त्यांची मागणी आहे. परंतु, त्यासमोर (पान २ वर)



### मराठा आंदोलकांची 'सीएसएमटी' स्थानकावर गर्दी कायम

मराठा आंदोलकांची छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावर (सीएसएमटी) गर्दी कायम आहे. बहुसंख्य आंदोलकांकडून घोषणाबाजी सुरु असून हलगीच्या तालावर मनसोक्तपणे नाचण्याचा आनंदही लुटला जात आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मराठा आंदोलक मुंबईत दाखल झाले आहेत. अनेकांनी विश्रांती व रात्रीच्या मुक्कामासाठी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकाचा आधार घेतला आहे. तसेच अनेकजण भुयारी मार्गावरही विश्रांती घेत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावर गजबजाट (पान २ वर)

### मराठा आरक्षणासंदर्भात महाधिवक्तांसोबत चर्चा - विखे पाटील



मराठा आरक्षणाबाबत मनोज जरांगे-पाटील यांनी केलेल्या मागण्यांबाबत आज (दि. ३१) पुन्हा एकदा चर्चा झाली. या प्रश्नी कोणत्या स्वरुपाचा मार्ग काढता येईल यावरही चर्चा झाली. आता याप्रश्नी महाधिवक्तांसोबत चर्चा करण्यात येणार आहे. आवश्यक असल्यास मत्रीमंडळ उपसमितीची पुन्हा बैठक होणार आहे, अशी माहिती मराठा आरक्षण (पान २ वर)

### मनोज जरांगे हुकूमशहाप्रमाणे वागतोय-हाके

**मुंबई: दि. ३१** वृत्तसंस्था

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदानात गेल्या तीन दिवसांपासून आंदोलन सुरू केले आहे. इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गातूनच मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या त्यांच्या मागणीमुळे ओबीसी समाजात अस्वस्थता पसरली आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी जरांगे यांच्यावर जोरदार टीका करताना, त्यांच्या मागणीमुळे ओबीसी आरक्षण धोक्यात येईल, अशी भीती व्यक्त केली आहे.



लक्ष्मण हाके यांनी जरांगे यांच्यावर गंभीर आरोप केले. ते म्हणाले, मनोज जरांगे यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. ते संविधान, न्यायालय आणि शासन-प्रशासनाला मानत नाहीत. झुंड जमवून ते हुकूमशहासारखे वागत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेसमोर बसून ते समाजात दहशत निर्माण करत आहेत. त्यांचा इतिहास दंगलीचा आहे. त्यांना कायदा, लोकशाही आणि संविधानाची जाण नाही, हाके यांनी सरकारला जरांगे यांना मुंबईत (पान २ वर)

## महत्त्वाचे

### स्वबळाचा नारा दिला नाही- पवार



**पुणे:** पुणे महानगरपालिकेची प्रभाग रचना जाहीर झाली असून कार्यकर्त्यांनी स्वबळाचा नारा देण्यास सुरुवात केली आहे. परंतू, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'आपण स्वबळाचा नारा दिला नाही', अशी स्पष्टोक्ती दिली. प्रभागरचनेबाबत अंतिम चित्र निर्माण झाल्यानंतर महायुती म्हणून आम्ही तिघे बसून कोणत्या शहरात, ग्रामीण भागात कशा पद्धतीने निवडणुका लढवायच्या याबाबत निर्णय घेऊ, अशा शब्दांत पवार यांनी निवडणुकांबाबत भूमिका स्पष्ट केली.

### शरद पवारांच्या घराबाहेर सुरक्षा वाढविली



**मुंबई :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आज मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी आझाद मैदान येथे गेल्या. यावेळी आंदोलकांनी त्यांना घेराव घातला. आंदोलकांनी सुप्रिया सुळे यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. आक्रमक आंदोलकांनी सुप्रिया सुळे यांच्या गाडीवर बाटल्या फेकल्या. या घटनेनंतर आता सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली आहे. सुप्रिया सुळे यांच्यासोबत घडलेल्या घटनेनंतर मुंबई पोलिसांनी सुरक्षा वाढवली आहे.

### राज ठाकरेंनी पूर्ण माहिती घ्यायला हवी



**मुंबई :** हजारोंच्या संख्येने मराठा आंदोलक मुंबईत दाखल झाल्यामुळे मुंबईची वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली होती. मराठा आंदोलक पुन्हा मुंबईला का आले? हे एकनाथ शिंदेंना विचारा. सर्व प्रश्नांची उत्तरं तेच देतील, असं राज ठाकरे यांनी म्हटलं होतं. त्यांच्या या वक्तव्याला आता एकनाथ शिंदे यांनी उत्तर देत राज ठाकरेंनी पूर्ण माहिती घ्यायला हवी होती, असं म्हटलं आहे. खरं म्हणजे आरक्षण कोणामुळे गेलं? त्यांना राज ठाकरेंनी प्रश्न विचारायला पाहिजे होते. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने दिलेलं आरक्षण आम्ही उच्च न्यायालयात टिकवलं होतं. मात्र, तुम्हाला ते आरक्षण का टिकवता आलं नाही? असा प्रश्न तत्कालीन मुख्यमंत्री आणि त्यांच्या सरकारला राज ठाकरेंनी विचारायला हवा होता, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

# अभिनेत्री प्रिया मराठेची अकाली एक्झिट!

## अखेर कॅन्सरशी झुंज ठरली अपयशी

**मुंबई: दि. ३१** वृत्तसंस्था

कलाविश्वातून अत्यंत दुःखद बातमी समोर आली आहे. पवित्र रिश्ता आणि अनेक मराठी हिंदी मालिकांमध्ये काम करणारी अभिनेत्री प्रिया मराठेचं निधन झालं आहे. तिने अवघ्या ३८ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला आहे. अखेर तिची कॅन्सरची झुंज अपयशी ठरली आहे. आज रविवारी पहाटे चार वाजता तिच्या निधन झाल्याची बातमी समोर आली आहे. तिच्या निधनाच्या बातमीने कलाविश्वावर शोककळा पसरली आहे.
संध्याकाळी चार वाजता तिच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले अशी माहिती सुत्रांनी दिली



आहे. 'पवित्र रिश्ता', 'साथ निभाना साथियाँ', 'तुझेच मी गीत गात आहे' अशा मालिकांमधून प्रियाने लोकप्रियता मिळवली आहे. तिच्या अकाली जाण्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. गेल्या वर्षभरापासून प्रिया लाइमलाइटपासून दूरच होती. तसेच ती सोशल (पान २ वर)

# १ सप्टेंबरपासून ७ मोठे नियम बदलणार

## सर्वसामान्यांच्या खिशाला लागणार कात्री

**नवी दिल्ली: दि. ३१** वृत्तसंस्था

दरवर्षीप्रमाणे सप्टेंबरपासून काही मोठे बदल होणार आहेत, ज्याचा सामान्य लोकांच्या आर्थिक जीवनावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सप्टेंबरमध्ये आधार कार्ड अपडेट, आयटीआर, यूपीएस आणि क्रेडिट कार्डच्या नियमांमध्ये बदल होणार आहेत. तसेच, दर महिन्याप्रमाणे एलपीजी गॅसच्या किमतींवरही परिणाम होऊ शकतो. जेट इंधन आणि सीएनजी-पीएनजीच्या किमतीत बदल होऊ शकतो.
आयकर विभागाने आयटीआर दाखल करण्याची शेवटची तारीख ३० जुलै वरून १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत वाढवली होती, ज्यामुळे करदात्यांना रिटर्न दाखल करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळाला होता, परंतु आता ही वेळ या महिन्यात संपेल. अशा परिस्थितीत, तुम्हाला १५ सप्टेंबरपूर्वी आयटीआर दाखल करावे लागेल. अन्यथा, सूचना येऊ शकते. राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (पान २ वर)






### एलपीजी सिलिंडरची किंमत

प्रत्येक महिन्याप्रमाणे, १ सप्टेंबरपासून एलपीजी सिलिंडरची किंमत देखील बदलू शकते. गेल्या अनेक महिन्यांपासून व्यावसायिक सिलिंडरची किंमत बदलत आहे. गेल्या महिन्यातही व्यावसायिक सिलिंडरच्या किमतीत बदल झाला होता. ऑगस्टमध्ये, व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत ३३.५० रुपयांनी कमी करण्यात आली होती आणि दिल्लीत १९ किलो एलपीजी सिलिंडरची किंमत १,६३१.५० रुपये झाली. दिल्लीत एलपीजी सिलिंडरची किंमत ८५३ रुपये आहे, जी ८ एप्रिल २०२५ पासून बदललेली नाही.

# घटनादुरुस्ती करून महाराष्ट्रातही मराठा आरक्षण शक्य- शरद पवार

**अहिल्यानगर:दि. ३१** वृत्तसंस्था

तामिळनाडूमध्ये जर ७२ टक्के आरक्षण देता येऊ शकते, तर राज्यघटनेत बदल करून महाराष्ट्रातील मराठा समाजालाही न्याय देता येऊ शकतो. आरक्षणाचा प्रश्न सोडवायचा असेल, तर घटनादुरुस्ती आवश्यक आहे, असे विधान ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी येथील एका कार्यक्रमात बोलताना केले.
मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील आझाद मैदानात मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरू आहे. यावर पवार यांनी आपली भूमिका मांडली आहे. मराठा आरक्षणप्रश्नी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षांना स्पष्ट भूमिका मांडण्याचे आव्हान दिले होते. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी



स्पष्ट केले की, मराठा समाजाच्या प्रगतीसाठी आरक्षण हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. केंद्र सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन वेळप्रसंगी संसदेत घटनादुरुस्ती करणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने बावन्न टक्क्यांची आरक्षण मर्यादा घालून दिली असली तरी तामिळनाडूसारख्या राज्यातील ७२ टक्के आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकले. त्यामुळेच महाराष्ट्रात मराठा आरक्षणासाठी ठोस पावले उचलण्याची गरज असल्याचे पवार म्हणाले.

## आदर अन् विश्वासाने संबंध पुढे नेण्यासाठी वचनबद्ध- मोदी

# भारत आणि चीनमध्ये सीमा व्यवस्थापनावर करार

**शांघाय:दि. ३१** वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी संध्याकाळी चीनमधील तियानजिन याठिकाणी पोहोचले आहेत. जागतिक व्यापारातील अशांतता आणि बदलत्या युती दरम्यान, सात वर्षांमध्ये त्यांचा हा पहिलाच चीन दौरा आहे. या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदी यांनी आज त्यांनी राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेतली. दोघांमध्ये जवळपास ४० मिनिटं ही भेट झाली असल्याचे सांगण्यात येत आहे. ही भेट तियानजिन येथे होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) शिखर परिषदेपूर्वी झाली. पंतप्रधान ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत उत्तर चीनमधील तियानजिन येथे होणाऱ्या एससीओ शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत.पंतप्रधान मोदी यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत, 'मी चीनमधील तियानजिनला पोहोचलो आहे. एससीओ शिखर परिषदेत चर्चा आणि विविध जागतिक नेत्यांना भेटण्याची उत्सुकता आहे.' दोन्ही नेत्यांची बैठक स्थानिक वेळेनुसार दुपारी १२ वाजता (भारतीय वेळेनुसार सकाळी ९:३०) सुरू झाली. एससीओ शिखर परिषदेदरम्यान शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, भारत आणि चीनमध्ये सीमा व्यवस्थापनावर करार झाला आहे, कैलास मानसरोवर यात्रा आणि थेट उड्डाणांवरही प्रगती झाली आहे. २.८ अब्ज लोक याशी जोडले गेले आहेत आणि संपूर्ण मानवतेला त्याचा फायदा होईल.''असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. त्यांनी परस्पर आदर आणि विश्वास वाढवण्यावर भर दिला. त्यासोबतच एससीओच्या यशस्वी अध्यक्षपदाबद्दल चीनचे अभिनंदन केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, दोन्ही देश एकमेकांच्या संवेदनशीलतेचा आदर करतात आणि संबंध पुढे नेण्यासाठी वचनबद्ध आहेत.



### मोदी आणि पुतिन यांच्यात द्विपक्षीय बैठक

साधारणपणे, बहुपक्षीय परिषदेत यजमान देशासोबत द्विपक्षीय बैठक होणे असामान्य नाही, परंतु मोदी-शी भेट विशेष मानली जाते कारण अलीकडेच अमेरिका आणि भारत यांच्यातील संबंध बिघडले आहेत. रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी भारतावर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ५० टक्के कर लादला आहे. १ सप्टेंबर रोजी पंतप्रधान मोदी आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यात द्विपक्षीय बैठकही होऊ शकते.

# ओडिशामध्ये ईडीची मोठी कारवाई

## १३९६ कोटींच्या कर्ज घोटाळ्याचा केला खुलासा

**भुवनेश्वर :दि. ३१** वृत्तसंस्था

ओडिशातील अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) शनिवारी मनी लॉंड्रिंगच्या चौकशीअंतर्गत एक मोठी कारवाई केली आणि कोट्यवधी रुपयांच्या मालमत्ता, लक्झरी वाहने आणि दागिने जप्त केले. शक्ती रंजन दास यांच्या घरावर आणि त्यांच्या कंपन्यांच्या अनमोल माइन्स प्रायव्हेट लिमिटेड आणि अनमोल रिसोर्सेसच्या कार्यालयांवर छापा टाकण्यात आला. हे प्रकरण देशातील मोठ्या बँक फसवणुकीच्या प्रकरणांपैकी एक आहे. ईडीची ही कारवाई देशातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या बँक फसवणुकीच्या प्रकरणांपैकी एक असलेल्या इंडियन टेक्नोमॅक कंपनी लिमिटेडशी संबंधित आहे. २००९ ते २०१३ दरम्यान, आयटीसीओएल आणि त्यांच्या संचालकांनी ( पान २ वर)







### लक्झरी जीवनशैलीची झलक

- **ईडीच्या शोधात जप्त केलेल्या मालमत्ता आणि वस्तूंमध्ये महागड्या कार, दागिने आणि रोख रक्कम समाविष्ट आहे.**
- **१० लक्झरी कार आणि ३ सुपरबाईक्स (एकूण किंमत ७ कोटी रुपयांपेक्षा जास्त)**
- **पोर्श केयेन, मर्सिडीज बेंझ, जीएलसी, बीएमडब्ल्यू एक्स७, ऑडी ए३मिनी कूपर होंडा गोल्ड विंग बाईक**
- **१.१२ कोटी रुपयांचे दागिने १३ लाख रुपयांची गुंतवणूक, २ लॉकर**

# पान 1 वरून...

## मराठा बांधवांना 'सरसकट कुणबी'..

असल्याचे म्हटले. तसेच महाराष्ट्रात संपूर्ण मराठा समाज हा कुणबी म्हणून स्वीकारावा लागेल आणि असे झाले तर तो सामाजिक मूर्खपणा (सोशल ॲब्सर्डिटी) ठरेल, हा उच्च न्यायालयाने दिलेला निकालात हस्तक्षेप करण्याची आम्हाला काहीच गरज वाटत नाही, असे स्पष्ट करत बाळासाहेब चव्हाण यांची याचिका फेटाळली होती. कुणबी प्रमाणपत्र प्रकरणी ६ ऑक्टोबर २००२ मुंबई उच्च न्यायालयाने सुहास दशरथे विरुद्ध महाराष्ट्र सरकार यावर निकाल दिला होता. न्या. मार्लापल्ले आणि न्या. एन. व्ही. दाभोळकर यांच्या खंडपीठाने दिलेल्या निकालातील परिच्छेद ४६ मध्ये नमूद करण्यात आले आहे की, कुणबी प्रमाणपत्राबाबत जात पडताळणी समितीकडे मांडण्यात आलेली भूमिका उच्च न्यायालयाने स्वीकारली तर मराठा समाजाच्या प्रत्येक व्यक्तीला कुणबी प्रमाणपत्र द्यावे लागेल. आणि असे केले तर ते महाराष्ट्रातील वास्तविक सामाजिक व्यवस्थेच्या (स्टार्क सोशल रियालिटीज) विरोधात असेल. मराठा बांधवांना 'सरसकट कुणबी' संबोधण्यासंर्भात उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. त्यामुळे आता आता याप्रश्नी आज मराठा आरक्षण मत्रीमंडळ उपसमिती राज्याच्या महाधिवक्तांसोबत चर्चा करणार आहेत. मात्र मराठा बांधवांना 'सरसकट कुणबी' संबोधण्यासंर्भात उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल या मार्गातील सर्वात मोठे अडसर असून, यावर आता राज्य सरकार कसा तोडगा काढणार याकडे राज्यात मराठा बांधवांचे लक्ष वेधले आहे.

## मनोज जरांगे हुकूमशहाप्रमाणे...

येण्यापासून रोखायला हवे होते, असेही मत व्यक्त केले. जरांगे यांनी न्या. शिंदे समितीसोबत झालेल्या पहिल्या फेरीच्या चर्चेतून कोणताही तोडगा न निघाल्याने सरकारसमोर झुकणार नसल्याचा इशारा पत्रकार परिषदेत दिला आहे. यामुळे आंदोलक आणि ओबीसी समाजातील कार्यकर्ते अधिक आक्रमक झाले आहेत. हाके यांनी पुढे सवाल उपस्थित केला, "जरांगे यांच्या मागणीमुळे ओबीसी आरक्षण संपेल, अशी भीती आहे. सरकारला खरंच ओबीसी आरक्षण संपवायचे आहे का? जरांगे यांना पाठिंबा देणाऱ्या नेत्यांनी आणि आमदारांनी आपली भूमिका स्पष्ट करावी. या घडामोडींमुळे मराठा आणि ओबीसी समाजातील तणाव वाढण्याची शक्यता आहे. सरकार यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आरक्षणाची विजयी यात्रा ...

परत का आले याचेही उत्तर एकनाथ शिंदेंना विचारा, अशा शब्दात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला होता. यावर बोलताना जरांगे म्हणाले की, दोघे ठाकरे भाऊ आणि ठाकरे बँड चांगला आहे. पण राज ठाकरे विनाकारण मराठ्यांच्या प्रश्नात पडतात. त्यांना ११ ते १३ आमदार निवडून दिले पण ते पळून गेले. लोकसभेला फडणवीसांनी त्यांचा गेम केला. विधानसभेला मुलाचा पराभव केला. राज ठाकरे म्हणजे मानाला भुकालेलं पोरग आहे. घरी फक्त फडणवीस चहा पिऊन गेलेत तर मग पक्ष बरबाद झाला तरी चालतो, अशा शब्दात जरांगे यांनी राज ठाकरेंवर निशाना साधला. चंद्रकांत पाटील यांनी मुलांसाठी चांगल काम केलं म्हणून त्यांच्यावर बोलायच कमी केलं होतं. उपसमितीचे अध्यक्ष असताना मुख्यमंत्र्यांच्या सांगण्यावरून त्यांनी वैधता थांबवली होती, हे आम्हाला माहिती आहे. त्यांनी यापुढे शांत राहवं, मराठ्यांच्या शिव्या खाऊ नका, असा इशारा जरांगे यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांना दिला. सरकार मागण्यांची अंमलबजावणी करत नाही, त्यामुळे उद्यापासून पाणी बंद करणार. सरकार कितीही अन्याय करूदे मराठा समजाने शांत रहावे, दगडफेक करू नका, तुम्हाला आरक्षण मिळवून दिल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असे आवाहन जरांगे यांनी आंदोलकांना केले.

## मराठा आरक्षणासंदर्भात ...

मत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केली. मराठा सामाजाचे आरक्षण आंदोलन मुंबईत सुरु आहे. मुंबईकरांना त्रास होत आहे. हा जाणीवपूर्वक नाही. एका समाजाचे आपल्या मागण्यासाठीचे आंदोलन रास्तच आहेच. मराठा बांधव आंदोलन करतोय, तो आता अन्य जनतेला त्रास होणार नाही, याची दक्षता घेईल, असा विश्वासही विखे-पाटील यांनी व्यक्त केला.

## मराठा आंदोलकांची 'सीएसएमटी'...

पाहायला मिळत आहे. रविवारच्या सुट्टीचे औचित्य साधून अनेकजण दक्षिण मुंबईतील पर्यटनस्थळी जाण्यासाठी घराबाहेर पडतात. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकामधील गर्दी अधिकच वाढलेली पाहायला मिळत आहे. अनेक मराठा आंदोलक मुंबईतील विविध पर्यटनस्थळांना भेटी देण्यासह लालबाग परळमधील गणेशोत्सव पाहण्यासाठी जात आहेत. त्यामुळे ट्रेनमध्येही मराठा आंदोलकांची गर्दी पाहायला मिळत आहे. बहुसंख्य मराठा आंदोलकांनी जेवणाची स्वतःच व्यवस्था केली असून टेम्पोमधून स्वयंपाकाचे साहित्य, भांडी आणि महिनाभराचा शिधा आणला आहे. अनेकजण टेम्पोतच चहा, खिचडी रांधत आहेत.

## सामाजिक संतुलनाचा मोठा ...

संतुलनाचा मोठा प्रश्न आहे. त्यासाठी आपल्याला न्यायालयासमोर उभं राहावं लागू शकतं. म्हणूनच कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन असा निर्णय घेतला तर तो टिकणार नाही. आपण लोकांना खुश करायला असा निर्णय घेऊ शकतो. परंतु, तो निर्णय टिकणार नाही. असं केल्याने जनतेची फसवणूक होईल.

## मराठा आंदोलकांचा सुप्रिया ...

यांच्या समोर जोरदार घोषणाबाजी देखील गेल्याच्या पाहायला मिळाले. तसेच सुळे यांच्या कारवर काही लोकांनी बॉटलही फेकल्या. हा सर्व प्रकार कॅमेऱ्यात कैद झाला आहे. एका आंदोलकाने तर शरद पवार यांनी मराठ्यांचे वाटोळे केले आहे, असाही आरोप केला. जरांगे पाटील यांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मराठा आरक्षण प्रश्नी राज्य सरकारने तत्काळ निर्णय घ्यावा. मराठा आरक्षण आंदोलनाबाबत सर्वपक्षीय बैठक बोलवण्यात यावी. गरज पडल्यास विधानसभेचे एक दिवसाचे विशेष अधिवेशन घेण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी मराठा समाज आंदोलक मनोज जरांगे आमरण उपोषणाला बसले आहेत.

## १ सप्टेंबरपासून ७ मोठे नियम...

(एनपीएस) अंतर्गत येणाऱ्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना युनिफाइड पेन्शन स्कीम (यूपीएस) निवडण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत वेळ आहे. पूर्वी ही तारीख ३० जून होती, परंतु नंतर ती ३० सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आली. ही सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सुरू केलेली पेन्शन योजना आहे. पोस्ट विभाग १ सप्टेंबर २०२५ पासून देशांतर्गत पोस्टल सेवेचे स्पीड पोस्ट सेवेमध्ये विलीनीकरण करत आहे, म्हणजेच आता काहीतरी फक्त स्पीड पोस्टद्वारे पाठवता येईल, सामान्य पोस्टद्वारे नाही.

## अभिनेत्री प्रिया मराठेची...

मीडियावर सक्रिय नव्हती. प्रिया शेवटची तुझे मी गीत गात आहे, या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. मात्र, तिने मालिका मध्येच सोडली होती. याच कारण तिने आरोग्याच दिलं होतं. प्रसिद्ध अभिनेत्री प्रिया मराठेचं निधन मनाला चटका लावणारं आहे. तिच्या अकाली एक्झिटने सर्वांनाच खूप मोठा धक्का बसला आहे. मनोरंजन विश्वातून अनेकांनी प्रियाच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे. अनेकांनी पोस्ट लिहून तिच्यासोबतच्या आठवणी शेअर केल्या आहेत.

## ओडिशामध्ये ईडीची मोठी कारवाई

बँकांकडून सुमारे १३९६ कोटी रुपयांचे कर्ज फसवणूकीने घेतले. नंतर, त्याचा प्रत्यक्ष वापर लपविण्यासाठी हे पैसे शेल कंपन्यांद्वारे वळवण्यात आले. या प्रकरणात ईडीने आधीच ३१० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे, त्यापैकी २८९ कोटी रुपये एप्रिल २०२५ मध्ये बँकांना परत करण्यात आले. परंतु तपास अजूनही सुरू आहे आणि एजन्सीला संशय आहे की या घोटाळ्याचे थर खोलवर जाऊ शकतात.

# अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघातील शेतीचे पावसाने मोठे नुकसान

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



### अकोट तहसीलदार व कृषी अधिकाऱ्यांचा प्रत्यक्ष दौरा, पंचनामा सुरू

**अकोला, दि. ३१ :** अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघातील ग्राम तरोडा, कावसा, दिनोडा, लोतखेड, वरुड जवळका व खापरवाडी परिसरात झालेल्या जोरदार पावसामुळे शेतजमिनीतील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अनपेक्षित हवामानामुळे शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले असून, तातडीने पंचनामे करून मदत मिळावी अशी मागणी होत आहे. दरम्यान आमदार रणधिर सावरकर यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. परिसरातील शेतकऱ्यांच्या सोबत अकोट तहसीलदार चव्हाण साहेब, कृषी अधिकारी अजित वासेकर, मंडळ अधिकारी व तलाठी यांनी प्रत्यक्ष शेतीत जाऊन नुकसानीचा संयुक्त पाहणी दौरा केला. शेतकऱ्यांनी पावसामुळे उभ्या पिकांचे झालेले नुकसान अधिकाऱ्यांना दाखवून दिले.

या दौऱ्यात स्थानिक शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये संतोष शिवरकर, राजुभाऊ नागमते, विठ्ठल वाकोडे, विजू भाऊ सोळंके, विवेक भरणे, राजेश रावणकर, चेतन डोईफोडे, हरिभाऊ आवारे, अनुप साबळे, विनोद साबळे, संदीप उगले, सोनू ओळंबे, बच्चू पाटील वानखडे, विनोद मंगळे, मंगेश घुले, सुनील राजगुरू, सतीश सावरकर, प्रवीण डिक्कर, पुरुषोत्तम शिरसाट, काशिनाथ हिंगणकर, अरुण भाऊ शेटे, दामोदर थुटे, तुळशीदास नायसे तसेच सरपंच गणेश पडोळे यांचा सहभाग होता. नुकसानीचे पंचनामे लवकरात लवकर पूर्ण करून शेतकऱ्यांना मदत मिळावी, अशी एकमुखाने मागणी उपस्थित शेतकऱ्यांनी केली.

# सावकाराकडे गहाण मिळकतीबाबत दावे दाखल करण्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला , दि. ३१ : जुन्या शहरातील एका अवैध सावकाराकडे गहाण असलेल्या मिळकतीबाबत दावे दाखल करण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक डॉ. प्रवीण लोखंडे यांनी केले आहे.

जिल्हा उपनिबंधक कार्यालयातर्फे दि. ७ फेब्रुवारी २०२४ रोजी राबविलेल्या धाडसत्रात पप्पू उर्फ मनोज वानखडे (जयहिंद चौक, जुने शहर) विनापरवाना सावकारी करताना आढळल्याने कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडे ज्या व्यक्तींनी कर्जाचे तारण म्हणून मालमत्ता गहाण ठेवली होती, त्यांनी लेखी दावा आवश्यक पुराव्यासह करावा. कर्जदाराचे निधन झाले असल्यास वारसांनी दावा करावा. अशा संबंधित व्यक्तींनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार संकुल, आदर्श कॉलनी, अकोला येथे दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वा. ते सायंकाळी ५.३० वा. या वेळेत मालमत्तेच्या कागदपत्रांची पाहणी करावी आणि दि. १० सप्टेंबर ते १९ सप्टेंबर दरम्यान मालमत्तेबाबत दावे सादर करावेत. त्यानंतर आलेल्या दाव्यांचा विचार होणार नाही व मालमत्ता शासनाकडे जमा होईल, असे जिल्हा उपनिबंधकांनी कळवले आहे.

# सामूहिक शेततळ्यासाठी अर्ज करा

### जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांचे आवाहन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. ३१ :** एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानात सामूहिक शेततळे व वैयक्तिक शेततळे अस्तरीकरणासाठी अनुदान मिळण्यासाठी इच्छूकांनी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले आहे.

सामूहित शेततळ्यांत ५ हजार घ. मी. तळ्यासाठी सर्वसाधारण क्षेत्रात ३ लक्ष व अधिसूचित क्षेत्रात ३.७५ लक्ष रू. अर्थसाह्य देय आहे. ३ हजार ५०० घ. मी. तळ्यासाठी सर्वसाधारण क्षेत्रात २.१० लक्ष व अधिसूचित क्षेत्रात २.६२ लक्ष रू. अर्थसाह्य देय आहे.

२ हजार घ.मी. तळ्यासाठी सर्वसाधारण क्षेत्रात १.२० लक्ष व अधिसूचित क्षेत्रात १.५० लक्ष रू. अर्थसाह्य देय आहे. ५०० घ. मी. तळ्यासाठी सर्वसाधारण क्षेत्रात ३० हजार व अधिसूचित क्षेत्रात ३७ हजार रू. अर्थसाह्य देय आहे. वैयक्तिक शेततळे अस्तरीकरणासाठी खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त ७५ हजार रू. साह्य दिले जाईल. इच्छूकांनी महाडीबीटी पोर्टलवर सीएससी केंद्रामार्फत किंवा वैयक्तिकरीत्या ऑनलाईन नोंद करून योजनेचा लाभ घ्यावा.

अधिक माहितीसाठी कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# सोयाबीन येलो मोझाइक बाबत शेतकऱ्यांना बांधावर जाऊन मार्गदर्शन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. ३१ :** शेती करताना शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागत आहे. ऑगस्टच्या प्रारंभीस अतिवृष्टीने उभ्या पिकाची नुकसान झाले तर हे संकट टळट नाही तेच नव्याने सोयाबीन पिकावर येलो मोझॅक या प्रादुर्भावामुळे सोयाबीन पिवळी पडत आहे. फुलोऱ्यात असताना फुले कळ्या शेंगा कोमजून खाली पडत आहे. यासंदर्भात वृत्त प्रसिद्ध होताच कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ अकोला यांनी दखल घेत बोरगाव मंजू मंडळातील शेतीच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान विलास वाशीमकर तालुका कृषी अधिकारी अकोला, डॉ. पी. के . राठोड सहाय्यक प्राध्यापक कीटकशास्त्र विभाग डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, विजय महाजन उपकृषी अधिकारी, अजय देशमुख सहाय्यक कृषी अधिकारी बोरगाव मंजू यांनी सोयाबीन पिकांची संरक्षण व उपाययोजना कीटकनाशके औषधे फवारणी सह उत्पादन वाढ होईल. फवारणी करताना विटा सायपु लि थ्रीन, इमिडाक्लोप्रीड ३५०मिली प्रति हेक्टर फवारणी करावी. या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांच्या बांधावर भेटीदरम्यान बोरगाव मंजू, निपाणा, कुरणखेड आदी परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. महादेव , धनंजय उमाळे योगेश मेहरे, योगेश खानापुरे, प्रकाश दळवी, साखरकर, राजेश गमे, निवाने, शुभम गावंडे, बाळू भागवत, श्याम मस्के इत्यादी शेतकरी बांधव उपस्थित होते.

# कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी मोहीम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि.३१ ;** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (एनएचएम) कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्वाक्षरी मोहीम राबवली. १९ ऑगस्टपासून सुरू असलेले बेमुदत आंदोलन शनिवारीही सुरूच ठेवले असून, आंदोलनकर्त्यांनी मोठा फलक ठेवून त्यावर स्वाक्षऱ्या केल्या तसेच नागरिकांनाही यात सहभागी होण्याचे आवाहन केले.

कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये शासन सेवेत समायोजन, मानधन वाढ, वेतन सुसूत्रीकरण, इन्शुरन्स व ईपीएफ पॉलिसीचा लाभ, तसेच काम करताना अपघाती मृत्यू झाल्यास ५० लाख आणि अपंगत्व आल्यास २५ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान यांचा समावेश आहे. नव्या व जुन्या कर्मचाऱ्यांच्या मानधनामधील तफावत दूर करण्याची मागणीही करण्यात आली. राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समितीच्या म्हणण्यानुसार, शासनाने १४ मार्च २०२४ रोजी १० वर्षांहून अधिक सेवा केलेल्या कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याचा निर्णय जाहीर केला होता. मात्र दीड वर्ष उलटून गेल्यानंतरही त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप समितीने केला.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील स्वाक्षरी मोहिमेत डॉ. रामू नागे, अंकुश गंगाखेडकर, कपिल सिरसाट, नंदन चौरपगार, इम्रान खान, परीमल कुटे, नंदकिशोर कांबळे, सचिन इंगोले, मनोज कडू यांच्यासह संपूर्ण कर्मचारी सहभागी झाले.

# तेलुगु भाषा दिवस उत्साहात साजरा; सेवानिवृत्त सदस्य व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि.३१ :** अखिल भारतीय तेलुगु महासंघाच्या वतीने जिल्हा परिषद कर्मचारी भवन येथे तेलुगु भाषा दिवसाचा भव्य उत्सव उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात श्री मुत्यालम्मा मातांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर प्रास्ताविक होऊन मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.या वेळी सुनील मीद्दे यांनी समाज बांधणीसाठी तेलुगु भाषेचा अधिक वापर व्हावा तसेच भाषा शिकवण्यासाठी स्वतंत्र वर्ग सुरू करण्याची आवश्यकता असल्याचे मत मांडले. सुधीर रोड्डे यांनी समाज संघटित ठेवण्यासाठी संघर्ष करावा लागतो असे मार्गदर्शन केले, तर नरेश मूर्ती यांनीही विचार मांडले. अध्यक्षीय भाषणात हरीश मिरजामले यांनी मागील चार वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने होत असल्याचे सांगितले. "तेलुगु भाषा घराघरात पोहोचली पाहिजे, यासाठी आठवड्यातून किमान एकदा सामूहिक वर्ग व्हावेत," अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.या कार्यक्रमाला नागपूर, अमरावती, यवतमाळ, शेगाव, खामगाव, वाशिम, बुलढाणा, पूर्णा, हिंगोली, जालना आदी जिल्ह्यांतील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.मंचावर हरीश मिरजामले, मधुकर मुत्यालकर, अनिल कोलपेकर, शशिकांत मैनूर, नंदू तेंडुलकर, रमाकांत कोलपेकर, सतीश बिर्ले, सुधीर रोड्डे, नरेश मूर्ती, सुनील मीद्दे व प्रदीप मेटेकर यांची उपस्थिती होती.कार्यक्रमात अखिल भारतीय तेलुगु महासंघाचे पदाधिकारी व कार्यकारिणीतील सेवानिवृत्त सदस्यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देत गौरव करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. दरम्यान युवक-युवती परिचय संमेलनाचाही उपक्रम पार पडला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नंदकिशोर सावलेकर, मनोज गणकर, गणेश भंडारी, सुभाष मूर्ति, उमेश मिरजामले, अंजूबाई सावलेकर, मोहिनीबाई मांडलेकर, रवि नकले, रवि संगेकर, राजेश तेंडुलकर, संजय सावलेकर, नवीन कट्टुकर, देवेंद्र मिरजामले, सुनील अडोनिकर, तनय पालेकर, गणेश जानपागे, राजेश म्यात्रे, प्रवीण सुनके, धीरज जानपागे, जितेंद्र एरले, निशांत मिरजामले, कु. जान्हवी नकले आदींनी परिश्रम घेतले.

# उद्योगांपुढील अडचणी दूर करा -जिल्हाधिकारी वर्षा मीना

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोलो, दि.३१ ;** औद्योगिक वसाहत व विविध उद्योगांपुढील अडचणी दूर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी येथे दिले. जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत उद्योग मित्र समितीची बैठक गुरूवारी झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या. अकोला उद्योजक संघटनेचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचे निकेश गुप्ता, लघुउद्योग भारतीचे अध्यक्ष पंकज बियाणी, महाव्यवस्थापक संतोष बनसोड, महावितरणचे कार्यकारी अभियंता अजितसिंह दिनोरे, एमआयडीसी प्रशासनाचे अधिकारी व उद्योग संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. औद्योगिक संघटनांच्या प्रतिनिधींनी वीज, रस्ते दुरुस्ती, अतिक्रमण सामाईक सुविधा अशा विविध अडचणींची माहिती दिली. त्यांचे तत्काळ निराकरण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी संबंधित यंत्रणांना दिले. त्या म्हणाल्या की, कालमर्यादा निश्चित करून या अडचणींचे निराकरण व्हावे. एकच बाब वारंवार सांगावी लागू नये. उद्योग वृद्धी व रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने उद्योगांपुढील अडचणी वेळीच सोडविणे आवश्यक आहे.

## भरारी

### विदर्भ व इतर भागातील विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन

# होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाची विद्यार्थी क्षमता आता शंभरवर!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला , दि. ३१ :** होमिओपॅथीचा प्रसार व प्रचार करण्या साठी होमिओपॅथी विश्वात शैक्षणिक क्रांती घडविणाऱ्या होमिओपॅथीक एज्युकेशन सोसायटी अकोला द्वारे संचालित राज्यातील सर्वात जुन्या होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालया पैकी एक असणाऱ्या स्थानीय अकोट रोडवरील होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयाची ५० असणारी विद्यार्थी क्षमता आता या शैक्षणिक सत्र पासून १०० झाली असून तशी मान्यता मिळाली असल्याची माहिती महाविद्यालयाच्या वतीने देण्यात आली. यावेळी होमिओपॅथीक एज्युकेशन सोसायटीचे आधुनिक डॉ शिवदास बुटे,सचिव डॉ जयप्रकाश जयस्वाल, संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ तिलकराज सरनायक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजयकुमार तिवारी उपस्थित होते. या महाविद्यालयाचे विद्यार्थी समाजात आपली वैद्यकीय सेवा करून या पॅथीचा प्रचार व प्रसार करीत आहेत. प्रशस्त व दर्जेदार इमारत,अत्याधुनिक व सुसज्ज विभाग, अत्याधुनिक उपकरणांनी सज्ज लॅब, अनाटोमी, फिजिओलॉजी, फार्मसी, होमिओपॅथिक साहित्य, मेडिसिन, पॅथॉलॉजी, फॉरेन्सिक मेडिसिन, गायनाकॉलॉजी, स्ट्रेटीक्स प्रॅक्टिस ऑफ मेडिसिन, कम्युनिटी मेडिसिन ,तसेच रिपोर्टर विभाग हे या महाविद्यालयाच्या जमेच्या बाजू आहेत. विद्यार्थ्यांना अत्याधुनिक उपकरण व द्रुक श्राव्य माध्यमानी वैद्यकीय शिक्षण दिल्या जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. इतकेच नव्हे तर महाविद्यालयातील सर्व वर्गांमध्ये अत्याधुनिक डिजिटल स्मार्ट बोर्ड स्थापित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे वैद्यकीय ज्ञान अधिक चौफेर व अतिप्रगत व्हावे यासाठी महाविद्यालयात ७ हजार पुस्तके असणारी भव्य व सुसज्ज लायब्ररी आहे.या सर्व शैक्षणिक संसाधन व मुबलक उपलब्धतेची दखल घेत केंद्र शासन, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक ने महाविद्यालयास १०० विद्यार्थी क्षमता बहाल केली असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सर्व क्लासेस हे सुसज्ज असून सर्व डिपार्टमेंट शंभर विद्यार्थ्यांच्याा सोयीने बनविलेले आहेत. यात महाविद्यालयाच्या प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे मोलाचे योगदान असून त्यांच्या परिश्रमा मुळेच यावर्षी महाविद्यालयाची इंटेक्स कॅपॅसिटी वाढली आहे. तसेच महाविद्यालयात सुसज्ज हॉस्पिटल निर्माण होत असून महाविद्यालयात अत्याधुनिक सोय सुविधा उपलब्ध करण्यात आल्या असून विदर्भ व इतर भागातील विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य,अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नंदुरबारमध्ये शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचा नदीतून जीवघेणा प्रवास

**नंदुरबार :** राज्यात साक्षरतेच्या बाबतीत सर्वात शेवट असलेल्या नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्यातील आदिवासींच्या शिक्षणाचा प्रश्न सुटता सुटेना अशी अवस्था आहे. रस्ते, पूल नसल्याने विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन शाळेत जावे लागत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. अक्कलकुवा तालुक्यातील मालीआंबा येथील तीन पाड्यातील विद्यार्थ्यांना एक नव्हे तर तब्बल दोन नद्या पार करुन शाळेत जावे लागत आहे. त्यासाठी पालकांनाही धोका पत्करुन आपल्या बाळांना खांद्यावर घेऊन नदी पार करण्याची कसरत करावी लागत आहे. सातपुड्यात अनेक गावांना रस्ते, पूल नाहीत. सरदार सरोवरच्या पाणलोटामुळे काही गावांना टापूचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

## महत्त्वाचे

### 'आमदार पेन्शन'साठी धनखड यांचा अर्ज



**जयपूर :** भारताचे माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राजस्थान विधानसभेचे माजी आमदार म्हणून पेन्शनसाठी अर्ज केला आहे. धनखड हे १९९३ ते १९९८ पर्यंत अजमेर जिल्ह्यातील किशनगढ भागातील आमदार होते.
उपराष्ट्रपतिपद सोडल्यानंतर त्यांनी आता या पेन्शनसाठी औपचारिक अर्ज केला आहे. विधानसभा सचिवालयाने त्यांच्या अर्जावर प्रक्रिया सुरू केली आहे. जगदीप धनखड यांच्या अर्जाची पात्रता तपासणीची प्रक्रिया सध्या सुरू असल्याचे विधानसभा सचिवालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले.जगदीप धनखड यांचे राजकीय जीवन दीर्घ आणि वैविध्यपूर्ण आहे. ते १९८९ ते १९९१ पर्यंत झुंझुनू येथून जनता दलाचे खासदार होते.

### अनेक राज्यांत पावसाचा तडाखा; सात राज्यांत अलर्ट जारी

**देहरादून :** देशातील अनेक राज्यांत गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस होत आहे. त्यात उत्तराखंड, जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशमध्ये पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे भूस्खलन आणि दरडी कोसळण्याच्या घटना घडत आहेत. उत्तराखंडमधील धारचुलामध्ये मुसळधार पावसानंतर चीन सीमेला जोडणाऱ्या तवाघाट-लिपुलेख रस्त्यावर ऐलागड आणि कुलागडजवळ दरड कोसळली. त्यामुळे दारमा, चौदास आणि व्यास या तिन्ही खोऱ्यांचा जिल्हा मुख्यालयाशी संपर्क तुटला आहे. सध्या हवामान विभागाने जम्मू-काश्मीरसह जवळच्या राज्यात पुढील तीन दिवस मुसळधार पाऊस आणि भूस्खलनाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. २ सप्टेंबरपर्यंत पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेशसह सात राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा जारी केला आहे. पुढील सात दिवस उत्तराखंड आणि पूर्व राजस्थानच्या अनेक भागात मुसळधार पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे. धारचुलातील तवाघाट-लिपुलेखसह सोबला रस्ता डोंगर कोसळल्यामुळे बंद करण्यात आला आहे. ढिगारा आणि दरड सतत कोसळत असल्याने वाहतूक ठप्प आहे.

### विद्यालयीन ग्रंथालयांत गोवा देशात प्रथम



**पणजी:** गोवा हे राज्य देशाच्या नकाशात टिंबा एवढे असले तरी वाचनसंस्कृतीत आघाडीवर आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या युनिफाइड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टम फॉर एज्युकेशन प्लसने जाहीर केलेल्या अहवालानुसार देशातील सर्व राज्यांमध्ये गोव्यातील शाळांमध्ये सर्वाधिक पुस्तके आहेत. त्यामुळे देशात गोवा हे शाळांमधील वाचनालयात सर्वाधिक पुस्तके असणारे प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले आहे.२०२२-२०२३ या सालामध्ये राज्यातल्या विविध शाळांच्या वाचनालयात आणि पुस्तक बँकामध्ये ३९ लाख ४६ हजार ६४५ इतकी पुस्तके होती. २०२४-२०२५ या वर्षामध्ये हा आकडा वाढून एकूण ४४ लाख २५ हजार १९४ पुस्तके असल्याची अहवालात नोंद आहे. गेल्या दोन वर्षांत राज्यातील विविध शाळांनी मिळून एकूण २.३८ लाख पुस्तके विकत घेतली आहेत. याचा अर्थ दरवर्षी सरासरी १.१९ लाख पुस्तके शाळेच्या वाचनालयात उपलब्ध झाली आहेत.

## डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताचा आगामी दौरा केला रद्द?

# अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची नाराजी वाढली!

**न्यूयॉर्क : दि.३१ वृत्तसंस्था**

गेल्या काही काळापासून अमेरिका आणि भारताच्या संबंधामध्ये कटुता निर्माण झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतवर लावलेल्या ५०% टॅरिफमुळे हा वादा वाढला आहे. दरम्यान आता ट्रम्प यांनी भारत दौराही रद्द केल्याची माहिती समोर आली आहे. न्यूयॉर्क टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार, डोनाल्ड ट्रम्प भारतात होणाऱ्या क्वाड परिषदेत सहभाग होणार होते. मात्र आता ट्रम्प यांनी हा दिल्ली दौरा रद्द केला आहे. न्यूयॉर्क टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार, ट्रम्प यांच्या कार्यालयाच्या सूत्रांच्या हवाल्याने ही माहिती दिली आहे.
अहवालानुसार, ट्रम्प यांनी यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अमेरिका भेटीदरम्यान वर्षाच्या अखेरीस भारतात येणार असल्याची माहिती दिली होती. पण आता त्यांनी हा दौरा रद्द केला आहे. सध्या यावर दोन्ही देशांकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. पण ट्रम्प यांनी दिल्ली दौरा रद्द केल्याची चर्चा सध्या सर्वत्र सुरु आहे.
यंदा २०२५ च्या अखेरिस क्वाड शिखर परिषदेचे आयोजन भारत करणार आहे. यापूर्वी जानेवारी २०२५ मध्ये अमेरिकेत क्वाडच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक झाली होती. ट्रम्प प्रशासनाने या बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी यंदाची परिषदत भारतात घेण्याचे निश्चित झाले. डिसेंबरमध्ये ही परिषद होणार आहे. पण सध्याचे अमेरिका आणि भारताचे संबंध पाहता ट्रम्प या परिषदेत सहभागी होणार की नाही?असा प्रश्न उपस्थित झाले आहेत. ट्रम्प यांच्या बारतावरील टॅरिफने भारत आणि अमेरिकेचे संबंध ताणले गेले आहेत. दोन्ही देशांमध्ये व्यापारी तणावात वाढ झाली आहे. सध्या ट्रम्प भारतावर रशियाकडून तेल खरेदी थांबवण्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहे. ट्रम्प यांनी सतत भारतावर रशियाला युक्रेनविरुद्धच्या युद्धात आर्थिक मदत केल्याचा आरोप केला आहे.
पण भारताने ट्रम्प यांचे हे आरोप फेटाळत त्यांच्या टॅरिफला तीव्र विरोध केला आहे. शिवाय भारत आणि पाकिस्तान मध्ये अमेरिकेने मध्यस्थी करुन युद्धबंदी केल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आहे.



**न्यूयॉर्क टाईम्सने दिलेल्या अहवालानुसार, ट्रम्प भारताच्या या कृतीवर नाराज आहेत. तसेच त्यांनी पंतप्रधान मोदींनाही कॉल करण्याचा प्रयत्न केला होता. पण पंतप्रधान मोदींनी ट्रम्प यांचा फोन उचलला नाही. यामुळेही ट्रम्प पंतप्रधान मोदींवर नाराज असल्याचे म्हटले जात आहे. तसेच पंतप्रधान मोदी चीनच्या दौऱ्यावर असून यावेळी ते तियानजिनमध्ये होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेत सहभागी झाले आहे. यामुळे देखील ट्रम्प नाराज असल्याचे काही तज्ज्ञांनी म्हटले आहे. यापूर्वी दोन्ही नेत्यांनी १७ जून रोजी फोनवरुन संवाद साधला होता. याच वेळी कॅनडातील -७ परिषदेत दोन्ही नेत्यांची भेट होणार होती. पण ट्रम्प परिषदेतून लवकर परतले. यामुळे ही भेट होऊ शकली नाही.**

मात्र भारताने कोणत्याही तिसऱ्या देशाचा पाकिस्तानसोबतच्या युद्धबंदीत सहभाग नाकारला आहे.

## इस्त्रायलच्या हवाई हल्ल्यात हौथी बंडखोरांचे पंतप्रधान ठार

**कैरो : दि.३१ वृत्तसंस्था**



इस्त्रायलने येमेनची राजधानी सनामध्ये केलेल्या हवा हल्ल्यामध्ये हौथी बंडखोरांच्या नियंत्रणात असलेल्या सरकारचा पंतप्रधान ठार झाले आहेत. इराणचे समर्थन असलेल्या हौथींकडून शनिवारी ही माहिती देण्यात आली. गुरुवारी साना येथे झालेल्या हल्ल्यात अहमद अल-राहवी आणि त्यांच्या अनेक मंत्र्यांचा मृत्यू झाला. या हल्ल्यांमध्ये गटाच्या संरक्षणमंत्र्यांसह उच्च लष्करी अधिकाऱ्यांनाही लक्ष्य करण्यात आले, असे बंडखोरांनी एका निवेदनात म्हटले आहे.
सना येथील त्याच्या अपार्टमेंटवर इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यांमध्ये अल-राहावींचा मध्ये मृत्यू झाला. राजधानी सना बाहेर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कॅबिनेट बैठकीत झालेल्या हल्ल्यांमध्ये हुथी संरक्षण मंत्री मोहम्मद अल-अतिफी आणि चीफ ऑफ स्टाफ मुहम्मद अब्द अल-करीम अल-घमारी यांचा मृत्यू झाला असण्याचा अंदाज इस्त्रायली अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. अल-घमारी यापूर्वी इस्त्रायली हल्ल्यात जखमी झाला होता.
इस्त्रायल अजूनही हौथींच्या आणखी नेत्यांच्या मृत्यूची पुष्टी करता येईल का याचा आढावा घेत आहे. मात्र राहवी ठार झाल्याच्या वृत्ताला इस्त्रायलचे संरक्षण मंत्री इस्त्रायल कात्झ आणि पंतप्रधान बेन्जामिन नेतान्याहू या दोघांनी दुजोरा दिला आहे.

## ५० लाखांचा भत्ता अन् भडकली जनता; इंडोनेशियात अर्थमंत्र्यांच्या घरावर हल्ला



**जकार्ता : दि.३१ वृत्तसंस्था**

इंडोनेशियात गेल्या आठवड्याभरापासून सुरू असलेली जनआक्रोशाची लाट आता हिंसाचाराच्या भीषण वादळात परिवर्तित झाली आहे. महागाई, बेरोजगारी आणि जनतेच्या डोळ्यात अंजन घालणारे राजकीय विशेषाधिकार या तिन्हींचा मिलाफ झाल्याने रस्त्यांवर असंतोषाचा स्फोट झाला आहे. राजधानी जकार्ता पासून सुराबाया, बांडुंग, मकास्सर, योग्याकार्ता आणि अगदी पापुआपर्यंत प्रत्येक शहर निदर्शनांच्या ज्वाळांनी पेटलेले दिसत आहे.
या संतापाची सुरुवात एका धक्कादायक उघडकीमुळे झाली. फक्त पगारच नव्हे तर इंडोनेशियातील ५८० खासदारांना दरमहा तब्बल ५० लाख रुपयांचा घरभत्ता (सुमारे ३,०७५ डॉलर्स) मिळतो, हे समोर आले. हा आकडा राजधानीतील किमान वेतनापेक्षा दहा पटीने अधिक होता. कष्टाने उदरनिर्वाह करणाऱ्या नागरिकांना ही बाब असह्य ठरली. महागाई आणि बेरोजगारीशी झुंज देत असताना राजकीय नेत्यांच्या चैनीला मिळणारा हा ''सुवर्णसिंचन'' म्हणजे जनतेच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखेच ठरले.
निदर्शनांना उग्र वळण मिळाले तेव्हा दृश्यं अधिकच गंभीर होती. दक्षिण टांगेरंग येथे निदर्शकांचा संतप्त जमाव थेट अर्थमंत्री मुलयानी इंद्रावती यांच्या घरावर चालून गेला. त्यांच्या घराच्या सुरक्षेसाठी तैनात सैनिकांवर हल्ला करण्यात आला.

## ऑनलाईन पोर्टलद्वारेच भाडेकराराची नोंदणी करावी लागणार

**पुणे : दि.३१ वृत्तसंस्था**

'लिव्ह अँड लायसन्स' म्हणजेच भाडेकरारच्या ऑनलाईन नोंदणीसाठी सुरू असलेली 'अधिकृत सेवा पुरवठादार' (एएसपी) यांची नियुक्ती तात्काळ प्रभावाने रद्द करण्याचा निर्णय नोंदणी व मुद्रांक विभागाने घेतला आहे. यासंदर्भात नोंदणी महानिरीक्षकांनी परिपत्रक जारी केले आहे. या निर्णयामुळे आता नागरिकांना थेट नोंदणी विभागाच्या ऑनलाईन पोर्टलद्वारेच भाडेकरारची नोंदणी करावी लागणार आहे. २०१४ मध्ये नागरिकांना ऑनलाईन सेवा वापरण्यासाठी तांत्रिक ज्ञानाची कमतरता होती. त्यामुळे अधिकृत सेवा पुरवठादारची नियुक्ती करण्यात आली होती.

# पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावर उलटली बोट

## समुद्रात बुडून ६० हून अधिक लोकांचा मृत्यू

**नवी दिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**

पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावर एक मोठी दुर्घटना घडली आहे. स्थलांतरितांना घेऊन जाणारी एक बोट समुद्रात उलटली. यामुळे ७० जणांचा मृत्यू झाला आहे. मॉरिटानियाच्या किनाऱ्याजवळ ही घटना घडली. या बोटीत एकूण १५० प्रवासी होते. यातील फक्त १६ जणांना वाचवण्यात यश आले. सध्या बेपत्ता लोकांचा शोध घेण्यासाठी बचाव मोहीम सुरु आहे.
स्थानिक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, घटनेची माहिती मिळताच आपत्कालीन सेवांनी घटनास्थळी धाव घेतली. ७० लोकांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. तर इतर बेपत्ता लोकांचा शोध सुरु आहे. बचाव पथकाला १६ जणांना वाचवण्यात यश आले आहे. सध्या मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गेल्या चार दिवसांपासून बेपत्ता लोकांचा शोध सुरु आहे. या संपूर्ण घटनेने पश्चिम आफ्रिकेत भीतीचे वातावरण पसरले आहे.



ही बोट गॅम्बियाहून युरोपला स्थलांतरितांना घेऊन निघाली होती. ही आतापर्यंतची सर्वात भयानक घटना मानली जात आहे.या अपघातामुळे पुन्हा एकदा पश्चिम आफ्रिकेतून स्पेनच्या कॅनरी बेटांवर पोहोचण्याचा प्रयत्न करणाऱ्या धोकादायक मार्गाची भीषणता समोर आली आहे. हा अटलांटिक मार्ग आहे. हा मार्ग अत्यंत धोकादायक मानला जातो. मात्र दरवर्षी हजारो प्रवासी येथून बेकायदेशीररित्या प्रवास करतात.युरोपियन युनियनने दिलेल्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये या अटलांटिक मार्गावर ४६ हजारो बेकायदेशीर स्थलांतरितांनी प्रवास केला आहे. तर यातील १० हजारोहून अधिक लोकांनी आपला जीव गमवला आहे. ही धोकादायक परिस्थिती लक्षात घेऊन गाम्बियाच्या सरकारने नागरिकांना या मार्गावरुन प्रवास टाळण्याचे आवाहन केवे आहे. सरकारने दिलेल्या माहितीनुसार, या मार्गावर सातत्याने अपघाताच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. यामुळे सावधगिरी बाळगा. लोकांना चांगल्या भविष्याच्या शोधात जीव घालतात, पण यामुळे त्यांना मोठी किंमत चुकवावी लागते, असे सरकारने म्हटले आहे. सध्या या घयटनेने बेकायदेशीर स्थलांरितांचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. समुद्री मार्गाने युरोपला पोहोचण्याचा प्रयत्न घातक ठरत आहे. पण देशांमधील राहणीमान आणि संधी सुधारल्यावरच बेकायदेशीर स्थलांतर थांबले असे तज्ञांनी म्हटले आहे.

## मुंबईत भाजपचा महापौर हवा: अमित शहांचा महापालिका निवडणुकीसाठी कानमंत्र

**मुंबई : दि.३१ वृत्तसंस्था**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी प्रदेश भाजपच्या नेत्यांना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि विशेषत: मुंबई महापालिका निवडणुकीत विजयासाठी कानमंत्र दिला. कोणत्याही परिस्थितीत मुंबईत भाजपचा महापौर निवडून आला पाहिजे, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याच्या सूचना शहा यांनी दिल्या.
शहा यांनी आपल्या दोन दिवसांच्या मुंबई भेटीत लालबागचा राजा, मंत्री आशीष शेलार यांच्या सार्वजनिक मंडळाचा गणपती व अंधेरीचा महाराजा यांचे दर्शन



घेतले. या भेटीत शहा यांनी प्रदेश व मुंबईच्या निवडक नेत्यांशी आगामी निवडणुकीच्या संघटनात्मक तयारीची चर्चा केली. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम, शेलार, मंत्री मंगलप्रभात लोढा आदी नेते या बैठकीस उपस्थित होते.राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर असून मुंबईसह राज्यात जेथे शक्य होईल, तेथे युतीत निवडणूक लढवावी, मात्र महापौरपद व सर्वाधिक जागा मिळविणारा पक्ष भाजपच असावा, या दृष्टीने जागावाटप व रणनीती निश्चित करा, अशा सूचना शहा यांनी प्रदेश व मुंबईच्या नेत्यांना दिल्या.

## एअर इंडियाची फ्लाईट रद्द; दिल्लीहून इंदूरला जात होते विमान

**नवी दिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**

रविवारी एअर इंडिया विमानाच्या उजव्या इंजिनमध्ये आग लागल्याचे चिन्ह वैमानिकाला दिसल्याने गोंधळ उडाला. इंदूरला जाणारे हे विमान उड्डाणानंतर काही वेळातच दिल्लीला परतले. उड्डाणानंतर काही वेळातच उजव्या इंजिनमध्ये आग लागल्याचे दिसले. त्यानंतर विमान दिल्लीला आणण्याचा निर्णय घेण्यात आला.
या प्रकरणाबाबत एअर इंडियाने सांगितले की, विमान तपासणीसाठी थांबवण्यात आले आहे आणि प्रवाशांना पर्यायी विमानात पाठवण्यात येत आहे. विमान ३० मिनिटांपेक्षा जास्त काळ हवेत राहिल्यानंतर आपत्कालीन परिस्थितीत उतरले. सकाळी ६:१५ वाजता विमानाचे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. विमानात ९० हून अधिक लोक होते.
बाकी कसलाही तपशील न देता, एअर इंडियाने सांगितले की, ३१ ऑगस्ट रोजी दिल्लीहून इंदूरला जाणारे विमान एआय २९१३, टेकऑफनंतर लगेचच दिल्लीला परतले



कारण कॉकपिट क्रूला उजव्या इंजिनमध्ये आग लागल्याचे संकेत मिळाले. मानक प्रक्रियेचे पालन करून, कॉकपिट क्रूने इंजिन बंद करण्याचा निर्णय घेतला आणि विमान दिल्लीला परत आणण्यात आले. तिथे विमान सुरक्षितपणे उतरले.
एअर सेफ्टी रेग्युलेटर जनरल ऑफ सिव्हिल एव्हिएशनला या घटनेची माहिती देण्यात आली आहे. लँडिंग होताच, विमानातील प्रवाशांना आपत्कालीन गेटमधून बाहेर काढण्यात आले आणि विमानातील तांत्रिक बिघाडाची चौकशी करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच, एअरलाइन अधिकारी, विमानतळ कर्मचारी आणि सुरक्षा कर्मचारी घटनास्थळी पोहोचले.



## मोदींचा जपानमध्ये बुलेट ट्रेनने प्रवास

**टोकियो : दि.३१ वृत्तसंस्था**

जपान दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी पंतप्रधान मोदी मियागी प्रांतातील सेंदाई येथे प्रगत बुलेट ट्रेन ई-१० पाहण्यासाठी पोहोचले. जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा देखील त्यांच्यासोबत उपस्थित होते. दोन्ही नेत्यांनी ट्रेनमध्ये प्रवासही केला. या दरम्यान त्यांनी तेथे प्रशिक्षण घेणाऱ्या भारतातील ट्रेन चालकांशीही संवाद साधला. जपानची पूर्व रेल्वे त्यांना प्रशिक्षण देत आहे. ते भारतात धावणाऱ्या बुलेट ट्रेन चालवतील. सेंदाई येथे पोहोचल्यावर स्थानिक लोक आणि भारतीय समुदायाने त्यांचे स्वागत केले. त्यांच्या स्वागतावेळी लोक हातात झेंडे घेऊन घोषणा देत होते.
नरेंद्र मोदी शुक्रवारी १५ व्या भारत-जपान शिखर परिषदेत सहभागी झाले होते. या दरम्यान दोन्ही देशांदरम्यान विविध करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. जपानी पंतप्रधानांनी पुढील १० वर्षांत भारतात ६ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याबाबत चर्चा केली. जपानचा दौरा आटोपून मोदी चीनला रवाना झाले. ते रविवारी एससीओ शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. याशिवाय मोदी चीनचे अध्यक्ष जिनपिंग आणि रशियाचे अध्यक्ष पुतीन यांची स्वतंत्रपणे भेट घेतील.
पंतप्रधान जपानचा दोन दिवसांचा दौरा संपवून चीनला रवाना झाले आहेत. जपान दौऱ्याच्या समाप्तीनंतर पंतप्रधान मोदींनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये 'जपानची ही भेट सदैव स्मरणात राहील. हा दौरा आपल्या देशातील लोकांना फायदेशीर ठरणाऱ्या उपयुक्त परिणामांसाठी लक्षात राहील. मी पंतप्रधान इशिबा, जपानी जनता आणि सरकारचे त्यांच्या स्वागताबद्दल आभार मानतो.' असे म्हटले आहे.

## अहवाल — आइसलँड अव्वल, भारत कोणत्या क्रमांकावर?

# जगातील सर्वात सुरक्षित देशांची नवी यादी जाहीर

**नवी दिल्ली, दि.३१ वृत्तसंस्था**

जगात सुरक्षितता हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार मानला जातो. परंतु आजच्या अस्थिर आणि संघर्षमय जगात हा अधिकार अनेक ठिकाणी धोक्यात आहे. या पार्श्वभूमीवर दरवर्षी ''ग्लोबल पीस इंडेक्स'' अहवाल प्रसिद्ध केला जातो, ज्यात कोणते देश सुरक्षित, शांतताप्रिय आणि राहण्यायोग्य आहेत हे स्पष्ट होते.
२०२५ सालासाठीचा ताजा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला असून, यात आइसलँडने पुन्हा एकदा जगातील सर्वात शांत आणि सुरक्षित देशाचा मान पटकावला आहे. विशेष म्हणजे, आइसलँड २००८ पासून म्हणजे सलग १७ वर्षांपासून या क्रमवारीत अव्वल स्थानी आहे. हे त्यांच्या समाजरचनेतील विश्वास, कमी गुन्हेगारी दर आणि सैन्याच्या अभावाचे



परिणाम असल्याचे मानले जाते.
ग्लोबल पीस इंडेक्समध्ये १६३ देश आणि प्रदेशांचा समावेश करण्यात आला असून ते जगाच्या एकूण ९९.७ टक्के लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करतात. या यादीत भारताला ११५ वा क्रमांक मिळाला आहे. जरी भारताला पहिल्या १०० देशांमध्ये स्थान मिळवता आले नाही, तरीसुद्धा हा अहवाल भारतासाठी आशावादी ठरतो. कारण गेल्या वर्षाच्या तुलनेत भारताचा जीपीआय स्कोअर ०.५८% ने सुधारला आहे. भारतातील सामाजिक आणि राजकीय परिस्थिती, दहशतवादावरील नियंत्रण, तसेच गुन्हेगारी रोखण्यासाठीचे प्रयत्न यामुळे भारताची रँकिंग काही प्रमाणात उंचावली गेली आहे. इंडियन एक्सप्रेसनुसार, भारताचा जीपीआय स्कोअर २.२२९ वर नोंदवण्यात आला आहे.ग्लोबल पीस इंडेक्स तीन महत्त्वाच्या घटकांच्या आधारे देशांचे मूल्यमापन करतो सामाजिक सुरक्षा आणि संरक्षण गुन्हेगारी दर, विश्वासाची पातळी, राजकीय स्थैर्य.देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय संघर्ष युद्ध, दहशतवाद, सीमावाद यांची तीव्रता. लष्करीकरणाची पातळी सैन्याची उपस्थिती, शस्त्रास्त्रांवरील खर्च.या सर्व निकषांमध्ये आइसलँड, आयर्लंड, न्यूझीलंड, फिनलंड, ऑस्ट्रिया, स्वित्झर्लंड, सिंगापूर, पोर्तुगाल, डेन्मार्क आणि स्लोव्हेनिया हे देश अग्रस्थानी आहेत.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## टॅरिफमुळे ट्रम्पच अडचणीत

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केल्याप्रमाणे अतिरिक्त २५ टक्के आयातशुल्क भारतावर लागू झाले. ३१ जुलैपासून लागू केलेल्या २५ टक्के शुल्काव्यतिरिक्त हे आणखी शुल्क असल्याने आता भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या वस्तूंवर पन्नास टक्के कर लागू होणार आहे. भारताने ट्रम्प यांच्या दादागिरीला न जुमानल्याने हे होणारच होते. त्याची मानसिकता सरकारने तयार केली होती. त्यासाठी तर जीएसटीच्या स्लॅबमध्ये बदल, करात सवलत, प्रोत्साहन अनुदान आदी उपाययोजना सरकारने हाती घेतल्या आहेत. अमेरिकेत जाणाऱ्या वस्तू महागणार असल्याने अन्य देश त्याचा फायदा उठवणार हे अपेक्षित आहे. 'ट्रम्प टॅरिफ'चा फटका बसणारच आहे. फक्त तो जास्त असणार नाही. त्यामुळे पॅनिक न होता दीर्घकालीन विचार करून उपाययोजना केल्या पाहिजेत. अमेरिकेत भारतातून होणाऱ्या निर्यातीवर परिणाम होणार असल्याने ही निर्यात आता अन्य देशांत कशी जाईल, हे पाहायला हवे. सरकार त्यादृष्टीने प्रयत्न करील. ट्रम्प संकटाचा विचार करून भारतातील निर्यातदारांनीही आता आपल्या उत्पादनांचा उत्पादन खर्च कमी कसा राहील, यासाठी प्रयत्न करायला पाहिजे. स्पर्धक देशातील निर्यातदारांइतका उत्पादन खर्च असला आणि ट्रम्प टॅरिफमुळे निर्यात महागणार असेल, तर सरकारने तफावतीची रक्कम अनुदान किंवा अन्य मार्गाने देता येईल का, कमी दरात भांडवल उपलब्ध करून देता येईल का, अल्पमुदतीच्या कर्जाचे मध्यम मुदतीच्या कर्जात आणि मध्यम मुदतीच्या कर्जाचे दीर्घ मुदतीच्या कर्जात रुपांतर करण्याचा तसेच कर सवलत आणि व्याज सवलतींचा डोस निर्यातदारांना द्यायचा निर्णय घेतला पाहिजे. बाह्य संकटाच्या काळात कोणाचाही रोजगार जाणार नाही, कोणीही दिवाळखोर होणार नाही, याची जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे. जीएसटी स्लॅबची फेररचना आणि करात कपात हे त्यादृष्टीने टाकलेले पाऊल आहे. 'ट्रम्प टॅरिफ' वर उपाय म्हणून अन्य देशांशी तेवढीच निर्यात करण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत. 'ट्रम्प टॅरिफ' चा निर्यातीवर परिणाम होत असला, तरी त्याचा अर्थव्यवस्थेवर फार परिणाम होणार नाही. अमेरिकेची जागतिक रेटिंग एजन्सी 'फिच रेटिंग'ने ट्रम्प यांना उत्तर देताना भारताच्या मजबूत विकास दराचा हवाला दिला आहे. भारताला 'बीबीबी' रेटिंग कायम ठेवले आहे. अहवालात म्हटले आहे, की २०२५-२६ या आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन विकास दर ६.५ टक्के असू शकतो. 'फिच रेटिंग्ज'ने त्यांच्या अहवालात म्हटले आहे, की भारतीय अर्थव्यवस्थेला तिच्या मजबूत वाढीचा आणि ठोस परकीय गुंतवणुकीचा पाठिंबा आहे. त्यामुळे सध्या भारताचा आर्थिक दृष्टिकोन इतर समतुल्य देशांपेक्षा मजबूत आहे.ट्रम्प टॅरिफचा भारताच्या जीडीपीवर थेट परिणाम किरकोळ असेल. कारण भारताची अमेरिकेला होणारी निर्यात एकूण जीडीपीच्या फक्त दोन टक्के आहे. अन्न उत्पादनांच्या किमतीत झालेली घट आणि रिझर्व्ह बँकेने उचललेल्या धोरणात्मक पावलांमुळे महागाई नियंत्रणात राहिली आहे. ट्रम्प नीतीचा फटका केवळ भारताला बसेल, असे नाही, तर तो अमेरिकेलाही बसतो आहे. ट्रम्प आपल्या देशाला कर्जाच्या सापळ्यातून बाहेर काढण्यासाठी विविध युक्त्या अवलंबीत आहेत. त्यांनी जगभरातील बहुतांश देशांवर शुल्क लादले आहे; परंतु त्याचा विपरीत परिणाम होताना दिसत आहे. यावर्षी आतापर्यंत अमेरिकेत ४४६ मोठ्या कंपन्या दिवाळखोरीत निघाल्या आहेत. २०२५ च्या पहिल्या सहामाहीत ३७१ मोठ्या अमेरिकन कंपन्या दिवाळखोरीत निघाल्या. जूनमध्ये ६३ कंपन्यांनी दिवाळखोरीसाठी अर्ज केला. या वर्षी दिवाळखोरीत निघालेल्या कंपन्यांमध्ये १९९० आणि २००० च्या दशकातील अनेक लोकप्रिय ब्रँडचा समावेश आहे. यामध्ये फॉरेव्हर २१, जोआन्स, राईट एड, पार्टी सिटी आणि क्लेअर यांचा समावेश आहे. 'ट्रम्प टॅरिफ'चा स्मॉलकॅप कंपन्यांना सर्वाधिक फटका बसला आहे. अमेरिकेत २० ते २४ वयोगटातील बेरोजगारी गेल्या तीन महिन्यांत सरासरी ८.१ टक्के झाली आहे, जी चार वर्षांतील सर्वाधिक आहे. 'ट्रम्प टॅरिफ'मुळे भारताच्या अमेरिकन निर्यातीचे किती नुकसान होईल याची अनेक माहिती आणि बातम्या आल्या असल्या, तरी त्या सर्व अटकळींना आता पूर्णविराम मिळाला आहे. ट्रम्प यांच्या ५० टक्के टॅरिफमुळे भारताचे किती नुकसान होऊ शकते, याचा अंदाज भारत सरकारने स्वतःच लावला आहे. भारत सरकारच्या अंदाजानुसार, ४८ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किंमतीच्या भारताच्या निर्यातीचे नुकसान होऊ शकते. भारताशी संबंध बिघडविल्यामुळे ट्रम्प स्वतः त्यांच्याच देशात अडचणीत आले आहेत. दुसरीकडे, भारत अमेरिकेविरुद्ध ठामपणे उभा आहे आणि त्यांच्या राजनैतिक हालचालींद्वारे ट्रम्प यांना कठोर संदेश देत आहे. गेल्या दोन महिन्यांत भारताने अनेक देशांशी मैत्री वाढवली आहे आणि अनेक करारांवर स्वाक्षरीही केली आहे. अमेरिकेशी संबंध बिघडल्यापासून अनेक परदेशी नेते भारताला भेट देत आहेत. या यादीत चीन, फिजी, फिलीपिन्स, कतार, कझाकस्तान सारखे देश आहेत. या देशांशी करार करून भारताने अमेरिकेला संदेश दिला आहे, की तुम्ही शुल्क वाढवत राहा, आम्हाला काही फरक पडत नाही. आम्ही इतर पर्याय पाहू आणि त्यांच्याशी आमचे संबंध आणखी मजबूत करू. भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या वस्तूंवर पन्नास टक्के कर लागू झाला आहे. त्यातील काही छुप्या पळवाटा असल्या, तरी त्याचा निर्यातदारांना फार फायदा होणार नाही. अर्थात त्यामुळे अमेरिकेला फार फायदा होणार नाही. नव्या टॅरिफचा जसा अन्य देशांना फटका बसत आहे, तसाच फटका अमेरिकेलाही बसतो आहे. अमेरिकेतील कंपन्यांना स्वस्तात मिळणारा कच्चा माल आता महाग झाला आहे. त्यामुळे अमेरिकन कंपन्या अडचणीत आल्या आहेत. ट्रम्प टॅरिफवर दस्तुरखुद्द अमेरिकेत टीका व्हायला लागली आहे; परंतु अहंगंडाने पछाडलेल्या ट्रम्प यांना त्याचे काहीच वाटत नाही.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### आरक्षण



संविधानाने दिले आहे
मागासवर्गाला संरक्षण
उत्कर्ष त्यांचा हा आहे
घेऊनिया योग्य शिक्षण

आता बदलली आहे
व्याख्या ही शिक्षणाची
भाषा ही बदलत आहे
रोज ह्या राजकारणाची

आरक्षण तो मार्ग आहे
समाजाच्या उन्नतीचा
म्हणूनच लढत आहे
मराठा ह्या महाराष्ट्राचा

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

माणसात जेव्हा
माणूस दिसतो
समूळ नष्टतो
अहं शुण्य

अहंकार येतो
शिक्षकाला जेव्हा ।
शिष्य जातो तेव्हा
वाया मित्रा ॥

मोह जन्म घेतो
अहंकारातून ।
करूणेमधून
प्रेम जन्मे ॥

शिक्षकाचा अहं
पिढी डुबवितो ।
तिला घडवितो
उलटेची ॥

# आगमन गौराईचे: माहेरी स्वागताची लगबग



## संस्कृती

हरीश कामारकर
९६८९०११११२

श्रावण महिना म्हणजे हिंदूंच्या सणांची सुरुवात. श्रावणात नागपंचमी, रक्षाबंधन यांसारखे सणांची रेलचेल असते आणि मग सुरू होते ती गणपती बाप्पाच्या आगमनाची तयारी. बाप्पांचे आगमन होताच वातावरण उत्साही आणि आनंदी होऊन जाते. या आनंदाला अधिक भरारी मिळते ती गणपतींच्या पाठोपाठ येणाऱ्या गौरींच्या आगमनाने. अनेक घरांमध्ये गणपतीच्या तिसऱ्या दिवशी ज्येष्ठा गौरींचे आगमन होते. गणपतीप्रमाणेच गौरींनाही माहेरवाशीण म्हणून खूप महत्त्व आहे.

गौरी म्हणजेच माता लक्ष्मीचे रूप मानले जाते. गणपती बाप्पांसोबत गौरी-गणपतीचा हा सण घरोघरी आनंदाचे वातावरण घेऊन येतो. गौरींच्या आगमनासाठी घरोघरी विशेष तयारी केली जाते. बाजारात विविध प्रकारच्या वस्तूंची रेलचेल सुरू होते. गौरींच्या सजावटीसाठी खास नवनवीन दागिने, साड्या, विद्युत रोषणाई, आकर्षक पडदे आणि इतर शोभेच्या वस्तू उपलब्ध असतात. यामुळे बाजारात एक वेगळीच रौनक दिसून येते. महिला मोठ्या उत्साहाने गौरीच्या सजावटीसाठी खरेदी करतात. माहेरवाशीणीचे स्वागत ज्याप्रमाणे मुली आपल्या माहेरी येतात, त्याचप्रमाणे गौरींचे आगमन होते. अनेक घरांमध्ये गौरींचे मुखवटे किंवा मूर्ती आणून त्यांना साडी, दागिने आणि फुलांनी सजवून त्यांची स्थापना केली जाते. गौरींचे मुखवटे मातीचे, धातूचे किंवा प्लॅस्टर ऑफ पॅरिसचे असतात. गौरींना खास आकर्षक साड्या नेसवून त्यांना पारंपरिक दागिन्यांनी सजवले जाते. गौरीच्या आगमनावेळी घराच्या दारावर खास रांगोळी काढली जाते आणि पायघड्या घालून गौरींचे स्वागत केले जाते.





गौरींच्या आगमनानंतर त्यांची पूजा केली जाते. या दिवशी त्यांना विविध प्रकारच्या पदार्थांचा नैवेद्य दाखवला जातो. गौरींसाठी खास पुरणपोळी, लाडू, शंकरपाळी, ज्वारीच्या पिठाची उकड असे अनेक पदार्थ बनवले जातात. यामुळे घरभर खाद्यपदार्थांचा सुगंध दरवळतो. गौरींचे आगमन, पूजा आणि विसर्जन असे तीन दिवस हा सोहळा उत्साहात साजरा होतो. पहिल्या दिवशी गौरींचे आगमन होते, दुसऱ्या दिवशी त्यांची पूजा केली जाते आणि तिसऱ्या दिवशी गौरींचे विसर्जन केले जाते. एकंदरीत, सणाचे वातावरण गणेशोत्सव आणि गौरींचे आगमन हे सण महाराष्ट्राच्या संस्कृतीचे अविभाज्य भाग आहेत. हे सण केवळ धार्मिक विधी नसून कुटुंबातील सर्वांना एकत्र आणण्याचे एक माध्यम आहेत. या सणांमुळे घरोघरी एक वेगळाच उत्साह आणि मायेचे वातावरण तयार होते. गणपती आणि गौरींचा हा सण एकोपा आणि आनंद साजरा करण्याचा संदेश देतो. यामुळेच हा सण महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा आणि आवडता सण मानला जातो.

# शिक्षणाचे सोडून बोला...



## शैक्षणिक

पदमाकर आखरे
9881929090

गेल्या महिनाभरापासून जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात फक्त एकच चर्चा सुरू आहे ती म्हणजे शिक्षक बदल्यांची आणि बदल्यांमध्ये अन्याय झाल्याची. कुणाला दुरची शाळा मिळाली म्हणून तर कोणी पत्नीला दूरची शाळा मिळाली म्हणून नाराज आहे. यावर शिक्षण विभागाने तोडगा काढावा म्हणून संघटनांमार्फत दबाव तंत्राचा वापर सुरू आहे. आंदोलन करण्याची धमकी वजा इशारेही देण्यात आले आहेत. या खटाटोपात शिक्षण मात्र केव्हाच मागे पडले आहे. किंबहुना विद्यार्थी हिताचा दृष्टिकोन लक्षात घेऊन पुढाकार घेणाऱ्या शिक्षकांचा अपवादच राहिलेला आहे. दिवसेंदिवस पालकांचा खाजगी शाळांकडे वाढलेला कल यातून सर्व काही स्पष्ट होत आहे.



संग्रहीत छायाचित्र

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ९०० पेक्षा जास्त शाळा आहेत. या शाळांवर विद्यार्थी पटसंख्येच्या तुलनेत शिक्षकांची संख्या आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून सर्व शिक्षा अभियान हा कालबद्ध कार्यक्रम जवळपास दोन दशके राबविण्यात आलेला आहे. परंतू दर्जेदार शिक्षणाअभावी कोट्यवधी रुपये खर्च होत असतानाही जिल्हा परिषद शाळांची दरवर्षी विद्यार्थी पटसंख्या घटतच चालली आहे. या घटत्या पटसंख्येमुळे जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत, याचे मात्र कुणालाही घेणे देणे नाही. अनेक शिक्षकांना फक्त पाहिजे त्या ठिकाणी बदली, वेळेवर पगार आणि कधीही दांडी मारण्याचा हक्क एवढे स्वातंत्र्य हवे असल्याचे दिसून येते. यासाठी अनेक शिक्षक काहीही करण्यास तयार आहेत. बदलीतून सूट मिळावी म्हणून अनेक शिक्षक कागदोपत्री अपंग झालेले आहेत. ऑनलाइन बदल्यांच्या पोर्टलमध्ये अनेकांनी खोटी माहिती भरलेली आहे. पती-पत्नी एकत्रीकरणासाठी शाळांमधील अंतर खोटे सादर केलेले आहे. अनेकांनी आजारी असल्याची खोटी प्रमाणपत्रे आणली आहेत. या सर्व घटकांचा निष्कून तपास करण्याची जबाबदारी शिक्षण विभागाची असताना त्यांनी आक्षेप आल्यानंतर पाहू म्हणून आपले हात वर केले आहेत. या प्रकारामुळे शिक्षक बदल्यांना विलंब होत आहे. बदली होणार म्हणून शिक्षकांचे विद्यार्थी आणि शिक्षणाकडे दुर्लक्ष सुरू आहे. या सर्व प्रकाराकडे लक्ष दिल्यास यामध्ये शिक्षण आणि विद्यार्थी हित कुठेच दिसत नाही.

एकेकाळी ग्रामीण भागात शाळा आणि गुरुजींचे अतूट नाते होते. प्रत्येक गुरुजी गावातच वास्तव्यास होते. आज मात्र गुरुजी जिल्ह्याच्या ठिकाणावरून शाळेचा कारभार हाकतात. आपली मुले कॉन्व्हेंट मध्ये शिकवितात. त्यांना मुख्यालयी राहायचे नाही, घरभाडेभत्ता भत्ता मात्र पूर्ण हवा असतो. शासनानेच त्यांना तशी मुभा दिली आहे. या सर्व प्रकारामुळे शिक्षणाचा बट्याबोळ वाजल्यामुळे पालकांचा खाजगी शिक्षणाकडे कल वाढला आहे. अस्थाई व्यापार आणि शेत धंद्याऐवजी स्थायी नोकरीची प्रत्येक जण आस बाळगून आहे. त्यासाठी खाजगी शिक्षण संस्थांमध्ये लाखो रुपये डोनेशन भरण्यात येत आहे. यामुळे जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या मोठ्या प्रमाणात घसरली असतानाही अनेक गुरुजी शिक्षण सोडून बोला याच तोऱ्यात वागताना दिसून येतात. परिणामी गरिबांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळणे दुरापास्त झाले आहे. स्पर्धेच्या युगात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांना टिकायचे असेल तर गुणवत्ता सुधारण्यावर भर द्यावी लागेल. शाळांचे मूल्यांकन, सेमी इंग्रजीचा स्वीकार करावा लागेल. शिक्षकांना शैक्षणिक तसेच इतर कामांमधून वगळून अध्यापनावर अधिक लक्ष केंद्रित कसे होईल याकडे लक्ष द्यावे लागेल. पटसंख्या कमी होत चाललेल्या शाळांसाठी शिक्षकांना मुख्यालयी राहण्याची सक्ती करावी लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थेचे पदाधिकारी, अधिकारी, शिक्षण विभाग, शिक्षक आणि पालकांनी एकत्र येऊन दर्जेदार तसेच सक्तीच्या शिक्षणासाठी सामूहिक प्रयत्न करावे लागतील. अन्यथा जिल्हा परिषद शाळांना अखेरची घरघर लागणार असून गरीबांच्या मुलांना शिकणे अवघड होईल यात कोणतीही शंका उरणार नाही.

# स्मार्ट व इंटेलिजंट गावांकडे महाराष्ट्राची वाटचाल




## 'सातनवरी' ठरले देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव

### विशेष लेख

रितेश मो. भुयार

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी 'खेड्यांकडे परत चला' असा संदेश देत ग्रामीण भारताचे देश विकासात महत्व अधोरेखित केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनीही 'गाव करी ते राव न करी' असे उद्बोधन करुन आदर्श ग्रामीण भारताची संकल्पना 'ग्रामगीता' या ग्रंथातून मांडली. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व व पुढाकाराने हा ग्रामीण भारत आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्मार्ट व इंटेलिजंट होण्याच्या दृष्टीने पाऊल पुढे पडले आहे. नागपूर ग्रामीणमधील सातनवरी गावात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रायोगिक तत्वावर नुकतेच देशातील पहिल्या स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ केला. स्मार्ट सिंचन, ड्रोनद्वारे किटकनाशके व खत फवारणी, मत्स्यव्यवसाय, सिंचन, आरोग्य, शिक्षण, बँक ऑन व्हिल, स्मार्ट टेहळणी आदी १८ सेवा आधुनिक तंत्रज्ञानाच्या व मुख्यत्वे भारतीय कंपन्यांद्वारे पुरविल्या जात असल्याने हे एक आत्मनिर्भर भारताद्वारे समृद्ध गाव करण्यासाठीचे उत्तम उदाहरण ठरले आहे.

महाराष्ट्राने भारत देशाला स्वातंत्र्य करण्यात व येथील सामाजिक उत्थानासाठी मोलाचे योगदान दिले आहे. स्वातंत्र्योत्तर भारताला रोजगार हमी योजना, माहितीचा अधिकार, महिलांना आरक्षण असे क्रांतीकारी पाऊल उचलत पुढे देशभर त्याची अंमलबजावणी झाली आहे. महाराष्ट्राने देशाला दिलेल्या या महत्वाच्या योगदानात आता स्मार्ट व इंटेलिजंट गावाची भर पडणार आहे. देशातील पहिल्या स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ करतांनाच राज्यातील प्रत्येक तालुक्यामधील १० असे सुमारे ३ हजार ५०० गावे पहिल्या टप्प्यात स्मार्ट व इंटेलिजंट करण्याचा मनोदय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त करत ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा बदलवून समृद्ध गावांद्वारे भारतीय स्वातंत्र्याच्या शतक वर्षपूर्ती निमित्त संपूर्ण विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी टाकलेले हे महत्वाचे पाऊल आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशुन केलेल्या संबोधनात ग्रामीण भारत तंत्रज्ञानाद्वारे विकास पथावर अग्रेसर करण्याची घोषणा करत 'भारतनेट' हा गावा-गावांना इंटरनेटद्वारे जोडण्याचा व पर्यायाने जगाशी ग्रामीण भारताचा संवाद घडविण्यासाठी पुढाकार घेतला. महाराष्ट्रात भारतनेट उपक्रमांतर्गत २०१९ मध्ये पहिल्या टप्प्याची यशस्वी अंमलबजावणी झाली व दुसऱ्या टप्प्यासही सुरूवात झाली. राज्याने भारतनेटच्या धर्तीवर 'महानेट' कार्यक्रम हाती घेत त्याची अमंलबजावणीही सुरू केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य शासनाने विविध महत्वाचे निर्णय घेवून राज्याला सर्व क्षेत्रात अग्रेसर बनविण्यासाठी पुढाकार घेतला असून कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापराद्वारे प्रशासनाला गती व सर्व सामान्यांना उत्तम सोई-सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीनेही निर्णय घेण्यात आले. ग्रामीण महाराष्ट्रालाही उत्तम सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व पर्यायाने गावातील सामान्य माणसाला सबळ करण्यासाठी स्मार्ट व इंटेलिजंट बनविण्याचा महत्वाकांक्षी उपक्रम मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी हाती घेतला.

**आत्मनिर्भर भारताद्वारे समृद्ध गाव**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतातच देशवासियांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता सर्व क्षेत्रांना आवाहन करत आत्मनिर्भर भारताची संकल्पना मांडली. याला प्रतिसाद देत देशात विविध क्षेत्रांमध्ये देशी बनावटीच्या वस्तू व तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात विकसित होत आहे. याच दिशेने एक पाऊल पुढे जात केंद्रीय दूरसंचार मंत्रालयांतर्गत कार्यरत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसने (व्हाईस) देशांतर्गत कंपन्यांच्या संघटनांसोबत एकत्र येत देशातील स्मार्ट इंटेलिजंट गाव बनविण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समक्ष ठेवला व त्यास तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत हा महत्वाकांक्षी प्रकल्प महाराष्ट्रात राबविण्याचे ठरले. त्यानुसार व्हाईस कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची भेट घेतली. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासोबत बैठक होवून हा प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक असलेली भौगोलिक व अनुषांगिक सर्व सज्जता असलेल्या नागपूर ग्रामीण मधील गटग्रामपंचायत सातनवरी या १८०० लोकवस्तीच्या गावाची निवड देशातील हा प्रायोगिक प्रकल्प राबविण्यासाठी झाली व त्यास मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली.

गेल्या दोन महिन्यापासून स्थानिक प्रशासनाने आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि व्हाईस कंपनीने सातनवरी गावात मुक्काम ठोकला व या गावाला स्मार्ट इंटेलिजंट गाव बनविण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही पूर्ण करण्याच्या दिशेने काम झाले. या प्रकल्पाच्या प्रगतीचा मुख्य सचिव राजेश कुमार, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी व व्हाईस कंपनीचे वरिष्ठ पदाधिकारी यांनी वेळोवेळी आढावा घेतला.

**असे होत आहे सातनवरी स्मार्ट व इंटेलिजंट**

सातनवरी गाव इंटरनेट सुविधांनी पूर्णपणे जोडण्यात आले आहे. वायफाय, हॉटस्पॉट आदींचा उपयोगही मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. ग्रामपंचायत ते गावातील घरे, संस्था आणि गावात वायफाय, फायबर टु द होम (फटीटीएच), सॅटेलाईट सुविधा, ४ जी, ५ जी व अन्य वायरलेस तंत्रज्ञानाचा उपयोग करून ब्रॉडबॅन्डची उपलब्धता मोठ्या प्रमाणात करून देण्यात आली आहे. स्मार्ट शेतीला प्राधान्य देवून गावातील शेतांमध्ये सेन्सर बसविण्यात आले आहे. याद्वारे शेतीतील पेरणीपासून कापणीपर्यंत तसेच बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा, माहिती, पीक पद्धतीचे नियोजन आदी सर्व माहिती डॅशबोर्डवर उपलब्ध झाली आहे. या गावातील शेतकरी ड्रोन व सेन्सर आदींचा उपयोग करून माती परिक्षण, फवारणी, खते आदींच्या योग्य नियोजनाद्वारे पर्यावरणपूरक शेतीसह उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याच्या दिशेने अग्रेसर झाले आहे. तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे गावातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता सुधारल्याने गावकऱ्यांचे आरोग्य सुधारत आहे. हेल्थ कार्ड, टेलिमेडिसिन आदींचा उपयोग होवून गावातच आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध होत आहे व शहरांकडे होणारी गावकऱ्यांची पायपीट आता थांबत आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील तज्ञ डॉक्टर या उपक्रमामध्ये सहभागी होवून ग्रामस्थांना आरोग्य सुविधांचा लाभ देत आहेत. गावात प्राथमिक शिक्षणात कृत्रिम बुद्धीमत्ता व स्मार्ट शिक्षणाचा उपयोग होवून वैश्विक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळत आहे. शाळा व अंगणवाडीमध्ये स्मार्ट ईसीसीई व्हिडियो मार्गदर्शन पुस्तक, ए.आय. च्या माध्यमातून रिमोट क्लास रूम तसेच डिजिटल अंगणवाडी केंद्र या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. या गावात ई-स्कील सेंटर, मोबाईल हेल्थ कनेक्टिविटी आदी सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. संगणकामुळे ग्रामपंचयातमधील सर्व कामे जलद गतीने पूर्ण होत आहेत. तसेच ग्रामस्थांना वायफायच्या माध्यमातून गाव व शहराशी जोडणे सुलभ झाले आहे. गावातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, तलावांमधील मत्स्यपालनासाठी आवश्यक असलेल्या पाण्यातील घटकांची माहिती डॅशबोर्डवर दिसत आहे. ग्रामपंचायतीने स्मार्ट पथदिवे लावले असून यामुळे विजेची बचत होत आहे. स्मार्ट कॅमेरांचा उपयोग करून गावात ठिकठिकाणी टेहळणी सुरू आहे. कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करून गावातील पेयजल वितरण व गुणवत्ता नियमन करण्यात येत आहे. स्मार्ट गर्व्हनन्स, स्मार्ट कचरा व्यवस्थापन आणि स्मार्ट अग्निशमन व्यवस्था उभारण्यात आली आहे. तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे जगात विविध क्षेत्रात क्रांती घडत आहे. भारतातही तंत्रज्ञान क्षेत्रातील स्वदेशी कंपन्यांनी एकत्र येवून समृद्ध गावाचा आदर्श निर्माण करण्याचा ध्यास धरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकल्पास पूर्ण सहकार्य देवून देशाला दिशादर्शक ठरेल असे सातनवरी गाव स्मार्ट व इंटेलिजंट करण्यासाठी स्थानिक प्रशासन व राज्य शासनाची संपूर्ण मदत दिली. त्यातून उभे राहिलेले हे गाव आता प्रगतीच्या वाटेवर आरूढ झाले असून आधुनिक जगातील एक आदर्श गाव म्हणून सातनवरी नक्कीच आपली ओळख भारतासह जगाला करून देईल याची खात्री पटते.

# ‘लास्ट स्टॉप खांदा’ चित्रपटात प्रेमाची गोष्ट



आयुष्याचा प्रवास सुरू झाला की प्रत्येकाला प्रेमाच्या स्टॉपवर थांबावंसं वाटतंच, काही जण थांबतात, काही जण रमतात, काही जण भेटतात. प्रवास पुढे सुरू राहतो, पण त्या स्टॉपवरचं रेंगाळणं मनात साठून राहतंच. अशीच प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट असलेला ‘लास्ट स्टॉप खांदा’ हा संगीतमय चित्रपट २१ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर समाजमाध्यमांवर प्रदर्शित करण्यात आले आहे.

शिवम फिल्म क्रिएशन सिग्नेचर टयून्स, स्नेहा प्रॉडक्शन्स यांनी ‘लास्ट स्टॉप खांदा’ प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सचिन कदम आणि सचिन जाधव यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. प्रदीप मनोहर जाधव हे या चित्रपटाचे निर्माते असून सचिन कदम, अमृता सचिन जाधव सहनिर्माते आहेत.श्रमेश बेटकर लिखित या चित्रपटाचं दिग्दर्शन विनीत परुळेकर यांनी केलं आहे. या चित्रपटात अभिनेता श्रमेश बेटकर, अभिनेत्री जुईली टेमकर, निखिल बने, मंदार मांडवकर, शशिकांत केरकर अशा कलाकारांच्या भूमिका आहेत. तर पाहुणे कलाकार म्हणून प्रभाकर मोरे, धनश्री काडगावकर, अशोक ढगे यांनी काम केले आहे. चित्रपटाचे छायांकन हरेश सावंत यांचे असून कलादिग्दर्शक केशव ठाकूर आहेत. श्रेयस राज आंगणे, श्रमेश बेटकर लिखित गीतांना श्रेयस राज आंगणे आणि किशोर मोहिते यांचे संगीत लाभले आहे.

प्रेमाच्या नात्याचा वेध आजवर अनेक चित्रपटांमधून घेतला गेला आहे. तरीही प्रेम या संकल्पनेच्या नवनव्या गोष्टी चित्रपटांतून मांडल्या जातात. ‘लास्ट स्टॉप खांदा..’ या चित्रपटातूनही अशीच एक नावीन्यपूर्ण कहाणी मांडण्यात आली आहे. या गोष्टीला श्रवणीय संगीताचीही साथ आहे.

## आकाश साप्ताहिकी

**-० ग्रहांचा उदयास्त ०-**

सूर्यमालेतील आठ ग्रहांपैकी पाच ग्रह नुसत्या डोळ्यांनी पाहता येतात.भ्रमण कक्षेत जेंव्हा ग्रह सूर्याच्या सान्निध्यात येतो तेंव्हा त्या ग्रहाचा अस्त आणि ठराविक अंतरावर आल्याने उदय होत असतो.

बुध व शूक्र हे दोन्ही अंतर्ग्रह असल्याने यांचे उदयास्त पूर्व किंवा पश्चिम क्षितिजावर होत असतात.

मंगळ, गुरु आणि शनी ग्रहाचे उदय पूर्व व अस्त पश्चिमेस होतात. या ३ सप्टेंबर रोजी बुध ग्रहाचा पूर्व क्षितिजावर अस्त आहे.

✻अशी असेल आकाश स्थिती✻

दि.३१ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर.

दि.३१-८.चंद्र अनुराधा नक्षत्रात.शूक्र पुष्य नक्षत्रात.

दि.१-९ चंद्र ज्येष्ठा नक्षत्रात, अगदी जवळ काही भागात परिधान युती.पहाटे ऑरिगा समुहातून उल्का वर्षाव.

दि.२.चंद्र मूळ नक्षत्रात.

दि.३.चंद्र पूर्वाषाढात, बुध ग्रहाचा पूर्वेस अस्त.




दि.४.चंद्र उत्तराषाढात, प्लूटो हा बटू ग्रह व चंद्र पिधान युती.

दि.५.चंद्र श्रवण नक्षत्रात.

दि.६.चंद्र धनिष्ठा नक्षत्रात, रात्री ८-२० ते ८-२२ वा. पश्चिम आकाशात दिड मि.

**०० ✻ग्रह दर्शन✻ ००**

मंगळ ग्रह रात्रीच्या प्रारंभी पश्चिम आकाशात, रात्री नऊ नंतर शनी ग्रह पूर्वेस, बुधास्त असल्याने दर्शन बंद

पहाटे पूर्व आकाशात गुरु आणि शूक्र ग्रह मस्तपैकी दर्शनार्थ सज्ज असतील.

# देहूनगरीत ‘अभंग तुकाराम’ चित्रपटाचा भक्तीमय सोहळा




**मुंबई :** ‘ज्ञानोबा माऊली-तुकाराम’ असा अखंड नामघोष आणि टाळ-मृदंगाच्या तालावर होणारा विठूनामाच्या गजरात ‘अभंग तुकाराम कथा संत तुकारामांच्या गाथेची’ या मराठी चित्रपटाचा भक्तीमय सोहळा देहू नगरीत नुकताच रंगला. डोक्यावर वारकरी पगडी, कपाळावर टिळा, गळ्यात माळा आणि हातात चिपळ्या असा वेश परिधान करून ज्येष्ठ अभिनेते योगेश सोमण हे जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या भूमिकेच्या रूपात देहूतील जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज मंदिरात पोहोचले आणि हा सोहळा उपस्थितांनी ‘याची देही, याची डोळा’ अनुभवला. ‘अभंग तुकाराम कथा संत तुकारामांच्या गाथेची’ चित्रपटात प्रसिद्ध अभिनेते योगेश सोमण जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांची भूमिका साकारणार असून त्यांच्या पत्नीच्या आवलीच्या भूमिकेत अभिनेत्री स्मिता शेवाळे दिसणार आहे. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगरूपी अमृतवाणीने जीवनाची शाश्वत सत्ये सांगितली आणि जगण्याचे तत्त्वज्ञान मांडले. मानवी जीवनाला परिपूर्णता प्राप्त करून देणारा हा सुखसंवाद आता ‘अभंग तुकाराम कथा संत तुकारामांच्या गाथेची’ या चित्रपटाच्या माध्यमातून मराठी रुपेरी पडद्यावर येणार आहे. दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित ‘अभंग तुकाराम कथा संत तुकारामांच्या गाथेची’ चित्रपट ७ नोव्हेंबरला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

पॅनोरमा स्टुडिओज ही निर्मिती संस्था चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते आहेत. तर निर्माते कुमार मंगत पाठक, अभिषेक पाठक असून सहनिर्माते मुरलीधर छतवानी, रवींद्र औटी आहेत. या चित्रपटाची कथा आणि संवाद प्रसिद्ध लेखक योगेश सोमण यांचे असून, तर दिग्पाल लांजेकर यांनी पटकथा आणि दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळली आहे. वारकरी संगीत हा चित्रपटाचा आत्मा आहे. अभंग गाथा हा विषय असल्याने तब्बल १० अभंगांचा समावेश चित्रपटात करण्यात आलेला आहे. प्रसिद्ध गायक व संगीतकार अवधूत गांधी यांनी चित्रपटाच्या संगीताची धुरा सांभाळली आहे.

## राशी-भविष्य

**मेष :** तुमच्या वैयक्तिक आयुष्यात इतरांना येऊ देऊ नका. अडचणी येतील. आज कौटुंबिक मतभेदांमुळे वाद होण्याची शक्यता आहे.

**वृषभ:** जमीन आणि मालमत्तेच्या खरेदी-विक्रीची योजना आखली जाईल. आईचे आरोग्य बिघडू शकते. जोडीदारासोबत वेळ घालवला जाईल

**मिथून :** प्रियजनांना दूर जाताना पाहून मन दु:खी होईल. कोणतेही काम समजून घेऊन करा. ती तुमची जबाबदारी नाही तर तुमची उपजीविका आहे.

**कर्क :** परस्पर संबंधांमुळे तुम्हाला तडजोड करावी लागेल. तुम्ही कायदेशीर बाबींमध्ये अडकू शकता. निराशा संपेल, परंतु अजूनही वेळ आहे. आर्थिक बाबी सोडवल्या जातील.

**सिंह :** तुमच्या कामाकडे दुर्लक्ष करू नका. कोणाचीही टीका करणे टाळा. व्यवसायात विवेक वापरल्याने नफ्याचा टक्का वाढेल. धार्मिक श्रद्धा वाढेल.

**कन्या :** कोणीतरी तुमच्या वैयक्तिक आयुष्यात समस्या निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे, सावधगिरी बाळगा. तुमच्या आरोग्याबद्दल सतर्क रहा.

**तुळ :** मालमत्ता-जमिनीच्या बाबतीत शत्रू सक्रिय असतील. जोडीदाराची चिंता असेल. प्रवास करताना काळजी घ्या, अन्यथा नुकसान होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** वैयक्तिक जीवनात खूप धावपळ होईल. मुलांबद्दल चिंता आणि ताण तुम्हाला त्रास देईल. व्यवसायातील शत्रू पराभूत होतील.

**धनु :** दिवसाची सुरुवात भक्तीने होईल. कुटुंबात एखाद्या कार्यक्रमाची योजना आखली जाईल. विद्यार्थ्यांना यश मिळेल. स्पर्धेत भाग घ्याल.

**मकर :** जवळच्या व्यक्तीच्या चुकीमुळे प्रतिष्ठा दुखावली जाऊ शकते. शारीरिक वेदना अडथळे निर्माण करतील. अनेक कामांवर परिणाम होईल.

**कुंभ :** तुम्ही कुटुंबातील एखाद्या शुभ कार्यक्रमाच्या तयारीत व्यस्त असाल. भूतकाळ विसरून नवीन सुरुवात करा. घर बदलण्याची शक्यता आहे. आर्थिक बाबी तशाच राहतील.

**मीन :** व्यवसायात नवीन तंत्रज्ञानाचा वापर यशस्वी आणि फायदेशीर ठरेल. महत्त्वाची कामे वेळेवर पूर्ण होतील. आज तुम्हाला नवीन कपडे आणि दागिने मिळू शकतात.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 147




संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द :–**

**दोन अक्षरी**
अश्व
असा
अक्ष
आप्त
कटी
कव
कसा
कीर
कोडे
कोंब
खास
गण
गुप्त
चल
चव
चिंच
डेग
तप
तम
तमा
ताव
त्रागा
दम
दास
दाह
पंक
पग
पैसा
भक्ती
भर
मेंढी
मोह
यात्रा
वत्स
वत्स
वश
वाढ
वाम
शल्य
शह
साफ
सामा
सोस
हेका

**तीन अक्षरी**
किमया
कुंचला
केवळ
गाभारा
गुणक
गोफण
दुकान
दुलई
निवारा
पसारा
पावकी
बढती
भाटक
रकाना
रचना
राबता
रुपक
शावक
लवाद
वतन
वारस
सकस
सागर
सासर
साक्षर
सुग्रीव
सरस
होकार

**चार अक्षरी**
अपकीर्ति
उपचार
ऊहापोह
ऐतखाऊ
ऐसपैस
शल्य
चिकित्सक
मूल्यवान
मेंढपाळ
रसकस
रसपान
रामबाण
रोमांचित
शासकीय
शेंडेफळ
समाचार
समारोह
सहाय्यक
सुसंवाद
हिटलर
होतकरू

**पाच अक्षरी**
उत्सव मूर्ति
कल्पना शक्ति
गोपाल काला
त्र्यंबकेश्वर
नामोहरम
शववाहिका
साबरमती
हितचिंतक

**सहा अक्षरी**
वि स खांडेकर

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सि | द्धी | वि | ना | य | क | ■ | भा | ग | ■ | का | ■ | क | ळं | ब | ■ |
| म | ■ | ■ | त | म | स | ■ | त | प | शी | ल | वा | र | ■ | र | ज्जू |
| ला | व्हा | ■ | ल | ■ | ■ | की | ■ | गा | ■ | वा | स्तु | ■ | ■ | ग | ■ |
| ■ | ■ | मं | ग | ल | मू | र्ती | मो | र | या | ■ | शां | ता | शे | ळ | के |
| पो | ■ | ग | ■ | ■ | च्र्छा | ■ | द | ■ | ■ | अ | ती | त | ■ | ■ | श |
| क | म | ला | क | र | ■ | ए | क | दं | त | ■ | ■ | डी | ■ | भा | व |
| ■ | रु | ष्ट | ■ | ■ | पा | ■ | ■ | ड | म | ड | म | ■ | अ | नु | प |
| व | ■ | क | व | टा | ळ | णे | ■ | व | ■ | ■ | ■ | स | भा | ■ | न |
| र | णी | ■ | सं | ■ | त | ■ | श | त | पा | व | ली | ■ | व | सा | ■ |
| द | ■ | का | त | र | ■ | प | र | ■ | रा | न | ■ | आ | ■ | धा | क |
| वि | ■ | र्ति | ■ | ■ | प | रि | ण | य | ■ | स्प | र्श | ज्ञा | न | ■ | न |
| ना | ■ | के | श | व | ■ | म | ■ | म | ह | ती | ■ | धा | क | धू | क |
| य | ■ | य | ■ | रा | ■ | ल | ■ | रा | त | ■ | ■ | र | टा | ळ | ■ |
| क | म | ■ | मो | ह | क | ■ | अ | ज | ब | ■ | का | क | ■ | व | न |
| ■ | हा | जि | र | ■ | र्णा | ■ | न | ■ | ल | गा | म | ■ | स | ड | क |
| खो | ड | ■ | या | न | ■ | सा | र्थ | क | ■ | भा | ना | म | ती | ■ | ली |

Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 528



**–: आडवे संकेत :–**

१) प्रत्यक्षपणे मुलीशी बोलतांना अप्रत्यक्षपणे जवळ असलेल्या सुनेला ते बोलणे ऐकविणे असा मूळ उद्देश असतो या अर्थाचा एक वाक्प्रचार
६) दुसऱ्यांकडून आपले कौतुक करवून घेणे
११) स्तन, वक्ष
१२) टोळ, दिव्यावर झडप घालणारा किडा
१३) आपल्या उत्पन्नातून सरकारला देय असलेले देणे
१४) एक जलचर प्राणी
१५) ऐवज, द्रव्यसंख्या
१७) मर्यादेचे उल्लंघन करणे, बेबंद होणे
२०) झाडावरच पिकू लागलेली कैरी
२१) दरवाजा
२२) नटूनथटून गावभर हिंडणारा
२३) उणीव भरून काढणे
२४) उत्कंठा, मस्ती
२६) एक विदेशी मद्य प्रकार
२७) सूर्य
२९) जाणीव नसलेला, अज्ञानी
३१) पूर्वीचा, होऊन गेलेला
३३) प्रत्यक्ष, समोर
३४) चहाटळ, वात्रट
३५) प्रत्येक पंधरवड्यातील आठवी तिथी
३७) पडक्या घराचे सामान
३८) कामात मग्न
४०) बहिणीचा मुलगा
४१) चतुर, हुशार
४३) अरण्यात राहून भोगावे लागणारे कष्ट
४५) प्रौढ वयाचा
४७ ) पाऊस पडल्यावर उगवू लागलेले गवत
४८) अक्षरावर द्यावयाची चिन्हे
५०) बाण
५२) मूल साधारणत: एक वर्षपर्यंत होईपर्यंत त्याच्या अंगावर येणारी पुष्टता
५५) अभ्र, मेघ
५७) विश्वासघात, कपट
५९) व्रत
६२) वैशिष्ट्यपूर्ण, खरोखर, अस्सल
६३) मजबूत, बळकट
६५) कमळ
६७) परीक्षा, कस लावण्याचा दगड
६८) एकसारखे मागे लागणे
६९) मस्तकहीन शरीर, धड
७१) जाळून पोळून केलेली नासाडी
७३) पुरुषांनी नेसावयाचे उंची वस्त्र
७५) उपस्थित असणे
७६) अहंकार, गुर्मी
७८) ताप येण्यापूर्वी अंग मोडून येणे
८०) निकटता
८२) भय, भीति, दहशत
८३) आतून पोकळ असलेला पोकळ स्तंभ
८४) दुर्दशा
८५) लग्नात वधूवरांच्या हातून केलेला लाह्यांचा होम

**–: उभे संकेत :–**

१) मुलेबाळे असलेला, कुटुंबवत्सल
२) वेळू, बांबू (सं.)
३) अल्प, अंश
४) अनियंत्रित सत्ता चालविणारा, पादशहा, जुलमी राजा
५) सैल, ढिला, घाबरट
६) वृक्षाभोवती बांधलेला ओटा
७) रचलेली खोटी गोष्ट
८) लहान असून रम्य असलेले घर, आटोपशीर
९) लहान शहरातील स्थानिक स्वराज्य संस्था
१०) परीघ, वस्त्राचा पदर
१३) तांबडी, पांढरी फुले येणारे एक झाड
१६) लालूच किंवा आशा दाखविणे
१८) सोन्याचे दागिने घडविणारा
१९) अनिश्चित, अस्थिर
२०) एक चतुर्थांश
२३) भविष्यात होणारे, नशीब
२५) हत्या, ठार मारणे
२७) राखण, राखड
२८) बातमी, वृत्तांत
२९) अवचित, अनपेक्षित प्रसंग, दैववशात् प्राप्त
३०) मौंजीच्या वेळी बटूसोबत भोजनासाठी बसविलेली आठ मुले
३२) अंध:कार, काळोख
३३) व्याकरणातील पदार्थमात्राचे नाव
३६) मत्स्य, बारावी रास
३९) साठी, करिता
४०) सूर्य
४२) पेटी वगैरेचा कणा
४४) मुंग्यांचे निवासस्थान
४६) विजयी, जिंकलेला
४७) टाळाटाळ करणे या अर्थाचा एक वाक्प्रचार
४९) संतापाच्या भरात स्वत:लाच दुखापत करून घेणे
५१) मस्ती, दंगल
५२) खेळाची समाप्ती, डाव
५३) सेवा करणारा नोकर
५४) महिना
५६) भविष्य वर्तविणारा, ज्योतिष्य
५७) प्रत्येक
५८) दंडावरील दागिना
६०) सुंदर
६१) फुलाचा एकेक वेगळा भाग
६२) मांस विकणारा
६४) वैरभाव, शत्रुत्व
६६) हाताचे सर्वात लहान बोट
६९) कोणत्या प्रकारचा ?
७०) नदीचे पाणी अडविणारा बांध
७२) खरवडून काढलेलाभाग
७४) दहाचा समुदाय
७७) प्राणी संग्रहालय (इं)
७९) सारखे, समान
८०) अंगठ्याच्या मध्यावरील शुभदायक आकृती
८१) कौशल्य, अंगी असणारे गुण
८२) घर, तीर्थक्षेत्र

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| फा | ■ | फ | ट | का | ■ | शि | ले | दा | र | ■ | उ | पा | स | मा | र |
| र | ■ | त | ■ | र | प | का | ■ | म | ■ | व | त्स | ल | ■ | ■ | ब्बी |
| क | न | वा | ळू | ■ | द | री | ■ | ट | ■ | ■ | व | न | वा | स | ■ |
| त | ■ | ■ | ■ | पू | र | ■ | उ | णे | ■ | च | मू | ■ | रे | व | ती |
| ■ | प | र्या | य | ■ | व | र | द | ■ | मं | ■ | र्ति | ■ | मा | त | ■ |
| मा | रा | ■ | ■ | द | ■ | ■ | ब | ■ | द | ही | ■ | पा | प | ■ | र |
| ■ | धी | रो | दा | त्त | ■ | ब | त्ती | ■ | ग | ■ | भा | ऊ | ■ | अ | ज |
| पु | न | व | ■ | क | म | ळ | ■ | ■ | ती | ■ | ग | णे | श | वा | त |
| ण्य | ■ | ण | ■ | ■ | का | क | र | व | ■ | खा | ■ | आ | व | क | ■ |
| ति | थी | ■ | ■ | श | ■ | ट | ■ | र्गी | ■ | री | ■ | ठ | ■ | ■ | वे |
| थी | ■ | म | ज | कू | र | ■ | श | य | न | क | क्ष | ■ | पु | ष्क | ळ |
| ■ | म | धु | ■ | न | वा | ग | त | ■ | पुं | ■ | ■ | शु | ष्क | ■ | ■ |
| ख | जु | रा | हो | ■ | ळ | ■ | पा | र | स | नी | स | ■ | र | वं | थ |
| व | र | ■ | का | स | ■ | दं | व | ■ | क | ल | ह | ■ | ■ | ग | र |
| ख | ■ | नि | यं | त्र | क | ■ | ली | न | ■ | म | का | ■ | म | ण | का |
| व | जा | ■ | त्र | ■ | स | भा | ■ | ग | वा | ■ | र | म | ण | ■ | प |

Uday Munde - 8446302691

# अण्णासाहेब पाटील महामंडळाची व्याज परतावा योजना

## १५ लाख कर्जावर ४.५० लाखांपर्यंतचा परतावा, मराठा प्रवर्गातील उमेदवारांना लाभ

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. ३१ :** मराठा समाज व ज्या प्रवर्गाकरीता स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ अस्तित्वात नाही, अशा प्रवर्गातील होतकरू युवकांना स्वत:चा उद्योग, व्यवसाय सुरु करता यावा, यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्यावतीने वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना राबविली जाते. या योजनेतून १५ लाखापर्यंत कर्ज दिले जातात. विशेष म्हणजे या कर्जावर चार लाख लाख ५० हजारापर्यंत परतावा करण्यात येतो.

वैयक्तीक परतावा योजनेंतर्गत उद्योग, व्यवसायासाठी पूर्वी १० लाखापर्यंत कर्ज दिले जात होते. आता ही मर्यादा १५ लाखापर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे या कर्जातून मोठ्या स्वरूपाचे व्यवसाय होतकरू युवक उभारू शकतात किंवा अस्तित्वातील व्यवसायाची वाढ करता येऊ शकते.

महामंडळाच्या गट प्रकल्प कर्ज व्याज परतावा योजनेप्रमाणेच या योजनेसाठी कागदपत्रांची आवश्यकता आहे. त्यात लाभार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व स्वत: ई-मेल आयडी जोडलेले आधारकार्ड, रहिवासी पुरावा म्हणून रहिवासी दाखला, लाईट बील, रेशनकार्ड, गॅस बिल, बँक पासबुक, उत्पन्नाचा पुरावा म्हणून उत्पन्न दाखला, आयटी रिटर्न तसेच जातीचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, प्रकल्प अहवाल आदी कागदपत्र आवश्यक आहे. योजनेची सविस्तर माहिती संकेतस्थळावर तसेच महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात उपलब्ध आहे.

उद्योग, व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जावर अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्यावतीने १२ टक्के दराने दरसाल दरशेकडा याप्रमाणे व्याज सवलत दिली जाते. ही सवलत १२ टक्के किंवा जास्तीत जास्त चार लाख लाख ५० हजार मर्यादेपर्यंत मंजूर केली जाते. व्याज परताव्याचा लाभ मिळविण्यासाठी लाभार्थ्याने वेळेत कर्जाचा हप्ता भरणे आवश्यक आहे. व्याज परतावा कालावधी जास्तीत जास्त ७ वर्ष असा आहे. वेळेत हप्ता भरल्यानंतर व्याज परताव्याची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते. हे कर्ज लाभार्थ्याने पात्र बँकेमार्फत फक्त उद्योग व्यवसायासाठी घेतलेले असावे, तरच परताव्याचा लाभ दिला जातो. योजना प्रामुख्याने मराठा प्रवर्गाकरीता तथा ज्या प्रवर्गाकरीता स्वतंत्र महामंडळ अस्तित्वात नाही, अशा प्रवर्गातील होतकरून उद्योग, व्यवसाय स्थापण्याची महत्वाकांक्षा असलेल्या लाभार्थ्यांसाठी राबविली जाते. योजनेसाठी कौटूंबिक वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या आत असावे. उत्पन्नाचा पुरावा म्हणून तहसिलदाराचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. लाभार्थ्याने स्थायिक, कार्यरत असलेल्या बँकेकडून कर्ज घेणे अनिवार्य आहे. दिव्यांग व्यक्तीला योजनेंतर्गत लाभ घ्यावयाचा असल्यास तो मानसिकदृष्ट्या सक्षम असावा.

## अडान नदीच्या पुरात व्यक्ती वाहून गेला



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बोरी (अरब), दि.३१:** बोरी येथील 'पत्रे टेलर'नावाने ओळखला जाणारा व्यक्ती अडान नदीच्या वाढलेल्या प्रवाहात वाहून गेला. शनिवारी (दि. ३०) सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास जुन्या पुलावर ही दुर्दैवी घटना घडली. बेलपत्र विसर्जित करण्यासाठी ते पाण्यात उतरले होते. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

उपस्थितांनी त्यांना पाण्यात उतरण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी कुणाचेही ऐकले नाही. एका व्यक्तीने पुढे होऊन त्यांना वाचविण्याचाही प्रयत्न केला, परंतु त्यांनी त्याचा हात झिडकारून दिला आणि पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे ते वाहून गेले. घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने शोधकार्य सुरू केले आहे. मात्र, रात्री उशिरापर्यंत त्यांचा शोध लागलेला नव्हता. या घटनेमुळे बोरी (अरब) परिसरात शोककळा पसरली आहे. नागरिकांनी अशा परिस्थितीत नदीपात्रात उतरण्याचे धाडस करू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## महत्त्वाचे

### अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या चौघांना अटक

**पांढरकवडा :** येथील बसस्थानकाजवळ पोलिसांनी अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या चार युवकांना ताब्यात घेतले असून, त्यांच्यावर एनडीपीएस कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, हे युवक बसस्थानकाजवळील महाकाल पान सेंटरच्या मागे बसून गांजासारख्या अमली पदार्थाचे सेवन करत होते. माहिती मिळताच पोलिस निरीक्षक दिनेश झांबरे यांनी तात्काळ पोलिस पथक घटनास्थळी पाठवून छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी चारही युवकांना रंगेहाथ पकडले.

पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या चारही आरोपींची नावे शादाब गफ्फार पोसवाल (लोहार लाईन), फैजल उर्फ फैसल नासिर उर्फ नजीर खान (गांधीनगर, पुसद), आकीब एहफाज मिर्झा (किसन पार्क) आणि अनुज राजू कनाके (निळकंठ नगर) अशी आहेत. पोलिस पथकाने घटनास्थळी पोहोचल्यावर पाहिले असता, हे सर्व युवक एका टेबलवर बसून आळीपाळीने चिल्लम पीत होते आणि त्यांच्या तोंडातून धूर निघत होता. पोलिसांनी त्यांना घेराव घालून ताब्यात घेतले. त्यानंतर या चारही युवकांना उप-जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर त्यांच्यावर एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला.

### ध्रुव निलेश जळमकर रायफल शूटिंगमध्ये जिल्ह्यात प्रथम



**कुरणखेड :** येथून जवळच असलेल्या अकोला येथे झालेल्या शालेय स्पर्धेमध्ये जय बजरंग कनिष्ठ महाविद्यालय कुंभारी येथील ध्रुव निलेश जळमकर या विद्यार्थ्यांनी रायफल शूटिंग मध्ये जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला असून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. ध्रुवला संस्थेचे अध्यक्ष नारायणराव गावंडे प्रकाश बिडकर शत्रुघ्न बिडकर, मुख्याध्यापक विलास इंगळे यांचे प्रोत्साहन तर क्रीडा शिक्षक बबलू तायडे यांचे मार्गदर्शन मिळाले असून त्याच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

### अखेर आजपासून 'दुरांतो' अकोल्याला थांबणार

**अकोला :** मुंबई-हावडा दुरांतो एक्सप्रेसला अखेर अकोला रेल्वेस्थानकावर आज १ सप्टेंबरपासून थांबा मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे अकोलेकरांची १६ वर्षांची प्रतीक्षा संपुष्टात आली. दुरांतोला अकोल्यात थांबा देण्यासाठी खासदार अनुप धोत्रे यांनी रेल्वे मंत्रालयात प्रयत्न केले. त्याला आता यश आले आहे. मुंबई आणि हावडाकडे जाणाऱ्या प्रवाशांना जलद प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

मुंबई-हावडा दुरांतो एक्सप्रेस अकोला रेल्वेस्थानकाला 'बाय-बाय' करून धावत होती. या गाडीला अकोल्यात थांबा देण्याची मागणी सातत्याने करण्यात आली. त्यानुसार गाडी क्रमांक १२२६१ / १२२६२ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हावडा दुरांतो एक्सप्रेसला अकोला जंक्शन रेल्वेस्थानकावर प्रायोगिक तत्त्वावर थांबा देण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला. हा थांबा १ सप्टेंबर २०२५ पासून पुढील आदेश येईपर्यंत सुरू राहील. गाडी क्र. १२२६१ मुंबई ते हावडा दुरांतो एक्सप्रेस अकोला येथे मध्यरात्री ००:४० वाजता येईल आणि ००:४२ वाजता पुढे रवाना होईल.गाडी क्र. १२२६२ हावडा ते मुंबई दुरांतो एक्सप्रेस अकोला येथे रात्री २३:५३ वाजता पोहोचेल आणि २३:५५ वाजता सुटेल. आठवड्यातून चार दिवस धावणाऱ्या दुरांतो एक्सप्रेसला अकोला येथे थांबा मिळाल्याने प्रवाशांना मुंबई आणि हावडा येथे जाण्यासाठी जलद व कमी थांब्यात पोहोचण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

## नगर पंचायतीने शिवछत्रपती चौकातील खड्डा बुजवला



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अजिंक्य भारत इम्पॅक्ट

**बाभूळगाव, दि. ३१ :** येथील शिवछत्रपती चौकामध्ये रस्त्यावर पडलेला मोठा खड्डा अखेर नगर पंचायतीने बुजवला आहे. या खड्ड्यामुळे दुचाकीस्वारांना वारंवार अपघात होत होते, ज्यामुळे नागरिक त्रस्त झाले होते. या गंभीर समस्येकडे नगरपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे 'एखादी मोठी दुर्घटना होण्याची प्रशासन वाट पाहत आहे काय?' असा प्रश्न उपस्थित केला जात होता. यावर 'अजिंक्य भारत'ने दिनांक ३१ ऑगस्ट रोजी बातमी प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या वृत्ताची दखल घेऊन नगर पंचायत प्रशासनाने तात्काळ हा खड्डा बुजवून नागरिकांना दिलासा दिला आहे.

बाभूळगाव येथील शिवछत्रपती चौकात, जो वार्ड क्रमांक १६ आणि ८ ला जोडतो, त्या रस्त्यावर सांडपाणी वाहून जाण्यासाठी सिमेंटची नाली बांधण्यात आली होती. मात्र, या नालीवरील रपटा खचल्यामुळे मोठा खड्डा पडला होता. यामुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनांची चाके वारंवार अडकत होती, ज्यामुळे अपघात घडत होते. भविष्यात कोणतीही मोठी दुर्घटना घडू नये, यासाठी 'अजिंक्य भारत'ने बातमीच्या माध्यमातून येथील वास्तव मांडले. बातमी प्रसिद्ध होताच नगर पंचायत प्रशासनाने तत्परता दाखवत तात्काळ कर्मचारी पाठवले आणि खचलेला रपटा दुरुस्त केला. नगर पंचायतीच्या या त्वरित कार्यवाहीमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. 'अजिंक्य भारत'ने केलेल्या पाठपुराव्यामुळे ही समस्या सुटली, अशी भावना नागरिकांमध्ये दिसून येत आहे.

## मातृवंदनला महिनाभरापासून लागला ब्रेक

### नवीन लाभार्थी प्रक्रिया ठप्प : अनुदानाचीही प्रतीक्षा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३१ :** प्रधानमंत्री मातृवंदना योजनेला महिनाभरापासून ब्रेक लागला आहे. गत १७ मार्चपासून योजनेचे कामकाज थांबले असून, नवीन अर्ज भरून घेणे किंवा निवड झालेल्या लाभार्थ्यांना लाभ देणे, ही सर्व प्रक्रिया ठप्प झाली आहे. नव्या रूपात ही योजना येणार असल्याचे सांगण्यात येत असले, तरी लाभार्थ्यांना मिळणारे अनुदान वाटप सध्यातरी थांबले आहे.

स्तनदा माता यांना सकस आहार घेण्यास प्रोत्साहित करून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी, तसेच जन्माला येणाऱ्या नवजात बालकांचे आरोग्य सुधारावे आणि मातामृत्यू व बालमृत्यू दरात घट होऊन तो नियंत्रणात राहावा, या उद्देशाने प्रधानमंत्री मातृवंदना योजना राबविली जाते. आत्तापर्यंत जिल्हाभरात हजारो महिलांनी लाभ घेतला आहे. ही योजना आरोग्य विभागाकडून राबविण्यात येत असून, ही योजना महिला बालकल्याण विभागाकडे हस्तांतरित करण्याबाबत केंद्राने सूचना केल्या. परंतु महिला बालकल्याण विभागाची ग्रामीण भागात यंत्रणा नसल्याकारणाने आरोग्य विभागाकडेच ही योजना ठेवली आहे. आशा सेविका लाभार्थ्यांकडून अर्ज भरून घेतात.

### असा मिळतो लाभ

यापूर्वी तीन टप्प्यांत म्हणजेच मासिक पाळीच्या शेवटच्या तारखेपासून १५० दिवसांमध्ये गर्भधारणा नोंदणी केल्यावर पहिला १,००० रुपयांचा हप्ता जमा केला जातो. गर्भधारणेचे सहा महिने पूर्ण झाल्यावर दुसरा २,००० रुपयांचा हप्ता जमा केला जातो. अपत्याची जन्म नोंदणी व प्राथमिक लसीकरण झाल्यावर तिसरा २,००० रुपयांचा हप्ता बँक खात्यात जमा होतो.

यापुढे लाभार्थ्यांनादेखील थेट ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. या अनुषंगाने शासनस्तरावर योजनेत काही बदल करण्याचे काम सुरू असल्याची माहिती आहे.

## चक्रानुक्रमाने जिल्हा परिषदेच्या ५९ पैकी ४६ गटाला बसणार फटका?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अमरावती, दि. ३१ :** ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती गट-गणांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी राखीव जागांचे चक्रीय आरक्षण संपुष्टात आणून लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने नव्याने आरक्षण सोडत काढली जाणार आहे; परंतु आरक्षणाच्या नवीन फॉर्म्युल्याचा जिल्हा परिषदेतील मातब्बर सदस्यांना फटका बसणार आहे. वर्षानुवर्षे वाट बघत असताना आरक्षणाने घोळ घातल्याची भावना या मातब्बरांकडून व्यक्त होऊ लागली आहे. आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका आणि त्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाद्वारे १४ तालुक्यांत होणार गटाच्या आरक्षणात बदल आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शासनाने आरक्षणाचा नवीन फॉर्म्युला बदलला आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील १४ तालुक्यांत असलेल्या जिल्हा परिषदेच्या गटात अनेक बदल होणार आहेत.

ग्रामविकासच्या २० ऑगस्टला जारी केलेल्या अधिसूचनेमुळे अन्याय झाल्याची ओरड निर्गमित केलेल्या निर्णयाने जिल्हाभर खळबळ उडाली असून, गत तीन-चार वर्षांपासून तयारी केलेल्या कार्यकर्त्यांच्या तयारीवर पाणी फेरले गेल्याचे विदारक चित्र आहे. दि.२० ऑगस्ट रोजी शासनाने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील आरक्षणासंदर्भात नवीन शासन निर्णय करून अधिसूचना जारी केली आहे. प्रस्तुत नियमामुळे सन २००२ पासून सुरू असलेला आरक्षणाचा चक्रानुक्रम स्थगित झाला असून, आता नव्याने आरक्षण पहिल्यापासून सुरू होण्याचे संकेत आहेत. या नियमाने पंचायतराज व्यवस्थेने सत्तेतील सहभाग शेवटच्या घटकांपर्यंत आरक्षणाच्या उद्दिष्टाला छेद गेल्याचे बोलले जात आहे, तसेच १९९६ चा यासंदर्भातील नियम अधिक्रमित करून २० ऑगस्टचा नियम लागू झाल्यानंतर आगामी निवडणूक ही पहिली निवडणूक समजण्यात येईल, असे स्पष्ट म्हटल्यामुळे पूर्वीचा चक्रानुक्रम रद्द झाला आहे. यामुळे जिल्ह्यातील ४६ प्रभागावर याचा विपरीत परिणाम होणार आहे. ज्या ठिकाणी ६५ वर्षे अनु जाती व अनु, जमातीचे आरक्षण देण्यात आलेले नाही. त्याच ठिकाणी यापुढे २५ वर्षे ते येणारच नसल्याने अन्याय होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## प्राचार्या रचना गोरदवार ठरल्या 'बेस्ट प्रिंसीपल ऑफ दि ईयर'च्या मानकरी!

### सेंट जोसेफ स्कूलला आणखी एक सन्मान

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३१ :** बार्शिटाकळी तालुक्यातील हातोला येथे ग्रामीण भागात अल्पावधीतच लोकप्रिय ठरलेल्या सेंट जोसेफ इंग्लीश स्कूल अॅण्ड कॉलेजला आणखी एक सन्मान प्राप्त झाला आहे. या शाळेच्या प्राचार्या रचना गोरदवार यांना बेस्ट प्रिंसीपल ऑफ दि ईयर या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने नुकतेच नवी दिल्ली येथे शानदार सोहळ्यात राष्ट्रीय पातळीवरील मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार केवळ माझा नसून, शाळेतील सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि पालकवर्ग यांचाही त्यात सिंहाचा वाटा आहे, हा पुरस्कार स्वीकारतानाचा क्षण माझ्या शैक्षणिक कारकिर्दीतील सर्वात अमूल्य असा क्षण होता, या पुरस्कारामुळे मला शैक्षणिक क्षेत्रात आणखी जोमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळाली, असे प्राचार्या रचना गोरदवार यांनी




सांगितले.

रचना गोरदवार यांना हा मानाचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार दिल्ली येथील दि इंडियन स्कूल अवॉर्ड संस्थेच्यावतीने देण्यात आला आहे. भारताची संस्कृती आणि सभ्यतेचा वारसा डोळ्यासमोर ठेवून बार्शिटाकळी सारख्या ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या मुलांना दर्जेदार आणि उत्तम शिक्षण तसेच स्कूल बस आणि इतरही आधुनिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रचना गोरदवार यांनी केलेल्या अथक परिश्रमाची पावती म्हणून आणि त्यांच्या या अतुलनीय आणि लक्षवेधी शैक्षणिक कार्याची दखल घेत हा मानाचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार दिल्ली येथील दि इंडियन स्कूल अवॉर्ड संस्थेच्यावतीने देण्यात आला आहे. ग्रामीण भागातील मुलांचे शैक्षणिक भविष्य उज्वल व्हावे हा मुख्य सामाजिक दृष्टिकोन समोर ठेवून लाईव्ह क्लासेसचे व्हिडिओ आणि इतरही अभ्यासपूर्ण माहिती मुलांना उपलब्ध करुन दिल्याने मुलांमध्ये आलेला स्मार्टनेस या सर्व बाबीची दखल घेत रचना गोदरवार यांना बेस्ट प्रिंसीपल ऑफ दि ईयरच्या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.




खरेतर या सर्व बाबी ग्रामीण भागात राबविणे आणि मुलांना उपलब्ध करुन देणे म्हणजे तारेवरची कसरतच आहे परंतु सेंट जोसेफ स्कूल या परीक्षेत खरी उतरली आहे. शाळेचा सन्मान वाढविणारा हा पुरस्कार प्राप्त केल्याबाबत शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मंडळीनी रचना गोरदवार यांचे कौतुक करीत त्यांना शुभेच्छा प्रदान केल्या आहेत.

### बेस्ट स्कूल फॉर सोशल इम्पॅक्ट इन रुलर एरिया पुरस्कार!

दि सेंट जोसेफ इंग्लीश मंडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने २०२५ या वर्षीच्या बेस्ट स्कूल फॉर सोशल इम्पॅक्ट इन रुलर एरिया या राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारावर आपले नाव कोरल्याने या शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. दरम्यान, या शाळेने ग्रामीण भागात प्रथमच मुलांसाठी स्कूल बस आणल्याने गरीब शेतकऱ्यांच्या मुलांचा आनंद ओसंडून वाहात आहे.

## उमरा कापसे गावात खुलेआम दारू विक्री

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अनसिंग, दि. ३१ :** अनसिंग येथुन जवळ असलेल्या उमरा कापसे गावातील समाजजीवनाचे अध:पतन करणारी दारू विक्री उघड्यावर सुरू असून प्रशासन व पोलीस याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहेत. भागवत कापसे या सामाजिक कार्यकर्त्यांनी याबाबत ठाणेदारांना दिलेल्या निवेदनातून गंभीर आरोप करत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. मात्र ठाणेदारांकडून सातत्याने होणाऱ्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

गावातील मुख्य चौक, वस्ती परिसर तसेच शाळामंदिराजवळदेखील उघड्यावर दारू विक्री चालत असल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे शालेय विद्यार्थी, महिलावर्ग व शेतकरी वर्गासमोर गंभीर समस्या निर्माण झाली आहे. युवक दारूच्या आहारी जाऊन कुटुंब उद्ध्वस्त होत असून समाजात गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी मिळत असल्याचा आरोप भागवत कापसे यांनी केला.

दारूबंदी कायद्याला फाटा देत गावातील काही व्यक्ती निर्भयपणे धंदा करत आहेत. पोलीस ठाण्यात वारंवार लेखी तक्रारी दिल्यानंतरही कार्यवाही होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये पोलिसांविषयी अविश्वास निर्माण झाला आहे. ''कायद्याचे उल्लंघन उघड्यावर होत असताना ठाणेदार मुकदर्शकाची भूमिका घेत आहेत. आम्ही वारंवार निवेदने दिली तरी कारवाई न होणे हे जनतेची थट्टा करण्यासारखे आहे,'' असा आरोप भागवत कापसे यांनी केला.

ग्रामस्थांनी आता दारूबंदीची अंमलबजावणी करण्यासाठी एकत्र येऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. ''जर पोलिसांनी तातडीने कारवाई केली नाही, तर आम्ही मोठ्या प्रमाणावर रास्ता रोको, ठाण्याला घेराव अशा तीव्र आंदोलनात्मक पावले उचलू,'' असा इशारा नागरिकांनी दिला.

५४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना सन २०२५ (फक्त सभासदांकरिता)

**मोर्णा मत्यव्यवसाय सहकारी संस्था मर्या, पातूर र. नं. ३१३ ता. पातूर जि. अकोला.**

याव्दारे सभासदांना सूचित करण्यात येते की, मोर्णा मत्स्य संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २०/९/२०२५ ला दु. १.०० वा. संस्थेच्या कार्यालयात भोईपुरा पातूर येथे संस्था अध्यक्ष मी मनोहर उत्तमराव सौंदळे यांच्या अध्यक्षतेसाठी पुढिल विषयांचे कामकाज करणे करिता आयोजित केलेल्या सभेला वेळेवर उपस्थित राहण्याची विनंती आहे.

जा.क्र./ वासस/मो/२/२०२५

**सभेपुढील विषय** दि. ०१/९/२०२५

१) मा. सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) वार्षिक जमाखर्चास मंजूरात देणे.
३) आर्थिक पत्रकास मंजूरात देणे.
४) अंकेक्षण अहवाल वाचून दोष दुरूस्तीस मान्यता देणे.
५)संस्थेच्या मालकीचे मत्स्य विक्री केंद्र चालू करणे बाबत.
६)राखीव निधीची तरतुद करणे बाबत.
७)मासेमारी कमिशन दर, मासोळी प्रकार व प्रतवारी नुसार ठरविणे बाबत.
८)संगणक व झेरॉक्स संच खरेदी करणे बाबत.
९)मा.अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय.
टिप :-कोरम अभावी तहकूब सभा त्याच ठिकाणी त्या दिवशी अर्ध्यातासाने घेण्यात येईल. सदर सभेला कोरमची आवश्यकता भासणार नाही.

**नियम व अटी**

१) संस्थेच्या कामकाजाविषयी प्रश्न विचारायचे असल्यास लेखी स्वरूपात सभेच्या आठ दिवस अगोदर कार्यालयात द्यावे. वेळेवर कोणीही कोणत्याही प्रश्नांना उत्तर देता येणार नाही.
२) शांतता भंग करणे, गैरवर्तन, नशापाणी किंवा संस्थेची विनाकारण बदनामी होईल असे कोणतेही वर्तन केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

मा. अध्यक्ष तथा कार्यकारीणी यांच्या मान्यतेने

प्रत. माहितीस्तव सविनय सादर
१ ) मा. स.नि. (दुग्ध) सह. संस्था अकोला
२) मा. सआम (ता) अकोला.
३) मा. जि.वि.ले.प. क्षेणी २ (पद्युम) अकोला
४) मा. अध्यक्ष अकोला जिल्हा मत्स्य व्यवसाय संस्था

**अध्यक्ष**
**मनोहर उत्तमराव सौंदळे**
**मोर्णा मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था मर्या.. र.नं. ३१३, पातुर जि.अकोला**

## मांगल्य

### घंटानाद आणि महालक्ष्मी गीतांनी मंगलमय वातावरण

# घराघरात सुख-समृद्धी घेऊन आल्या गौरी लक्ष्मी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ३१ :** मंगरुळपीर तालुक्यात घरोघर सुख, शांती आणि समृद्धीचा ठेवा घेऊन येणारी महालक्ष्मी विराजमान झाली आहे. ''महालक्ष्मी कोण्या पावली आली, महालक्ष्मी सोन्याच्या पावली आली म्हणत महिलांनी पारंपरिक जरीकाठाचे वस्त्र परिधान करून गौरींचे आवाहन केले. ज्येष्ठा, कनिष्ठा गौरींचे स्वागत करण्यासाठी संपूर्ण कुटुंब सज्ज होते. घंटानाद आणि महालक्ष्मी गीतांनी मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. लक्ष्मीची पावले रांगोळीच्या माध्यमातून घरात मांगल्य घेऊन आली.

लक्ष्मींच्या स्वागतासाठी आधीपासूनच सज्ज असलेल्या मखरात डोळे दिपवणारी रोषणाई आणि सजावट लक्ष वेधत होती. पुढील दोन दिवस घरामध्ये वास्तव्य करणाऱ्या गौरी विराजमान झाल्या आहेत. भाकरी आणि मेथीच्या भाजीचा पहिला नैवेद्य या वेळी महालक्ष्मींना दाखवण्यात आला. मखरात खाद्यपदार्थ, धनधान्याची आरास लावण्यात आली होती.महालक्ष्मी पूजनाच्या दिवशी घराघरातून पुरणावरणाचा नैवेद्य दाखवण्यात येईल.

वाजत-गाजत आगमन काही घरांतून राशीच्या लक्ष्मी बसवण्यात आल्या. जरीकाठाच्या साड्या नेसलेल्या महालक्ष्मींचे लोभस रूप प्रसन्नता, मांगल्य घेऊन आल्याचा अनुभव अनेकांनी घेतला. महालक्ष्मी आवाहनाचा मुहूर्त संध्याकाळी ६.०७ वाजेपर्यंत असल्याने सायंकाळी अनेक घरांमध्ये लक्ष्मींना वाजतगाजत बसवण्यात आले.



### नैवेद्याच्या १६ भाज्या

पालक, मेथी, चुका, आळू, अंबाडी, पत्ताकोबी, फुलकोबी, लाल भोपळा, गिलके, दोडके, गवार, वालाच्या शेंगा, कारले, भेंडी, पडवळ, शेवग्याच्या शेंगा, सिमला मिरची, दुधी भोपळा, चाकी (चक्री), चवळीच्या शेंगा यांपैकी १६ भाज्या केल्या जातात.

महत्त्वाचे

## पॅट कमिन्सला विश्रांती देणार



**नवी दिल्ली :**ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाकडून मोठी बातमी समोर आली आहे. कांगारू संघाचा कर्णधार पॅट कमिन्स आगामी टी-२० मालिकेतून बाहेर पडण्याची शक्यता आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलिया न्यूझीलंड दौऱ्यासाठी संघाचा कर्णधार पॅट कमिन्सला विश्रांती देण्याच्या विचारात आहे. वर्षाच्या शेवटी खेळवण्यात येणाऱ्या नावाजलेल्या ॲशेस मालिकेसाठी त्याला तंदुरुस्त ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात येत आहे. यावेळी ॲशेस मालिका ऑस्ट्रेलिया आयोजित करणार आहे.कोड स्पोर्ट्सच्या अहवालानुसार, ३२ वर्षीय वेगवान गोलंदाज पॅट कमिन्सला कॅरिबियन दौऱ्यावरून परतल्यानंतर त्याच्या पाठीत जडपणा जाणवल्याचे समोर आले आहे. त्यामुळे तो सावधगिरीने स्कॅन करण्यात येणार आहे. कमिन्स वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अलिकडच्या पांढऱ्या चेंडूच्या सामन्यांत खेळला नाही.

## यश धुळचे दमदार शतक

**नवी दिल्ली :**सध्या दुलीप ट्रॉफीचा थरार सुरू आहे. या ट्रॉफीच्या क्वार्टर-फायनल-१ मध्ये तिसऱ्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर, उत्तर विभागाने सामन्यावर आपली पकड अधिक मजबूत केल्याचे दिसून आले आहे. तिसऱ्या दिवसाच्या खेळाच्या शेवटी संघाने एकूण ५६३ धावांची भक्कम आघाडी घेतली आहे. दुसऱ्या डावात दोन विकेट गमावल्यानंतर उत्तर विभागाने ३८८ धावा उभारल्या आहेत. त्यामुळे आता पूर्व विभाग आता परभवाच्या छायेत दिसत आहे.बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स ग्राउंडवर खेळवण्यात येत असलेल्या या सामन्यात, नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीला उतरेलल्या उत्तर विभागाच्या संघाने पहिल्या डावात ४०५ धावा उभारल्या होत्या. संघासाठी कन्हैया वाधवानने १५२ चेंडूत सर्वाधिक ७६ धावा केल्या. याशिवाय, आयुष बदोनीने ६० चेंडूत ६३ धावांची खेळी सकारली.

# आयुष बदोनीची दमदार द्विशतकी खेळी



**नवी दिल्ली : दि.३१ प्रतिनिधी**

बंगळुरूत सुरू असलेल्या दुलीप ट्रॉफीतील क्वार्टर फायनलच्या सामन्यात फलंदाजी करताना आयुष बदोनीच्या दमदार फलंदाजीची जादू पाहायला मिळाली आहे. ईस्ट झोनविरूद्ध फलंदाजी करताना त्याने दमदार द्विशतकी खेळी केली आहे. या स्पर्धेतील पहिल्या क्वार्टर फायनलचा सामना नॉर्थ झोन आणि ईस्ट झोन या दोन्ही संघांमध्ये पार पडला. हा सामना अनिर्णित राहिला.पण पहिल्या डावात घेतलेल्या भक्कम आघाडीच्या बळावर नॉर्थ झोनने या स्पर्धेतील सेमीफायनलमध्ये आपलं स्थान पक्क केलं आहे. नॉर्थ झोनकडून फलंदाजी करताना आयुष बदोनी द्विशतकं झळकावलं, तर यश धुल आणि अंकित कुमारने शतक पूर्ण केलं.नॉर्थ झोनने दुसऱ्या डावात फलंदाजी करताना ४ गडी बाद ६५८ धावा केल्या आणि ८३३ धावांची भक्कम आघाडी घेऊन डाव घोषित केला. इतक्या मोठ्या धावांचा डोंगर उभारण्यात आयुष बदोनीने अतिशय मोलाची भूमिका बजावली. त्याने २२३ चेंडूंचा सामना केला. यादरम्यान त्याने १३ चौकार आणि ३ षटकार खेचत २०४ धावांची खेळी केली. त्याने आपलं द्विशतक पूर्ण करताच नॉर्थ झोनच्या कर्णधाराने डाव घोषित करण्याचा निर्णय घेतला. शेवटच्या दिवशी सामन्याचा निकाल लागणं शक्य नव्हतं. त्यामुळे हा सामना अनिर्णित घोषित करण्यात आला. आयुष बदोनीने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही त्याने द्विशतक झळकावलं आहे.यासह नॉर्थ झोन संघाने दुलीप ट्रॉफी २०२५ स्पर्धेतील सेमीफायनलमध्ये प्रवेश केला आहे.या फेरीत नॉर्थ झोन संघाचा सामना साऊथ झोनविरूद्ध होणार आहे. हा सामना देखील बंगळुरूत खेळवला जाणार आहे. या सामन्यात नॉर्थ झोनच्या फलंदाजांचा बोलबाला पाहायला मिळाला.

**नॉर्थ झोनकडून फलंदाजी करताना कर्णधार अंकित कुमारने ३२१ चेंडूंचा सामना करत १९८ धावांची खेळी केली. तर यश धुलने १५७ चेंडूंचा सामना करत १३३ धावा चोपून काढल्या.नॉर्थ झोनच्या फलंदाजांनी ईस्ट झोनच्या फलंदाजांना सळो की पळो करून सोडलं. ईस्ट झोनकडून गोलंदाजी करताना सुरज सिंद्धू जैस्वाल, रियान पराग, मुख्तार हुसैन आणि उत्तर्ष सिंग यांनी प्रत्येकी १-१ गडी बाद केला. संघातील सर्वात अनुभवी गोलंदाज मोहम्मद शमीला दुसऱ्या डावात गोलंदाजी करताना एकही गडी बाद करता आलेला नाही. त्याने ११ षटकं गोलंदाजी केली. यादरम्यान त्याने ३६ धावा खर्च केल्या. या सामन्यातील पहिल्या डावात गोलंदाजी करताना त्याने २३ षटकात १०० धावा खर्च करून १ गडी बाद केला.**

## ललित मोदीने एस श्रीसंतच्या पत्नीला दिले उत्तर





**नवी दिल्ली : दि.३१ प्रतिनिधी**

सोशल मिडियावर सातत्याने व्हायरल होत असलेला हरभजन आणि श्रीसंत यांच्या कानशिलात मारलेला व्हिडीओ सोशल मिडियावर चर्चेचा विषय आहे. नुकत्याच झालेल्या मुलाखतीमध्ये ललित मोदी याने हा व्हिडिओ सोशल मिडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आणि त्यानंतर आणखी एकदा या व्हिडीओमुळे सोशल मिडियावरचा वाद पाहायला मिळाला आहे.
या व्हिडिओनंतर सोशल मिडियावर श्रीसंतची पत्नी भुवनेश्वरीने यावर टीका केली होती आणि ललित मोदीला खडेबोल सुनावले होते. त्यानंतर हा वाद इथेच थांबला नाही ललित मोदीने देखील यावर प्रतित्युतर दिले आहे. माजी आयपीएल कमिशनर ललित मोदी यांनी एस. श्रीसंतची पत्नी भुवनेश्वरी यांच्या टीकेला उत्तर दिले आहे. २००८ च्या आयपीएल स्लॅप-गेट स्कँडलचा न पाहिलेला व्हिडिओ रिलीज केल्याबद्दल भुवनेश्वरीने श्रीसंत आणि मायकेल क्लार्कवर निशाणा साधला होता. मोदी आणि क्लार्क यांनी पॉडकास्टवर मागील आयपीएल कार्यक्रमांवर चर्चा केली तेव्हा वाद सुरू झाला.

## निकोलस पूरनने रचला इतिहास!



**नवी दिल्ली : दि.३१ प्रतिनिधी**

विस्फोटक फलंदाज निकोलस पूरनने टी-२० क्रिकेटमध्ये आणखी एक मोठा टप्पा गाठला आहे. वयाच्या अवघ्या २९व्या वर्षी पूरन हा २०२० च्या दशकात ५०० पेक्षा जास्त षटकार मारणारा पहिला खेळाडू ठरला आहे. त्याने हा पराक्रम कॅरेबियन प्रीमियर लीग () २०२५ च्या १६व्या सामन्यात केला. त्रिनबागो नाइट रायडर्सचा कर्णधार पूरनने बार्बाडोस रॉयल्सविरुद्ध ६ षटकारांच्या जोरावर नाबाद ६५ धावांची खेळी केली.
यासह त्याने अवघ्या २७८ डावांत एका दशकात ५०० षटकार पूर्ण करण्याचा विक्रम केला. निकोलस पूरनने २०२० पासून दरवर्षी सातत्याने षटकारांचा वर्षाव केला आहे. २०२० मध्ये त्याने ४८ षटकार, २०२१ मध्ये ६६, २०२२ मध्ये ५८, २०२३ मध्ये ७७ आणि २०२४ मध्ये तब्बल १७० षटकार लगावले. यंदा, म्हणजेच २०२५ मध्ये, आतापर्यंत ४२ डावांत त्याने ८५ षटकार ठोकले असून, त्याचा एकूण षटकारांचा आकडा ५०४ वर पोहोचला आहे.निकोलस पूरन आता टी-२० क्रिकेटच्या इतिहासात एका दशकात सर्वाधिक षटकार लगणाऱ्या खेळाडूंच्या यादीत तिसऱ्या स्थानावर आहे. त्याच्यापुढे फक्त ख्रिस गेल आणि कायरन पोलार्ड आहेत. गेलने २०१० च्या दशकात ३६३ डावांत ९२० षटकार लगावले, तर पोलार्डने ४२७ डावांत ६१४ छक्के ठोकले. पूरनने ब्रेंडन मॅकक्लम (४०८) आणि आंद्रे रसेल (४०३) यांना मागे टाकले आहे.

## अक्षर पटेलवर दुहेरी संकट; टीम इंडियाचे उपकर्णधारपद गेले

**नवी दिल्ली : दि.३१ प्रतिनिधी**



आयपीएल २०२६ स्पर्धा सुरू होण्याआधीच मोठ्या घडामोडी घडायला सुरूवात झाली आहे. राजस्थान रॉयल्स संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी राजस्थान रॉयल्स संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला आहे. आता दिल्ली कॅपिटल्स संघाचा कर्णधार अक्षर पटेलबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. आगामी हंगामात अक्षर पटेलकडून कर्णधारपदाची जबाबदारी काढून घेतली जाऊ शकते. त्यामुळे तो केवळ अष्टपैलू खेळाडू म्हणून खेळताना दिसू शकतो.
येत्या काही दिवसात आशिया चषक २०२५ स्पर्धेचा थरार सुरू होणार आहे. २०२६ मध्ये होणाऱ्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर या स्पर्धेचे आयोजन टी-२० फॉरमॅटमध्ये केले जाणार आहे. या स्पर्धेत ८ संघ खेळताना दिसून येणार आहेत. ज्यात भारत, पाकिस्तानसह, श्रीलंका, अफगाणिस्तान, बांगलादेश, युएई, ओमान आणि हाँगकाँग या ८ संघांचा समावेश आहे. या स्पर्धेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघात अक्षर पटेलचा देखील समावेश करण्यात आला आहे. अक्षर पटेल याआधी भारतीय टी-२० संघाचा उपकर्णधार होता. मात्र ही जबाबदारी शुबमन गिलकडे सोपवण्यात आली आहे.आगामी हंगामात दिल्ली कॅपिटल्स संघाला नवा कर्णधार मिळू शकतो.
तो खेळाडू म्हणून संघात राहणार, पण त्याच्याकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली जाणार नाही. गेल्या हंगामात अक्षर पटेलकडे दिल्ली कॅपिटल्स संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली गेली होती.

## हॉकी आशिया कपमध्ये मलेशियाकडून गतविजेत्या कोरियाचा पराभव

**नवी दिल्ली : दि.३१ प्रतिनिधी**



भारतात सध्या बिहारमध्ये हॉकी आशिया कपचा थरार सुरू आहे. २९ ऑगस्टपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत धक्कादायक निकाल लागला आहे.
गतविजेत्या दक्षिण कोरियाला मलेशियाने मोठा धक्का दिला आहे. दक्षिण कोरियाची या स्पर्धेत पराभवाने सुरुवात झाली आहे. शनिवारी मलेशियाकडून दक्षिण कोरियाचा ४-१ ने पराभव करण्यात आला. त्याच वेळी, बांगलादेशने देखील चायनीज तैपेईला हरवून पहिला विजय नोंदवला आहे.दिवसाच्या पहिल्या सामन्यात बांगलादेश संघाने आपला दबदबा कायम ठेवला. बांगलादेश संघाने शेवटच्या दोन क्वार्टरमध्ये पाच गोलची कमाई केली. बांगलादेशकडून मोहम्मद अब्दुल्ला (४थे आणि २६वे मिनिट), रकीबुल हसन (४२वे आणि ४३वे मिनिट) आणि अशरफुल इस्लाम (४५वे आणि ५८वे मिनिट) यांनी प्रत्येकी दोन गोल केले तर सोहानूर सोबुज (३६वे मिनिट) आणि रेझाउल बाबू (५६वे मिनिट) यांनीही गोल केले. तर चायनीज तैपेईकडून त्सुंग-यू हसीह (१०वे आणि १८वे मिनिट) यांनी दोन गोल केले तर त्सुंग-जेन शिह (६०वे मिनिट) यांनी अंतिम हॉटरपूर्वी पेनल्टी कॉर्नरवर गोल केला.

## प्रताप सरनाईकांचा रॅपिडो, ओला, उबरला दणका!

**मुंबई:** राज्य शासनाने ई-बाईक टॅक्सी धोरण निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यानुसार संबंधित संस्थांनी परवाने काढून आपली ई -बाईक टॅक्सी सेवा सुरू करावी. मात्र, शासनाच्या आदेशाला न जुमानता परवान्या शिवाय अनाधिकृतपणे बाईक टॅक्सी सेवा सुरू असलेल्या रॅपिडो ,ओला, उबर या सारख्या कंपन्यावर मोटार परिवहन विभागामार्फत सातत्याने कारवाई सुरू राहील, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.मंत्री सरनाईक म्हणाले की, मुंबई महानगर परिसरात बाईक टॅक्सी ॲग्रिगेटर सेवा परवाना प्राप्त न करता सुरू ठेवण्यात आल्याच्या अनेक तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्या आहेत. शासनाने अशा सेवा परवाना मिळेपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश दिले असून, संबंधित ॲग्रिगेटर कंपन्यांनी त्यासंदर्भात प्रतिज्ञापत्रही देखील सादर केले होते. मात्र, आदेशाची पावती असूनही नियमांचे उल्लंघन करून सेवा सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे.यासंदर्भात दाखल झालेल्या जनहित याचिकेवर सध्या मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. ई-बाईक टॅक्सी ॲग्रिगेटर धोरण निश्चितीची नस्ती(फाईल) शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे विचाराधीन आहे. यावर लवकरच निर्णय होईल. तोपर्यंत संबंधित कंपन्यांनी आपली बाईक सेवा बंद ठेवून शासनाला सहकार्य करणे अभिप्रेत असताना, त्यापैकी रॅपिडो, ओला,उबर सारख्या कंपन्या शासनालाही न जुमानता आपली अनाधिकृत बाईक टॅक्सी सेवा सुरू ठेवत आहेत.

# टॅरिफमुळे अमेरिकन लोकांवर महागाईचा डोंगर कोसळला

## मोठ्या प्रमाणात कर लावल्याने दैनंदिन वस्तू महागल्या

**नवी दिल्ली : दि.३१ प्रतिनिधी**



अमेरिकेतील महागाई कमी करण्यासारख्या अनेक आश्वासनांच्या आधारे डोनाल्ड ट्रम्प यांनी निवडणूक जिंकली आणि दुसऱ्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. परंतु, निवडणूक जिंकल्यानंतर सामान्य अमेरिकन लोकांना महागाईपासून कोणताही दिलासा मिळताना दिसत नाही, उलट त्यांच्यावर महागाईचा भार सतत वाढत आहे.ट्रम्प यांनी वेगवेगळ्या देशांवर लादलेल्या मोठ्या शुल्कामुळे, आता अमेरिकन लोकांना खरेदी करण्यासाठी जास्त पैसे मोजावे लागत आहेत, ज्यामुळे कोणतीही आयात केलेली वस्तू त्यांच्यावर आर्थिक भार वाढत आहेवॉशिंग्टनच्या सिनेटर पॅटी मरे यांनी त्यांच्या एक्स वर म्हटले आहे की, ''आज, ट्रम्पमुळे, अमेरिकन लोक १९३३ नंतर सर्वाधिक कर भरत आहेत आणि ट्रम्पच्या करांमुळे सरासरी कुटुंबाला २,४०० चे नुकसान होईल. ट्रम्पमुळे, तुम्ही जवळजवळ प्रत्येक गोष्टीसाठी जास्त पैसे देत आहात.''यूएसडीए इकॉनॉमिक रिसर्च सर्व्हिसच्या ताज्या अन्न किंमत अंदाजानुसार, या वर्षी जून ते जुलै या कालावधीत एकूण अन्न ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) ०.२ टक्के वाढला आहे, जो एकूण चलनवाढीच्या अनुरूप आहे परंतु किरकोळ किमतींवर सतत वाढणारा दबाव दर्शवितो. या वर्षाच्या अखेरीस, अन्नाच्या किमती ३.४ टक्क्याने वाढण्याचा अंदाज आहे, जो २० वर्षांच्या ऐतिहासिक सरासरी २.९ टक्क्या पेक्षा जास्त आहे. या वाढीचा सर्वात जास्त फटका कमी उत्पन्न असलेल्या अमेरिकन आणि कुटुंबांना बसेल.भारताव्यतिरिक्त, डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडा आणि मेक्सिकोवरही मोठ्या प्रमाणात कर लादले आहेत. कॅनडा आणि मेक्सिको अमेरिकेला मोठ्या प्रमाणात कृषी उत्पादने निर्यात करतात. त्यामुळे अमेरिकेतील कृषी उत्पादनांच्या किमती थेट वाढतील. अमेरिकेने २०२३ मध्ये १९५.९ अब्ज डॉलर्स किमतीची कृषी उत्पादने आयात केली, ज्यामध्ये मेक्सिको आणि कॅनडाचा वाटा ४४ टक्के होता.येल बजेट लॅबच्या मते, अमेरिकेत अन्नधान्याच्या किमती एकूण २.८ टक्के वाढण्याची अपेक्षा आहे, ज्यामध्ये ताज्या उत्पादनात ४% वाढ होईल. घाऊक विक्रेते आणि किरकोळ विक्रेते यासारखे आयातदार जास्त खर्च ग्राहकांना देतात. अमेरिका त्याच्या ९४ टक्के कोळंबीसाठी (बहुतेक इक्वेडोर, भारत, इंडोनेशिया आणि व्हिएतनाममधून, ज्यावर १०-५० टक्के शुल्क आकारले जाते), ५५ टक्के ताजी फळे आणि ३२ टक्के ताज्या भाज्या आयातीवर अवलंबून असतात.

## चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट ४.४% पेक्षा जास्त होणार नाही–ठाकूर

**नवी दिल्ली : दि.३१ प्रतिनिधी**



भारत सरकार चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट ४.४% च्या आत रोखणार आहे. आतापर्यंत उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार ही तूट ४.४% पेक्षा जास्त होणार नाही, असे मत आर्थिक व्यवहार विभागाच्या सचिव अनुराधा ठाकूर यांनी व्यक्त केले आहे. ठाकूर यांनी सांगितले की, दरम्यानच्या काळामध्ये देशातील आणि परदेशातील परिस्थिती बिघडत चालली आहे. मात्र असे असले तरी आर्थिक शिस्तीबाबत केंद्र सरकार कसलेही तडजोड करणार नाही असा आपला इतिहास आहे. त्यामुळे वर्षाअखेर अर्थसंकल्पात ठरविल्याप्रमाणेच भारताची वित्तीय तूट ४.४% च्या आत राहील याबद्दल सरकारला विश्वास आहे. एकीकडे वित्तीय तूट मर्यादित ठेवत असतानाच पहिल्या तिमाहित भारताचा विकास दर तब्बल ७.८% इतका भरल्याबद्दल ठाकूर यांनी समाधान व्यक्त केले. आर्थिक शिस्तीमुळे अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होत नसतो हे भारताने दाखवून दिले आहे, असे त्या म्हणाल्या.आगामी काळात जीएसटी दर कपात झाल्यास देशांतर्गत विक्री वाढेल. त्यामुळे कंपन्या अधिक भांडवली गुंतवणूक करू शकतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## रूग्ण-केंद्रित इमेजिंगमध्ये परिवर्तन घडवून आणण्यास सज्ज

# सॅमसंग इंडियाने सीटी पोर्टफोलिओ केला लाँच!

**नवी दिल्ली : दि.३१ प्रतिनिधी**



सॅमसंग इंडियाने आपला नेक्स्ट-जेनरेशन मोबाइल सीटी उत्पादन पोर्टफोलिओ भारतात लाँच केला आहे, ज्यामध्ये रुग्ण-केंद्रित डिझाइन, एआय-सहाय्यक इमेजिंग आणि गतिशीलतेचा संगम आहे. सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स कंपनी लिमिटेडची उपकंपनी न्यूरोलॉजिका यांच्या सहकार्याने आणलेल्या या सीटी स्कॅनर श्रेणीमुळे रुग्णांना बेडवरच इमेजिंग सुविधा मिळणार असून, सुरक्षितता वाढेल आणि उपचार निर्णय जलद घेता येतील. हे सोल्यूशन्स मेट्रो तसेच ग्रामीण व दुर्गम भागातील रुग्णालयांनाही सक्षम करतील.या पोर्टफोलिओमध्ये सेरेटॉम एलाइट, ओम्नीटॉम एलाइट, ओम्नीटॉम एलाइट पीसीडी आणि बॉडीटॉम ३२/६४ यांचा समावेश आहे. सेरेटॉम एलाइट ८-स्लाइस स्कॅनर असून २ तास बॅटरी क्षमतेसह कार्यक्षम इमेजिंग करतो. ओम्नीटॉम एलाइटमध्ये ४० सेमी ओपनिंग, अल्ट्रा हाय रिझोल्यूशन मोड आणि १.५ तास बॅटरी क्षमता आहे, तसेच डीप ब्रेन स्टिम्युलेशनसारख्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याची क्षमता आहे. ओम्नीटॉम एलाइट पीसीडीमध्ये प्रगत फोटॉन काउंटिंग डिटेक्टर तंत्रज्ञान असून उच्च दर्जाचे इमेजेस आणि सुधारित आर्टिफॅक्ट रिडक्शन मिळते. बॉडीटॉम ३२/६४ हे पूर्ण शरीरासाठी डिझाइन केलेले ३२/६४ स्लाइस स्कॅनर असून ८५ सेमी ओपनिंग आणि १२ तास टिकणारी लिथियम पॉलिमर बॅटरी आहे.सॅमसंगचे मोबाइल सीटी सोल्यूशन्स न्यूरोसर्जरी, आपत्कालीन विभाग, ऑन्कोलॉजी, पीडियाट्रिक युनिट्ससह अनेक विभागांमध्ये उपयुक्त आहेत. इंटरव्हेंशनल रेडिओलॉजीमध्ये बायोप्सी, ड्रेनेज व ॲबलेशनसाठी हे स्कॅनर कार्यक्षम ठरतात, तर पेडियाट्रिक इमेजिंगसाठी सुरक्षित उपाय उपलब्ध होतो.सॅमसंग इंडियाच्या एमएमई बिझनेस प्रमुख अतनु दास गुप्ता यांनी सांगितले की, ''मोबाइल सीटी पोर्टफोलिओमुळे भारतात प्रगत वैद्यकीय इमेजिंग अधिक उपलब्ध होईल, आरोग्यसेवा प्रदात्यांना सक्षम करेल आणि रुग्ण निष्पत्ती सुधारेल.'' या सिस्टीम्स हॉस्पिटल पीएसीएस व ईएमआर सिस्टीम्ससोबत सहज एकत्रित होतात, ज्यामुळे जलद आणि अचूक निदान मिळते.

# खनिज संशोधनासाठी रातुम विद्यापीठ मध्यवर्ती केंद्र

## आयआयटी मुंबई येथील 'सेंटर ऑफ एक्सलन्स'च्या माध्यमातून करणार संशोधन

नागपूर, दि. ३१ प्रतिनिधी

**भारतातील महत्त्वपूर्ण खनिजांवरील संशोधनासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला 'मध्यवर्ती केंद्र' म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. आयआयटी मुंबई येथील सेंटर ऑफ एक्सलन्सच्या माध्यमातून खनिजांवरील संशोधन विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागात करण्यात येणार आहे. दरम्यान, नागपूर विभागासाठी ही एक मोठी शैक्षणिक संधी असल्याचे मत व्यक्त होत आहे.**




भारत सरकारच्या राष्ट्रीय महत्त्वपूर्ण खनिज मिशन (एनसीएमएम) अंतर्गत आयआयटी मुंबईला 'सेंटर ऑफ एक्सलन्स' म्हणून मान्यता मिळाल्यानंतर विद्यापीठाला शैक्षणिक संशोधनाचे 'मध्यवर्ती केंद्र' अशी मान्यता देण्यात आली आहे. खाण मंत्रालयाचे सचिव कंठा राव यांच्या हस्ते आयआयटी मुंबई येथील पहिल्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स' चे उद्घाटन पार पडले.

**एनसीएमएम म्हणजे...**

राष्ट्रीय महत्त्वपूर्ण खनिज मिशन ही भारत सरकारची एक महत्त्वाकांक्षी योजना असून जानेवारी २०२५ मध्ये याला मंजुरी दिली. सात वर्षांच्या योजनेसाठी सुमारे ३४,३०० कोटींचा खर्च मंजूर करण्यात आला आहे. योजनेचा उद्देश भारताची महत्त्वपूर्ण खनिजांवरील 'आयात अवलंबित्व' कमी करून स्वदेशी संशोधन, खणन, प्रक्रिया व पुनर्वापर वाढवणे हा आहे. शास्त्रज्ञ, अभियंते, भूगर्भशास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, धोरणकर्ते आदींच्या सहकार्याने महत्त्वपूर्ण खनिजांवरील आयात अवलंबित्व कमी होईल. शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातील समन्वयामुळे संशोधन थेट भागीदारांपर्यंत पोहोचेल यातून 'आत्मनिर्भर भारत'निर्माण करण्याच्या ध्येयास चालना मिळू शकेल.

> संशोधकांचा गट महत्त्वपूर्ण खनिजांवर काम करीत आहे. प्लॅटिनम गट खनिजे आणि दुर्मिळ पृथ्वी घटक यावर संशोधन केले आहे दख्खन पठारावर प्लॅटिनम गट खनिजांच्या शोधाबाबत अनेक शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. खाण मंत्रालयाद्वारे १६ सप्टेंबरला हैदराबाद येथे आयोजित एकदिवसीय परिसंवादात सर्व 'हब' आणि संशोधन केंद्रांना त्यांचे संशोधन सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. संपूर्ण प्रक्रिया गतीने सुरू असून,भारत लवकरच महत्त्वपूर्ण खनिजांमध्ये आत्मनिर्भर होईल.
>
> -डॉ. कीर्तीकुमार रणदिवे
> विभाग प्रमुख, पदव्युत्तर भूगर्भशास्त्र

**'हब आणि स्पोक'**

एनसीएमएम अंतर्गत मान्यता प्राप्त सेंटर ऑफ एक्सलन्स हे 'हब' म्हणून कार्य करेल आणि शैक्षणिक मध्यवर्ती संशोधन केंद्र आणि उद्योग यांच्याशी समन्वय ठेवेल. शैक्षणिक संशोधन केंद्र (स्पोक्स) : संशोधन, खनिजे शोधणे व त्यांच्या स्त्रोतांचा अभ्यास करतील. औद्योगिक स्पोक्स हे संशोधनातून तयार झालेले उत्पादन प्रत्यक्ष वापरातील आणतील. आयआयटी मुंबई सेंटर ऑफ एक्सलन्स असून, शैक्षणिक संशोधन केंद्रांमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, सीएसआयआर -निरी नागपूर, आयआयटी कानपूर, आयआयटी भुवनेश्वर, आयआयएसईआर पुणे, सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठ, अमिटी विद्यापीठ बेंगळुरू आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या संस्थांचा समावेश आहे. तसेच, औद्योगिक केंद्रांमध्ये हिंदाल्को, ओएलए, एव्हरग्रीन रिसायकल करो इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, मटेरियल रिसायकलिंग असोसिएशन ऑफ इंडिया, एमईसीएल,लोहूम, टेरो रिसायकलिंग प्रायव्हेट लिमिटेड, स्ट्रेक्स इनोव्हेशन प्रायव्हेट लिमिटेड आदींचा समावेश आहे.

# मानवतेच्या तस्करी विरोधातील चार स्तंभ

**विनिता वेद सिंगल (आयएएस)**
**प्रमुख सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, मुंबई**



मानव तस्करी आणि लैंगिक शोषण हे केवळ कायद्याच्या पुस्तकात नोंदवलेले गुन्हे नाहीत, ते समाजाच्या आत्म्यावर खोलवर उमटलेले ओरखडे आहेत. ती वेदना आहे जी निरागस मुलांचे हसू हिरावून घेते स्त्रियांचा सन्मान पायदळी तुडवते आणि समाजाच्या मूल्यांना हादरवते. या दुष्ट प्रवृत्तीविरुद्धची लढाई फक्त पोलिसांची जबाबदारी नाही,ती प्रत्येक संवेदनशील हृदयाची, प्रत्येक जागृत विवेकाची सामूहिक शपथ आहे.

नागपुरात राबवलेल्या 'ऑपरेशन शक्ती' या धाडसी उपक्रमाने दाखवून दिले आहे, की जेव्हा समाज आणि शासन खांद्याला खांदा लावून उभे राहतात, तेव्हा अन्यायाच्या खोल जखमाही भरून येऊ लागतात. या संघर्षाचे आधारस्तंभ चार खांबांसारखे वाटतात. १. प्रतिबंध २. भागीदारी, ३. संरक्षण आणि ४. खटला.

प्रतिबंध म्हणजे सर्वांत मोठा विजय़ जेव्हा एखादे मूल अंधाऱ्या जाळ्यात अडकण्याआधीच वाचते, जेव्हा एखादा विद्यार्थी फसवणुकीला बळी पडण्याआधीच जागृत होतो, जेव्हा एखादा समाज तस्करांच्या सावलीला ओळखून सजग होतो, तेव्हा तो खरा अभेद्य विजय असतो. कायदा जनजागृतीपेक्षा मोठा नाही आणि कोणतेही शस्त्र शिक्षणाइतके प्रभावी नाही. भागीदारी म्हणजे या संघर्षाची खरी ताकद. पोलिस, न्यायव्यवस्था, बालकल्याण संस्था, सामाजिक संघटना, शाळा, पत्रकारिता आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सामान्य जागृत नागरिक एकट्याने लढू शकत नाही; पण जेव्हा हे सारे हातात हात घालून उभे राहतात, तेव्हा ते मंदिराच्या भक्कम दगडांसारखे होतात आणि त्या एकात्मतेतून वाईटाविरुद्ध किल्ला उभा राहतो. संरक्षण ही केवळ सुटका नाही तर एका जखमी जीवाला पुन्हा आयुष्य देण्याची संधी आहे. डोक्यावरचे छप्पर, शाळेतील बाक, सहानुभूतीचा हात, पुनर्वसनातून मिळणारी प्रतिष्ठा ही दान नव्हे, तर त्यांचे जन्मसिद्ध हक्क आहेत आणि खटला म्हणजे न्यायाची चमचमणारी तलवार. ज्यांनी इतरांच्या दु:खातून नफा कमावला, त्यांनी कायद्याच्या कठोर शिक्षेला सामोरे गेलेच पाहिजे. कारण जेव्हा अन्यायी शिक्षा भोगतो, तेव्हा निरपराध पुन्हा एकदा विश्वासाने म्हणतो, हो, न्याय खरा आहे,तो जिवंत आहे.

पण या चार स्तंभांपलीकडे एक कोवळं सत्य आहे प्रत्येक वाचवलेले मूल स्वत:च्या अस्तित्वाची ओळख शोधत असते. आधार कार्डाशिवाय, नोंदीत नावाशिवाय ती मुलं समाजासाठी अदृश्य राहतात,शिक्षण, आरोग्य आणि आशेपासून वंचित. त्यांना ओळख देणे ही केवळ कागदोपत्री प्रक्रिया नाही, तो त्यांच्या आयुष्याला नवा श्वास देणारा पहिला टप्पा आहे. त्याचप्रमाणे शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी अद्वितीय ओळख क्रमांक तयार झाल्यास कोणतेही मूल सहज हरवणार नाही, तस्करीच्या जाळ्यात अडकणार नाही. आणि अनेक मुलांसाठी खरी मुक्ती म्हणजे कुटुंबाची ऊब. येथे 'कारा' आणि 'सारा'या संस्थांची पारदर्शक व मानवी दत्तक प्रक्रिया एका देवदूताच्या स्पर्शासारखी आहे. जेव्हा एखादे परित्यक्त मूल आईच्या कुशीत विसावते, तेव्हा त्याला केवळ घर मिळत नाही, तर भविष्य मिळते, जीवनाची नव्याने सुरुवात होते.

## महत्वाचे

### मनपाचे स्वच्छता दूत तैनात

**नागपूर :** लाडक्या बाप्पांच्या दर्शनासाठी येणाऱ्या नागरिकांना गणेशोत्सव मंडळ व परिसर स्वच्छ व सुंदर दिसावा याकरिता मनपाचे 'स्वच्छता दूत' कार्य करीत आहेत. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांचे मार्गदर्शन आणि अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी., अजय चारठाणकर यांच्या देखरेखीत नागपूर महानगरपालिकाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाद्वारे शहरातील विविध गणेशोत्सव मंडळांची नियमित स्वच्छता केली जात आहे. यात लक्ष्मीनगर झोन येथील ५ गणेशमंडळ, धरमपेठ झोन येथील ३३ गणेशमंडळ, हनुमाननगर झोन येथील ५ गणेशमंडळ, धंतोली येथील १० गणेशमंडळ, नेहरूनगर झोन येथील ९ गणेशमंडळ, गांधीबाग झोन येथील ५ गणेशमंडळ, सतरंजीपुरा झोन येथील ६ गणेशमंडळ, लकडगंज झोन येथील ६ गणेशमंडळ, आशीनगर झोन येथील ५ गणेशमंडळ, मंगळवारी झोन येथील ९ गणेशमंडळ येथील परिसरात मनपाच्या घनकचरा विभागातील सफाई कर्मचाऱ्यांकडून संपूर्ण स्वच्छता सकाळी ६ ते दुपारी २ या वेळेत तसेच दुपारी ४ ते रात्री १२ या वेळेत नियमितरित्या करण्यात येत आहे.

## गायीगुरांनी अडकवला रस्ता



**रामटेक : पशुपालकांच्या दुर्लक्षामुळे राज्य व अन्य महामार्गांवर गायी उभ्या राहून अख्खा रस्ताच अडवत आहेत त्यामुळे वाहनचालकांना वाहने चालवताना मोठी कसरत करावी लागत असल्याचे दिसून येते शनिवारी सकाळच्या सुमारास शीतलवाडी टी पॉईंट ते मौदा मार्ग गायीगुरांमुळे पूर्णपणे झाकला गेला होता. अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने संबंधित प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे.**

# ग्रामीण आरोग्य यंत्रणा बळकट करा; जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकाऱ्यांना कडक निर्देश

## ग्रामीण आरोग्य अभियानाच्या नियामक मंडळाच्या सभेत आढावा

नागपूर, दि. ३१ प्रतिनिधी

नागपूर जिल्ह्यातील नागरिकांना, विशेषत: ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विपीन ईटनकर यांनी केले.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या नियामक मंडळाच्या सभेत ते बोलत होते. बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार गहलोत, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड, डॉ. विजय डोइफोडे, डॉ. साजिद, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. रेवती साबळे, सहा.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.असीम इनामदार, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.गायकवाड, आयएपी अध्यक्ष डॉ.अलक कुमार तसेच विविध विभागांचे प्रमुख आणि अशासकीय सदस्य उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीला जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध योजना आणि उपक्रमांची सविस्तर माहिती सादरीकरणाद्वारे दिली. माता व बाल आरोग्य, लसीकरण, कुटुंब कल्याण कार्यक्रम, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम आणि आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. डॉ. विपीन ईटनकर म्हणाले, की ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सुलभ आणि प्रभावी करणे हे आपले सर्वांचे ध्येय आहे. आरोग्य उपकेंद्रे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक सोयीसुविधा, औषधांची उपलब्धता आणि मनुष्यबळाची पूर्तता यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात यावे. यावेळी त्यांनी आरोग्य निर्देशांकात सुधारणा करण्यासाठी सर्व अधिका०यांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, सभेत पुढील प्रमुख विषयांवर चर्चा करण्यात आली व महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. माता आणि बालमृत्यू दर: जिल्ह्याचा माता आणि बालमृत्यू दर कमी करण्यासाठी 'प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान' आणि 'जननी सुरक्षा योजना' यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी.

# विद्यार्थी शिष्यवृत्तीला मुकल्यास महाविद्यालय जबाबदार

## समाज कल्याण विभाग कार्यवाही करणार

नागपूर, दि. ३१ प्रतिनिधी

अनुसूचित जाती प्रवर्गातील हजारो विद्यार्थ्यांचे मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या महाविद्यालयांवर समाज कल्याण विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. महाविद्यालयांच्या हलगर्जीपणामुळे कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्तीला मुकल्यास, त्याला सर्वस्वी महाविद्यालयच जबाबदार असेल, असा खणखणीत इशारा विभागाने दिला आहे.

भारत सरकारच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत, नागपूर विभागातील २०२३-२४ आणि २०२४-२५ या सत्रांतील हजारो विद्यार्थ्यांचे अर्ज अद्याप प्रलंबित आहेत. २०२४-२५ सत्रातच, ३,१५६ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांनी पुढे पाठवलेले नाहीत. तर, चालू सत्रातही ३,४९८ अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत. समाज कल्याण विभागाने वारंवार सूचना देऊनही महाविद्यालयांनी याकडे कानाडोळा केल्याने, आता विभाग आक्रमक झाला आहे. प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुळकर्णी यांनी सांगितले की, २०२४-२५ मधील प्रलंबित अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२५ ही अंतिम मुदत देण्यात आली आहे. महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावरील 'समान संधी केंद्रां'मार्फत जनजागृती करून, विद्यार्थ्यांचे अर्ज तात्काळ सादर करावेत, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. ज्या महाविद्यालयांकडे अर्ज मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत, त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये, यासाठी विद्यार्थ्यांनीही विहित मुदतीत आपले अर्ज ऑनलाइन सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संत भोजाजी महाराज देवस्थान दर्शन

**नागपूर, दि. ३१ :** ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान नागपूर व अमरनगर ज्येष्ठ नागरिक मंडळ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ३० ऑगष्ट रोजी श्रीसंत भोजाजी महाराज देवस्थान आजनसरा दर्शनासाठी सहल आयोजित करण्यात आली सहलीत अशोक सांभारे, रामदास माहुरे, लांजेवार, अमरकर, मंचलवार, कांबळे, जयस्वाल, वरघट, डगवार, गोजे आदी ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अमरनगर मंडळाचे अध्यक्ष देविदास आगरकर, सचिव वसंतराव इझनकर, डॉ. राजेश कु०हाडे, रोहित शुक्ला यांनी सहकार्य केले सहलीकरिता प्रतिष्ठानचे सचिव राजू मिश्रा यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सहलीतील सर्व ३२ ज्येष्ठ नागरिकांना तुकाराम शेंडे यांनी अन्नदान केले.

## राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयातर्फे क्रीडा सप्ताह



नागपूर, दि. ३१ प्रतिनिधी

राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून नागपूर येथील राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयातर्फे क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. मंगळवार, (दि. २६) ऑगस्टपासून सुरू झालेल्या या सप्ताहात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. खेळ केवळ मनोरंजनासाठी नसून व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असल्याचा सूर समारोपीय कार्यक्रमात व्यक्त झाला.

बॅडमिंटन, टेबल टेनिस, व्हॉलीबॉल, कॅरम, बुद्धिबळ आणि रस्सीखेच अशा स्पर्धांमध्ये कर्मचाऱ्यांनी खिलाडूवृत्तीचे प्रदर्शन केले. समारोपावेळी बोलताना उप महासंचालक श्रीनिवास उप्पला यांनी खेळ मानसिक व शारीरिक विकासासाठी महत्त्वाचे असल्याचे सांगितले. संचालक रंगा श्रीनिवासुलु यांनी खेळातून जीवनात शिस्त आणि सांघिक कार्याला प्रोत्साहन मिळत असल्याचे नमूद केले. यावेळी विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. १९५० पासून कार्यरत हे कार्यालय देशव्यापी सर्वेक्षणातून धोरण निर्मितीस मदत करते.

## अपघातातील ट्रकचालक ताब्यात

**नागपूर, दि. ३१ :** अपघाताला कारणीभूत ठरलेल्या ट्रकचालकाला कोराडी पोलिसांनी ताब्यात घेतले. ही घटना शनिवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली. पोलिसांनुसार, फिर्यादीचे चुलत भाऊ राहुल इंदूरराज रांगडाळे (वय ३०, कोराडी) हे त्यांच्या चारचाकी वाहनातून सात प्रवाशांना घेऊन सुराबर्डी येथे जात होते. कोराडी ठाण्याच्या हद्दीतील नवीन आउटर रिंग रोड, चक्की खापा, भोसला मिलिटरी शाळेजवळील पुलाजवळ, एमएच-३१/ सीक्यू ७५४७ क्रमांकाच्या ट्रकचा चालक संजय खेमू पाटील (वय ४७, कोराडी, नागपूर) याने त्याचा ट्रक भरधाव वेगाने आणि चुकीच्या बाजूने चालवून राहुल रांगडाळे यांच्या वाहनाला धडक दिली. या अपघातात फिर्यादीचे भाऊ गंभीर जखमी झाले. जखमी राहुल रांगडाळे यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**पर्यावरणपूरक गणेशोत्सव...** मनपाच्या आवाहनाला नागपूरकरांचा उत्तम प्रतिसाद

# 'इको-फ्रेंडली गणेशोत्सव' स्पर्धेत ९२ मंडळांचा सहभाग

नागपूर, दि. ३१ प्रतिनिधी

**महानगरपालिकाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्यसाधून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याकरिता 'इको-फ्रेंडली गणेशोत्सव'स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.'आमचा बाप्पा - इको-फ्रेंडली' संकल्पनेवर आधारित स्पर्धेत शहरातील ९२ गणेशोत्सव मंडळांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला आहे यातील विजेत्या स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत.**



मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांचे मार्गदर्शन आणि अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी., अजय चारठाणकर यांच्या देखरेखीत मनपा प्रशासन पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी कार्य करीत आहे. 'आमचा बाप्पा - इको-फ्रेंडली' अभियानाअंतर्गत स्पर्धेचे आयोजन केले असून, प्रथम क्रमांकधारक विजेत्याला ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांक २१ हजार रुपये आणि तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या गणेशोत्सव मंडळांना ११ हजारांचे बक्षीस मिळणार आहे. याशिवाय उत्कृष्ट १० गणेशोत्सव मंडळांना प्रोत्साहनपर प्रत्येकी ५ हजार रुपयांचे बक्षीस मिळतील, असे उपायुक्त राजेश भगत व मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांनी सांगितले.

### मूल्यांकन असे ...

**कचऱ्याचे योग्य विलगीकरण (प्लास्टिक, कपडे, निर्माल्य, ई-कचरा आदी स्वतंत्र डब्यांत असावा), १० दिवसांत संकलित प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण (किलोमध्ये वजन नोंदवणे), मंडप सजावटीसाठी पर्यावरणपूरक तंत्रांचा वापर (प्लास्टिक व थर्माकोलचा वापर टाळणे), नागपूर मनपाच्या नियमांचे पालन, मंडपात नाविन्यपूर्ण उपक्रमाची अंमलबजावणी, पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची स्थापना ( मातीपासून बनवलेल्या मूर्ती), मंडप परिसरातील स्वच्छता, स्वच्छतेविषयी जनजागृती करणारे फलक/बॅनर लावणे आदी निकषांवर सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांची निवड होणार आहे.**

**पर्यावरणपूरकतेकडे कल**

स्पर्धक गणेशोत्सव मंडळांनी शाडू माती गणेश मूर्ती, स्वच्छता, पर्यावरण व निसर्ग, ग्रीन अँड क्लिन, प्लास्टिकमुक्त गणेश मंडळ आदी संकल्पनेवर मंडळांनी देखावे व मंडप तयार केले. यावरून मंडळांचा देखावे व मंडप तयार करण्याचा कल पर्यावरणपूरकतेकडे असल्याचे स्पष्ट होत आहे. सहभागी मंडळांचे परीक्षण समितीकडून होणार आहे.

# वेकोलि डुमरी सायडिंगमध्ये इलेक्ट्रिक व्हेईकलचे उद्घाटन

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती

नागपूर, दि. ३१ प्रतिनिधी




केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपूर येथील कामठीच्या वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड अंतर्गत डुमरी साईडिंग येथे इलेक्ट्रिक व्हेईकलचे उद्घाटन पार पडले.

कार्यक्रमाला राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान, वेकोलिच्या मनुष्यबळ विकास विभागाचे संचालक डॉ. हेमंत पांडे, इनलॅन्ड वर्ल्ड लॉजिस्टिकचे अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. पारंपरिक इंधनाच्या वापराऐवजी इलेक्ट्रिक, सौर उर्जा, हरित हायड्रोजन यासारख्या अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर केल्यास इंधनावर आयात करत असलेल्या मोठ्या रकमेवर आपल्याला बचत करता येईल. सध्या इलेक्ट्रिक वाहनांमध्ये असणाऱ्या लिथियम आयर्न बॅटरीची किंमत कमी झाल्याची माहिती केंद्रीय मंत्री गडकरी यांनी दिली. वेकोलिच्या मनुष्यबळ विकास विभागाचे संचालक डॉ. हेमंत पांडे यांनी सांगितले, की पहिल्यांदाच इलेक्ट्रिक व्हेईकल वेकोलिला प्राप्त झाली असून, याद्वारे निश्चितच प्रदूषणाच्या पातळीमध्ये घट होईल. इलेक्ट्रिक उर्जा ही पर्यावरणपूरक आहे या वाहनांमध्ये चालक आणि वाहकाला सुद्धा एक आरामदायक अनुभव मिळणार असल्याचे नमूद केले. दरम्यान, इनलॅन्ड वर्ल्ड लॉजिस्टिकच्या माध्यमातून २० इलेक्ट्रिक ट्रक वेकोलिच्या ताफ्यात दाखल झाले आहेत. यावेळी केंद्रीय मंत्री गडकरींच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून इलेक्ट्रिक ट्रक्स मार्गस्थ करण्यात आले.

Mrs Sunita Jatal Madam's
SHREE G-SQUARE GUIDANCE
9767930223
11th/ 12th — NEET /JEE /MHT- CET STATE BOARD
8th, 9th, 10th — STATE BOARD / CBSE FOUNDATION
•SBI बँकेच्या बाजूला भारत पेट्रोल पंप समोर,कौलखेड अकोला.
•चैतन्य कॉलनी,एकविरा ग्राउंड मागे, गौरक्षण रोड,अकोला

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, सोमवार, दि. १ सप्टेंबर २०२५ www.ajinkyabharat.com

OM COACHING CLASSES
COMPUTER SCIENCE
11th & 12th
Behind Tathod Mangal Karyalaya, Shastri Nagar, Akola,
Mrs. Anjali mam 9404845492

## महत्त्वाचे

### रन फॉर टोबॅको फ्री

**अकोला :** युवा व्यसनमुक्ती जन समिती व पोलीस दलाच्या मिशन उडान तर्फे रविवारी ''रन फॉर टोबॅको फ्री अकोला'' मिनी मॅरॅथॉनचे आयोजन करण्यात आले. वसंत देसाई स्टेडियमपासून हुतात्मा चौकापर्यंत तीन किमीच्या या शर्यतीत शेकडो युवक-युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शुभारंभ रामदासपेठ पोलीस स्टेशनचे पीआय शिरीष खंडारे यांनी हिरवी झेंडी दाखवून केला. मुलांच्या गटात ओम वाडेकर प्रथम, गौरव इंगळे द्वितीय तर गोविंदा टिकार तृतीय ठरले. मुलींच्या गटात प्राची कुचर विजेती ठरली, तर साक्षी माळी व साक्षी वानखेडे अनुक्रमे द्वितीय-तृतीय आल्या. विजेत्यांना पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी बक्षिसे प्रदान केली. व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी युवकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. समितीचे अध्यक्ष अमरदीप सदांशीव, समन्वयक गोपाल मुकुंदे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कुणबीसाठी दस्तावेजांची तपासणी

## दोन वर्षात १५ हजार दाखले जारी; जरांगेच्या आंदोलनामुळे जात प्रमाणपत्राचा मुद्दा चर्चेत

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. ३१ :** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी मुंबईत उपोषण सुरु केल्याच्या पृष्ठभूमीवर जातीच्या दाखल्यांचा विषय चर्चेत आला आहे. राज्य सरकारने कुणबी नोंदी तपासण्याची निर्णय घेतल्यानंतर अकोल्यातही नोंदी तपासण्याची प्रक्रिया पार पडली. दोन वर्षात आतापर्यंत १४ हजार ८०७ जणांना दाखले देण्यात आले आहेत. अशातच मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली गठीत वंशावळ समितीस शासनाने ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

मराठा समाजाला मराठा- कुणबी, कुणबी- मराठा जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. या समितीची व्याप्ती संपूर्ण राज्यासाठी वाढवण्यात आली. जिल्हा व तालुकास्तरावरील सर्व कार्यालयांमध्ये अभिलेख तपासणीची कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर आता शुक्रवारी मराठा समाजासाठी गठीत वंशावळ समितीस ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने जारी केला. ही समिती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या २५ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली होती. या समितीच्या कार्यकाळाला यापूर्वी ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर, मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आला होता. यास अनुसरून तालुकास्तरीय वंशावळ समितीस उच्चस्तरीय समितीच्या मुदतवाढीपेक्षा किमान सहा महिने अधिक मुदत देण्याचा विचार शासनाकडून करण्यात आला होता. त्यानुसार, आता या समितीचा कार्यकाळ ३० जून २०२६ पर्यंत वाढवण्यात आला आहे.

**हे पुरावे केले जमा**

शासनाच्या निर्देशानुसार अभिलेखांची तपासणी करण्यासाठी संबंधित विभागांचे अभिलेख कक्षास भेट देणे, संबंधित विभागाने सादर केलेली माहिती व अभिलेखांची तपासणी करणे ही संपूर्ण कार्यवाही या कक्षाद्वारे झाली. महसुली अभिलेख, शिक्षण विभाग, इतर शासकीय विभागाकडील अभिलेख वगळता कुणबी, कुणबी-मराठा, मराठा- कुणबी जातीचे अभिलेख किंवा पुरावे असलेल्या मागण्यात आले.

### असा आहे तपशील

२४ ऑक्टोबर २०२३पासून वितरीत करण्यात आलेल्या कुणबी, कुणबी-मराठा व मराठा जात प्रमाणपत्राचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| तालुका | | प्रमाणपत्र |
|---|---|---|
| अकोला | - | १९१६ |
| अकोट | - | २९७९ |
| बाळापूर | - | २२९४ |
| बार्शीटाकळी- | - | २२६३ |
| मूर्तिजापूर | - | १७९६ |
| पातूर | - | १२१५ |
| तेल्हारा | - | २३५४ |

### या आढळल्या नोंदी

४९ लाख ८ हजार ५७ विविध प्रकाराची कागदपत्रे (अभिलेखे) तपासल्यानंतर एकूण ४ लाख ८६ हजार ७३६ कुणबी नोंदी सापडल्या. जिल्ह्यात मराठी-कुणबी, कुणबी-मराठा अशा नोंदी नव्हे; तर केवळ 'कुणबी , अशीच नोंदी सापडल्या आहेत. ही प्रक्रिया २४ ऑक्टोबर २०२३पासून सुरु झाली.

### जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कक्षाची स्थापना

मराठा समाजाला मराठा- कुणबी, कुणबी- मराठा जात प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने अभिलेखांची तपासणी, तसेच नोंदी सादर करण्याच्या कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कक्षाची स्थापना करण्यात आली. तालुकास्तरावरही अभिलेखांची तपासणी झाली.

## जिल्ह्यातील धरणांमध्ये जलसाठ्यात वाढ; काटेपूर्णा व मोर्णा प्रकल्पांत विसर्ग सुरू

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ३१ :** जिल्ह्यातील प्रमुख पाटबंधारे प्रकल्पांची स्थिती आज स्थिर असून, काही प्रकल्पांत विसर्ग सुरू आहे. काटेपूर्णा प्रकल्पमध्ये साठा ८२.१७३ मिलियन घनमीटर (९५.१६%) असून दोन गेट उघडले आहेत; विसर्ग दर ९६.११ क्युबिक मीटर प्रति सेकंद आहे. मोर्णा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले असून ओतणी ५ सेमी, विसर्ग दर ३.५३ क्युबिक मीटर प्रति सेकंद नोंदले गेले आहे.

वान प्रकल्प (ता. तेल्हारा) मध्ये साठा ७३.०८ मिलियन घनमीटर (८९.१७%), गेट बंद असून विसर्ग शून्य आहे. निर्गुणा प्रकल्पमध्ये ओतणी २.५ सेमी, विसर्ग २.३४ क्युबिक मीटर प्रति सेकंद सुरू आहे. उमा व दगडपारवा प्रकल्पांत विसर्ग बंद असून साठा समाधानकारक आहे. मोरना प्रकल्पामुळे गांधीग्राम, बाळापूर व आसपासच्या भागांमध्ये पाणी वाढले असून अकोला-बाळापूर रस्ता बंद करण्यात आला आहे. प्रशासनाने काटेपूर्णा धरणाच्या गेट्स उघडण्याची गरज असल्यास नदीकाठावरील गावांना सतर्क राहावे असे निर्देश दिले आहेत.

पाटबंधारे विभागाने सांगितले की, जलसाठा व विसर्गावर दररोज लक्ष ठेवले जाते. शेतकऱ्यांसाठी ही वाढ आशादायक असली, तरी पूरस्थितीचा धोका लक्षात घेऊन नागरिकांनी सतर्क राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### मुख्य प्रकल्पांची स्थिती

| प्रकल्प | पातळी (मी) | साठा (मिल. घन मी) |
|---|---|---|
| काटेपूर्णा | 347.51 | 82.173 |
| वान (ता. तेल्हारा) | 410.18 | 73.08 |
| मोर्णा | 366.97 | 41.46 |
| निर्गुणा | 391.40 | 28.85 |
| उमा | 343.15 | 9.622 |
| दगडपारवा | 316.90 | 9.01 |

## अकोला गणपती दर्शन...



श्री.गणेश उत्सव मंडळ (डेल्टा) नेहरू पार्क चौक वर्ष. २९ अध्यक्ष.निखील आलीमचंदानि सचिव.विजय दोडेजा (छाया. संजय ताथुरकर)

## ६५० विद्यार्थ्यांनी घेतला पहिलीत प्रवेश

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ३१ :** महापालिकेच्या मराठी, हिंदी आणि उर्दू माध्यमाच्या एकुण ३१ शाळांमध्ये पहिल्या वर्गात (सीबीएसई पॅटर्न) ६५० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. सर्वात कमी प्रवेश हिंदी माध्यमात विद्यार्थ्यांनी घेतल्याने मनपा हिंदी शाळांचे भवितव्य धोक्यात आले आहे.

महापालिकेच्या एकुण ३१ शाळा आहेत. यापैकी केवळ एका शाळेत इयत्ता दहावी पर्यंत शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध होती. मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही व्यवस्था आता बंद झाली आहे. तर बोटावर मोजण्या इतक्या शाळांमध्ये सातवी पर्यंत तर काही शाळांमध्ये चौथी पर्यंत शिक्षणाची व्यवस्था आहे. महापालिका अस्तित्वात आल्या नंतर महापालिकेच्या एकूण ७५ शाळा होत्या. मात्र मागील २२ ते २५ वर्षांत ही संख्या ५० टक्के घटली आहे. त्यामुळे पहिल्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी महापालिकेला दरवर्षी धावपळ करावी लागते. कारण प्रत्येक शाळेचा बेस हा इयत्ता पहिली आहे. इयत्ता पहिल्या वर्गात अधिक विद्यार्थी मिळाल्यास पुढच्या वर्गातील विद्यार्थ्यांची काळजी नसते. परंतु आता हात मजुरी करणाऱ्या पालकांमध्येही शिक्षणाप्रती जागरुकता निर्माण झाली आहे. त्यामुळे बहतांश पालक आपल्या मुलाला इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळावे, यासाठी प्रयत्न करीत आहे. या कारणासह महापालिका शाळांचा खालावलेला शैक्षणिक दर्जा या कारणामुळे महापालिका शाळांमधील विद्यार्थी संख्या सातत्याने कमी होत चालली आहे. चालु शैक्षणिक वर्षांत देखील महापालिका शाळांना विद्यार्थी मिळवण्यासाठी धावपळ करावी लागली.

## इतिहास सांगणारे किल्ले आज मदतीच्या प्रतीक्षेत

### आज नाही जपले, तर उद्या फक्त पुस्तकांतच दिसतील किल्ले



। शरद शेगोकार ।

❑ असदगड किल्ला हा अकोल्याचा इतिहास सांगणारा सजीव पुरावा आहे. मात्र आज त्याची दयनीय अवस्था पाहून मन वेदनांनी भरते. प्रशासन व नागरिकांनी मिळून या वारशाचे जतन केले नाही, तर पुढच्या पिढ्यांना फक्त फोटो आणि किस्सेच उरतील.
**प्रा. राहुल माहुरे**

❑ अकोला जिल्ह्यातील किल्ले हा फक्त भूतकाळाचा अवशेष नसून आपला ऐतिहासिक वारसा आहे. मात्र दुर्लक्ष आणि योग्य संवर्धनाच्या अभावामुळे हे किल्ले ढासळत आहेत. शासनाने तातडीने संवर्धन योजना आखून पुढच्या पिढ्यांसाठी हा ठेवा जतन करणे गरजेचे आहे.
**प्रा. डॉ. एन. टी. वानखडे,** (इतिहासकार)

❑ बाळापूर किल्ल्याचा बुरुज कोसळला, पण प्रशासन झोपेतच आहे. हा फक्त दगडांचा ढिगारा नाही, तर आपला जिवंत इतिहास आहे. जर आज जतन केला नाही, तर उद्या मुलांना दाखवायला किल्लेही उरणार नाहीत.
**- आकाश कोकाटे,** नागरिक

**अकोला, दि. ३१ :** विदर्भातील अकोला जिल्हा ऐतिहासिक वारशाने समृद्ध असला तरी किल्ल्यांच्या संवर्धनाबाबत शासनाचा गंभीर निष्काळजीपणा उघड होत आहे. अकोला किल्ला (असदगड), बाळापूर किल्ला आणि नरनाळा किल्ला यांच्या तटबंदीला तडे गेले असून पावसामुळे भगदाडे वाढत आहेत. अलीकडे झालेल्या मुसळधार पावसात बाळापूर किल्ल्याचा काही भाग कोसळला. या घटनेतून शासन व पुरातत्त्व विभागाचे संपूर्ण दुर्लक्ष उघड झाले.

मोर्ना नदीकाठी वसलेला असदगड किल्ला स्थापत्य दृष्ट्या महत्त्वाचा असून त्याच्या तटबंदीचे काही भाग आधीच कोसळले आहेत. तर दहाव्या शतकातील वैभवशाली नरनाळा किल्ला दुर्लक्ष आणि हवामानाच्या तडाख्यामुळे झपाट्याने ढासळत आहे. या किल्ल्यांचे अवशेष आता धोकादायक अवस्थेत पोहोचले असून जिल्ह्याच्या ऐतिहासिक ओळखीला गंभीर धोका निर्माण झाला आहे. इतिहास अभ्यासक आणि नागरिकांच्या मते, किल्ले हे केवळ दगड-मातीचे ढिगारे नसून सांस्कृतिक ओळखीची जिवंत प्रतीके आहेत. संवर्धन न झाल्यास पुढील पिढ्यांना फक्त पुस्तकांतूनच त्यांची माहिती मिळेल. त्यामुळे शासनाने तातडीने सर्वेक्षण करून दुरुस्तीची कामे सुरू करावी आणि स्थानिक संस्थांच्या सहभागातून दीर्घकालीन संरक्षण योजना राबवावी, अशी मागणी होत आहे.

## अष्टविनायक दर्शन



### श्री गिरिजात्मज गणपती मंदिर

श्री गिरिजात्मज गणपती मंदिर लेण्याद्री हे महत्त्वाचे गणेश मंदिरांपैकी एक आहे आणि अष्टविनायक मंदिरांचा भाग आहे. या मंदिराचे दुसरे नाव गिरिजात्मज आहे, ज्याचा अर्थ गिरिजा (देवी पार्वती) यांचा पुत्र आहे. अष्टविनायकांच्या आठ मंदिरांपैकी हे टेकडीवरील एकमेव मंदिर आहे.

**श्री गिरिजात्मज गणपती मंदिर लेण्याद्री बद्दल**

आधी सांगितल्याप्रमाणे, गिरिजात्मज म्हणजे गिरिजाचा (पार्वतीचा) आत्मज (पुत्र). हे एका लहान टेकडीवर असल्याने, चालण्याची आवड असलेल्यांना ते ट्रेकिंगचा आनंद देते. लेण्याद्री
श्री वरदविनायक बौद्ध गुहांच्या ठिकाणी आहे. म्हणून याला गणेश गुफा असेही म्हणतात. अष्टविनायक यात्रेच्या शास्त्रोक्त क्रमानुसार, हे मंदिर सहावे आहे. या मंदिरात भगवान गणेशाचे प्रकटीकरण त्याच्या बालरूपात किंवा बाळाच्या रूपात आहे. म्हणूनच त्याला गिरिजात्मज म्हणतात.

**श्री गिरिजात्मज गणपती मंदिर लेण्याद्रीचा इतिहास**

असे मानले जाते की देवी पार्वतीने येथे 'तप' केली. या ठिकाणी गणेशाची उत्पत्ती झाली. हे एक अतिशय विलक्षण मंदिर आहे जिथे बौद्ध लेणी आणि एक हिंदू मंदिर एकत्र आहेत. या मंदिराची वास्तुकला सामान्य बौद्ध आहे. आणि हे मंदिर सामान्य हिंदू मंदिराच्या स्वरूपात नाही. म्हणूनच असे मानले जाते की या मंदिराचा इतिहास इसवी सनाच्या पहिल्या ते तिसऱ्या शतकापर्यंतचा आहे.
श्री गिरिजात्मज गणपती मंदिर लेण्याद्री येथे जाण्यासाठी ३०० किंवा त्याहून अधिक पायऱ्या चढाव्य लागतात.

**गिरिजात्मज गणपती मंदिराच्या आख्यायिका**

असे म्हटले जाते की पांडवांच्या अज्ञेयवासाच्या काळात (ज्या काळात ते इतरांपासून लपून राहायचे होते) हे मंदिर आणि इतर गुहा त्यांचे निवासस्थान होते. तसेच, असे मानले जाते की माता पार्वतीने संतती प्राप्तीसाठी १२ वर्षे येथे 'तप' केली. म्हणूनच मंदिरातील गणेश बालकाच्या रूपात दिसतो.



LOKESH ENGINEERING WORKS
श्री.गणेश उत्सवाच्या सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा
: MANUFACTURER OF:
✦Finger Machine ✦Fryums Machine ✦Cutter Machine
✦ Conveyor Machine ✦ Gun Metal ✦Mixture Machine
✦ Lining Finger Machine. ✦ Papad Machine
✦ Moulding Cast Iron & All types of Welding, Turning, Shaping Works.
Harihar Peth Road, Near Old Washim Naka, Akola - 444002 (MS) India
Ph: Off. (0724)-2432160, Mob.: 9823284970, 9823224970, 7030971717
Website: www.lokeshengineeringworks.com - For Enquiry: enquiry@lokeshengineeringworks.com
Email: tayade@lokeshengineeringworks.com, gajanantayde149@gmail.com
पंडीत रामभाऊ तायडे

## विदर्भातील प्रयोगशील शेतकरी व कृषी पदवीधरांचा गौरव!

### 'शेतकरी आयडॉल' व 'कृषी पदवीधर आयडॉल' जाहीर

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ३१ :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ''शेतकरी आयडॉल'' व ''कृषी पदवीधर आयडॉल'' या उपक्रमांतर्गत सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ या दोन महिन्यांसाठीचे आयडॉल जाहीर करण्यात आले आहेत.

भंडारा जिल्ह्यातील मु. डव्वा, पो. धारगांव येथील प्रयोगशील उद्योजक शेतकरी व सन २०२२ चे वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी प्रकाश गोपीचंद मस्के यांची ''शेतकरी आयडॉल'' म्हणून निवड करण्यात आली आहे. तर अमरावती जिल्ह्यातील मोर्शी येथील कृषी पदवीधर उद्योजक श्रीकांत रमेशपंत गणोरकर यांची ''कृषी पदवीधर आयडॉल'' म्हणून निवड झाली आहे. गत तीन वर्षांपासून कृषी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरु असून विदर्भातील गडचिरोलीपासून बुलढाणा पर्यंतच्या प्रक्षेत्रावर शेतकऱ्यांचा आणि कृषी पदवीधरांचा कार्यपरिचय देणारी होर्डिंग्स झळकत आहेत. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे प्रयोगशील, प्रगतिशील शेतकरी बांधव व कृषी पदवीधरांनी शास्त्रीय दृष्टिकोनातून व्यावसायिक शेती करताना घेतलेल्या यशाचा परिचय इतरांपर्यंत पोहोचविणे व त्यातून प्रेरणा निर्माण करणे. दर दोन महिन्यांनी एक शेतकरी व एक कृषी पदवीधर अशा स्वरूपात निवड प्रक्रिया पार पडते. ही निवड संबंधित कृषी विज्ञान केंद्रे व तत्सम संस्थांच्या सहकार्याने केली जाते. निवड झालेल्या शेतकरी व पदवीधरांच्या कार्याला प्रसिद्धी मिळावी यासाठी विद्यापीठाकडून संपूर्ण विदर्भभर त्यांच्या होर्डिंग्स लावण्यात येतात.

या उपक्रमाचे ध्येय फक्त गौरव करणे नसून इतर शेतकरी व पदवीधरांना व्यावसायिक शेतीकडे वळण्यासाठी प्रेरणा मिळावी, त्यांनी नोकरी मागणारे न होता नोकरी देणारे बनावे, यामधून शाश्वत ग्रामविकास साध्य व्हावा हा आहे.

## अनुकंपा धारकांच्या कागदपत्रांची पडताळणी

**अकोला :** जिल्हा परिषद अंतर्गत प्रलंबित अनुकंपाधारक उमेदवारांची ज्येष्ठता यादी प्रसिद्ध झाल्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाकडून अनुकंपा धारकांच्या कागदपत्रांची सुरू असलेली तपासणी अंतिम टप्प्यात आली आहे. या अनुकंपाधारकांना प्रशासनाकडून लवकरच नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. गेल्या काही वर्षांपासून जिल्हा परिषदेत अनुकंपा धारकांच्या नियुक्ती रखडल्या होत्या. अनुकंपा धारकांच्या या ज्वलंत प्रश्न मार्गी लावण्यासाठी यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या मार्गदर्शनात सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे यांनी पारदर्शक पद्धतीने ६३ उमेदवारांची ज्येष्ठता यादी संकेतस्थळावर प्रकाशित केली होती. यातील चतुर्थ श्रेणी, वर्ग तीनच्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसंदर्भात शासनाच्या निकषाप्रमाणे अनुकंपाधारकांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येत आहे. या कर्मचाऱ्यांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार विकल्प देण्यात येणार आहे. त्यानंतर अंतीम निवड यादी प्रकाशीत करून पात्र उमेदवारांची नियुक्ती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

# पोस्टाची रजिस्टर्ड पोस्ट सेवा आजपासून बंद!

## भारतीय टपाल खात्याचा निर्णय

। फुलचंद भगत ।




**मंगरुळपीर, दि. ३१ :** गेल्या काही वर्षांत रजिस्टर्ड पोस्टचा वापर सातत्याने कमी होत आहे.डिजिटल कम्युनिकेशन, खासगी कुरिअर आणि ई-कॉमर्स लॉजिस्टिक्समध्ये वाढ झाल्यामुळे या सेवेची मागणी कमी झाली आहे.त्यामुळे भारतिय टपाल खात्याने एक महत्वपुर्ण निर्णय घेतला आहे.भारतीय टपाल खात्याने आज १ सप्टेंबर २०२५ पासून रजिस्टर्ड पोस्ट सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय टपाल विभागाच्या आधुनिकीकरण योजनेचा एक भाग असून याचा उद्देश काम अधिक जलद चालवणे असा असल्याचे टपाल विभागाने स्पष्ट केले आहे. रजिस्टर्ड पोस्ट सेवा आता स्पीड पोस्टमध्ये विलीन केली जाईल. टपाल विभागाच्या या निर्णयामुळे सर्वात जुनी रजिस्टर्ड पोस्टसेवा इतिहासजमा होणार आहे.

टपाल विभागाच्या सचिव आणि महासंचालकांनी सर्व सरकारी कार्यालये, न्यायालये,शाळा-महाविद्यालये आणि मोठ्या प्रमाणात टपाल सेवा वापरणाऱ्यांना १ सप्टेंबरपर्यंत पूर्णपणे स्पीड पोस्टवर वळण्याचे निर्देश दिले आहेत. त्यांच्या मते स्पीड पोस्टमुळे डिलिव्हरी जलद होईल, ट्रॅकिंग चांगले होईल आणि कामकाजात अधिक पारदर्शकता येईल. रजिस्टर्ड पोस्ट सेवा १८५४ मध्ये सुरू झाली. त्यानंतर स्पीड पोस्ट १९८६ मध्ये सुरू झाले. मात्र रजिस्टर्ड पोस्टपेक्षा ते लोकांमध्ये आधीच लोकप्रिय आहे. रजिस्टर्ड पोस्ट बंद केल्याने अनेक लोक भावनिक झाले आहेत, विशेषतः वृद्ध आणि गावांमध्ये राहणारे लोक. ही सेवा ब्रिटिश काळापासून सुरू होती आणि बँका, विद्यापीठे, न्यायालये आणि सरकारी कार्यालयांसाठी विश्वासार्ह होती. त्याची खासियत अशी की डिलिव्हरीचा पुरावा न्यायालयातही वैध होता. आता ते बंद केल्याने केवळ तांत्रिक बदल होणार नाहीत तर एका ऐतिहासिक टपाल सेवेचाही अंत होईल.

## पाण्यात वाहून गेलेले महिलेचा मृतदेह तीन दिवसांनी सापडला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुर्तीजापुर , दि. ३१ :** कमळगंगा नदीमध्ये वाहून गेलेल्या महिलेचा मृतदेह तीन दिवसांनी सापडला आहे. आमदार हरीश पिंपळे, तहसीलदार शिल्पा बोबडे ठाणेदार श्रीधर गुट्टे यांनी विशेष काळजी घेऊन वीर भगतसिंग आपत्कालीन शोध पथक व संत गाडगे महाराज आपत्कालीन शोध पथक तसेच मा चंडिका आपत्कालीन शोध पथक यांच्या माध्यमातून सतत तीन दिवसापासून पाण्यात वाहून गेलेली शेतमजुरी करणारी रेखा मतेचा मृतदेह तीन दिवसानंतर हाती लागला आहे
कमळगंगा नदी मध्ये कंझरा येथील महिला गेल्या तीन दिवसापूर्वी वाहून गेली होती तीन दिवसापासून आपत्कालीन शोध व बचाव पथक शोध घेत होते आज दुपारी ३ वा महिलेचा मृतदेह रामखेड ४ नं बंधाऱ्याच्या समोर वीर भगतसिंग आपत्कालीन शोध व बचाव पथक कुरणखेड, गाडगे महाराज आपत्कालीन शोध व बचाव पथक पिंजर, माँ चंडिका आपत्कालीन शोध व बचाव पथक पैलपाडा यांनी शोधला आहे.या शोध मोहीम मध्ये संत गाडगेबाबा महाराज आपत्कालीन शोध व बचाव पथक पिंजर दिपक सदाफळे, वीर भगतसिंग आपत्कालीन शोध व बचाव पथक प्रमुख योगेश विजयकर, अध्यक्ष विजय माल्टे, मोहन वाघमारे, उमेश माल्टे, अक्षय मोरे, शुभम दामोदर, दिनेश श्रीनाथ,शेख मोईन, प्रदिप उमाळे, माँ चंडिका आपत्कालीन बचाव पथक पैलपाडा रंजित घोगरे, माजी सरपंच निखिल टोपे, वैभव कडू, यांच सहकार्य लाभले.

## महत्त्वाचे

### प्रथमच रक्तदान शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद !

**बाळापूर:** तालुक्यातील वाडेगाव येथील प्रजापीता ब्रह्मकुमारी सेंटर येथे आज आयोजित रक्तदान शिबिराला महिलासह उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.
राजयोगिनी यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .तर आयोजित रक्तदान शिबिरमध्ये स्थानिक मंगेश धनोकार, पुरुषोत्तम खेरडे,पंढरी जावरकार,गजानन पल्हाडे,गणेश मानकर,गणेश नेत्रें ,नितीश शेगोकार,अमोल कातखेडे, विठ्ठल खोडके, विठ्ठल राहुडकार ,तसेच महीला भगिनीमध्ये ग्रामपंचायत सदस्या अर्चना मसने,मंगला शेगोकार,सुनिता लोखंडे,अरुणा वानखेडे,सह परिसरातील युवकांनीही रक्तदान शिबिरामध्ये आपला सहभाग नोंदविला आहे.यावेळी या रक्तदान करणाऱ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले .या कार्यक्रम समारोपीय प्रसंगी रक्तदात्यांचे अर्चना मसने यांनी आभार व्यक्त केले.

### सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये राष्ट्रीय क्रीडादिन साजरा



**अकोट :(ता.प्र.)** स्थानिक श्रीजी कॉलनी स्थित सेंट पॉल्स अकॅडमी येथे राष्ट्रीय क्रीडादिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटीया हे होते.उपाध्यक्ष लुणकरण डागा व सचिव प्रमोद चांडक,रेखा चांडक ,तसेच शारदा लखोटिया, सुधा डागा ,दीपम लखोटिया,अवनी लखोटिया , व मुख्याध्यापक विजय बिहाडे ,उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल,अभिजीत मेंढे, मालती महल्ले,सारिका रेळे, प्रभुदास नाथे यांची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून सर्वप्रथम मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन व हाररपण करण्यात आले. वर्ग नर्सरी ते ९ वी वर्गापर्यंतच्या विद्यार्थ्यांचे वेगवेगळे खेळ घेण्यात आले.त्यामध्ये रनिंग, कबड्डी, रस्सीखेच, रिंग्स, बॅडमिंटन, कलेक्ट द बॉल अशाप्रकारे वेगवेगळे खेळ घेण्यात आले.या कार्यक्रमाचे संचलन क्रीडा शिक्षक अभिलाष काळमेघ व आभार प्रदर्शन सुयोग कल्पेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सांस्कृतिक कार्य प्रभारी नितीन गावंडे, आनंद काळमेघ, क्रीडा शिक्षक प्रणव देंडव, गजानन पडोळे, रवी खिरकर, आशिष लांडे, दीपक रोही,रोहित फुसे,तसेच सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## हुंड्याच्या मागणीसाठी विवाहितेचा सासरकडून छळ

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुर्तिजापूर, दि. ३१ :** मुर्तीजापूर शहरात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून विवाहितेने आपल्या पतीसह सासरच्यांविरोधात मानसिक व शारीरिक छळाची तक्रार नोंदवली आहे. फिर्यादी महिलेने पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, तिचे लग्न दिनांक १३ जून २०१५ रोजी झाले.लग्नानंतर अवघ्या एका महिन्यानंतरच पती, सासू,सासर जेठ, जेठाणी यांनी वारंवार शारीरिक व मानसिक छळ सुरू केला. तसेच फिर्यादीस ''तू वांझोटी आहेस, उलट्या पायाची आहेस'' अशा अपमानास्पद शिव्या दिल्या, शिळे अन्न दिले तसेच वारंवार मारहाण केली.यासोबतच वडिलांकडून २५ लाख रुपये आणून दे अशी मागणी आरोपींनी केली. पैसे न आणल्यास फिर्यादीस घटस्फोट देण्याची, तसेच जीवे मारण्याची धमकीही दिल्याचे फिर्यादीने तक्रारीत नमूद केले आहे.
त्यानुसार पती संदीप रामदास तायडे वय ३८, सासू सुशिला तायडे ६५, सासरे रामदास तायडे ७०, जेठ विनोद तायडे ४५व जेठाणी सुषमा तायडे ४० यांच्या विरोधात गुन्हे दाखल केले आहेत.
हा प्रकार दिनांक १३ जुलै २०२५ रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास घडला. फिर्याद दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३.१८ वाजता नोंदविण्यात आली असून, गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास प्रो. उपनिरीक्षक नितीन राठोड हे करीत आहेत, तर गुन्हा दाखल अधिकारी हवालदार शाम मडावी आहेत. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून, पतीसह सासरच्यांविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## समुद्रतळाच्या दृश्यामध्ये साकारले गौरीबलक्षिम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**शेलूबाजार , दि. ३१ :** महाराष्ट्रातील गणेशोत्सव आणि गौरीपूजन हे सण केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून कलेचा. सृजनशीलतेचा आणि पारंपरिकतेचा संगम घडवून आणणारे उत्सव मानले जातात. या उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शेलूबाजार येथील साईनगरमधील रहिवासी पांडुरंग बेद्रे व जयश्री बेद्रे या दाम्पत्याने यंदाही त्यांच्या अनोख्या कलाकृतीने पंचक्रोशीत चर्चेचा विषय निर्माण केला आहे. यावर्षी त्यांनी समुद्र तळाचे दृष्य या वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनेवर आधारित देखावा साकारला आहे. समुद्रात वावरणारे जलचर प्राणी रंगीबेरंगी शंख-शिंपले.प्रवाळ खडक.खोलवर उसळणाऱ्या निळ्याशार लाटा यांचे देखणे चित्रण करीत त्यांनी एक अद्वितीय अनुभव भाविकांसमोर उभा केला आहे.या देखाव्यात पारंपरिक हस्तकलेची नाजूक जडणघडण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्पर्श एकत्र आल्यामुळे ते अधिक उठावदार झाले आहे.
बेद्रे दाम्पत्याची ही कला केवळ सौंदर्यदृष्टीतून नव्हे तर भाविकांना अध्यात्म श्रद्धा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी ठरते. गौरी स्थापनेसाठी साकारलेल्या या वातावरणात भक्तीभावासोबतच सृजनशीलतेचे अप्रतिम दर्शन घडते. यापूर्वीही या दाम्पत्याने अनेक वैशिष्ट्यपूर्ण देखावे घडवले आहेत.
भगवान श्रीकृष्णांनी करंगळीवर उचललेल्या गोवर्धन पर्वताची प्रतिकृती. अंतराळातील सुर्य, चंद्र, ग्रह-नक्षत्रे व ग्रहणाचे वैज्ञानिक प्रतिकृतीकरण, तसेच अमरनाथ गुहेचे देखावे हे सर्व त्यांनी कौशल्यपूर्ण पद्धतीने भाविकांसाठी साकारले आहेत. त्यामुळे दरवर्षी त्यांच्या घरातील गौराईच्या स्थापनेला विशेष आकर्षण लाभते.
दरवर्षीप्रमाणे यंदाही पांडुरंग बेद्रे व जयश्री बेद्रे हे दाम्पत्य महिनाभराहून अधिक काळ परिश्रम घेऊन हा देखावा सिद्ध केला आहे.त्यांच्या कल्पकतेमुळे. मेहनतीमुळे व कलात्मकतेमुळे हा उत्सव गौराई भक्तांसाठी एक वेगळाच आनंदसोहळा ठरतो आहे. या अनोख्या कलाकृतीने शेलूबाजारकरांसाठी भक्तीभाव अध्यात्म व कलात्मकतेचा संगम अनुभवण्याची अविस्मरणीय संधी निर्माण केली आहे. त्यामुळे बेद्रे दाम्पत्याच्या या कल्पक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## प्रा.भाऊसाहेब खेंडकर यांना स्मृतिदिनी विविध स्पर्धांनी अभिवादन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. ३१ :** सरस्वती नगर, जुना वाशीम नाका, बायपास, अकोला स्थीत श्री गजानन महाराज शिक्षण क्रीडा व व्यायाम प्रसारक मंडळ, कळंबेश्वर तालुका जिल्हा अकोला अंतर्गत विष्णुपंत खेंडकर माध्यमीक विद्यालय, स्व. यमुनाबाई खेंडकर मराठी प्रा. शाळा व स्व. नारायणराव खेंडकर कॉन्व्हेट येथे विशाल वटवृक्षाचे संस्थापक अध्यक्ष स्व. प्रा.भाऊसाहेब खेंडकर यांचा स्मृती दिन विविध स्पर्धांनी अभिवादन करून संपन्न झाला. दरवर्षी हा कार्यक्रम विविध अशा बहुरंगी कार्यक्रमधे रंगभरण स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. दरम्यान यावेळी वर्ग नर्सरी ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते तर वर्ग पाच ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी पर्यावरणाचे संवर्धन व जतन या विषयावर आधारित निबंध सादर करून आपल्या कलागुणांना वाव दिला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्व.प्रा. भाऊसाहेब खेंडकर यांच्या पावन स्मुर्तीस अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून विष्णुपंत खेंडकर विद्यालयाचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर तर प्रमुख अतिथी म्हणून स्व. यमुनाबाई खेंडकर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अल्केश खेंडकर उपस्थित होते.
सदर कार्यक्रमा वेळी निबंध स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना मधून वर्ग ५ वी मधुन प्रथम मोहम्मद सारिब शेख मुजाहिद, द्वितीय आयुष धनराज तायडे, तृतीय ओम गजानन जोंधारकर, वर्ग ६ वी मधुन प्रथम कु.प्राची अनिल वाघचौरे, द्वितीय आदित्य महेंद्र तायडे, तृतीय कु.दिव्या नितेश मुंढे, वर्ग ७ मधून प्रथम कु. तनवी संतोष गर्जे , द्वितीय सोहम रितेश जरांगे, तृतीय कु.अनुष्का सखाराम खंडेराव, वर्ग ८ वी मधून प्रथम क्रमांक आर्यन संतोष करंगे, द्वितीय आदिनाथ अविनाश इंगळे, तृतीय कु. रोशनी अभय शेगोकार, वर्ग ९ वी मधून प्रथम क्रमांक रोहन नितलकुमार वानखडे, द्वितीय कु. साक्षी रामदास बामणकर , तृतीय कार्तिक सुरेश ढोले तर वर्ग दहावी मधून प्रथम क्रमांक कु.मानसी शितलकुमार वानखडे, द्वितीय कु. श्रेया नितलकुमार वानखडे, तर तृतीय आयुशी बिरजचलाल शाहू यांनी प्राविण्य प्राप्त केले आहे. सर्व प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शीय भाषणातून विद्यार्थ्यांना स्पर्धेमध्ये ज्यांना यश मिळाले नसले, तरी पुन्हा प्रयत्न करत राहिल्यास एक दिवस नक्कीच आपल्याला यश प्राप्त होईल असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन उषा जगदाळे यांनी केले तर आभार आशा हिवरकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला शिक्षक सुरेश सुरत्ने, प्रज्ञानंद थोरात, श्रीकांत पागृत, गोपाल वानखडे प्रशांत काळे, कांचन वानखडे, मीना घाटोळे, अश्विनी सोळंके, अंजु मुंढे, सुकेशनी ओहेकर, छाया इंगळे, वर्षा मते, वर्षा खेडकर, संगीता कोंढाणे, माया खोडके, प्रणाली धोटे, मेघा शर्मा तर शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

## प्राचार्य संजय सौंदळे यांचा सेवापूर्ती सोहळा




रामसिंग जाधव यांनी माझ्यावर जो विश्वास टाकला त्या विश्वासाला मी कधीच तडा जाऊ दिला नाही व माझ्यावर केलेले उपकार मी आयुष्यात कधीच विसरणार नाही
**प्रा. संजय सौंदळे**

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पातुर , दि. ३१ :** नुकतेच वसंतराव नाईक विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय पातूरचे प्राचार्य संजय सौंदळे हे आपल्या ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. संजय सौंदळे सरांनी वसंतराव नाईक विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय पातुर येथे सात वर्ष प्राचार्य पदाचा पदभार उत्कृष्टरित्या सांभाळला त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा म्हणून विद्यालयात सेवापूर्ती सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रियदर्शनी इंदिरा गांधी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय पातूरच्या प्राचार्या सौ.मीरा ढोकणे होत्या तर प्रमुख उपस्थिती म्हणून ज्येष्ठ शिक्षक अनिल सोनटक्के होते. यावेळी शांत,संयमी,सोज्वळ, सुसंस्कृत,कार्यकुशल व्यक्तिमत्त्व असलेले प्राचार्य संजय सौंदळे यांचा शाल,श्रीफळ , पुष्पगुच्छ तसेच माता सरस्वतीची मूर्ती भेट देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्राचार्य सौंदळे सरांच्या कार्याचा गौरव करणारी मनोगतं व्यक्त केली व भावपूर्ण वातावरणात निरोप दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एस.टी गाडगे यांनी केले तर मान्यवरांचे आभार प्रदर्शन प्रा. एस बी आठवले यांनी केले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## वारसा : काळ्या पाषाणातील उजव्या सोंडेची गणेशमूर्ती

# अकोटच्या इतिहासाची साक्ष देणारे सिद्धिविनायक मंदिर

दै. अजिंक्य भारत। ता .प्रतिनिधी



**अकोट, दि. ३१ :** अकोट शहरातील सोमवारवेस भागात १८ व्या शतकात रघुजी भोसले यानी बांधलेले सिद्धिविनायक मंदिर आजही सर्वदूर प्रसिद्ध आहे.आजही शहराच्या पुरातन इतिहासाचे हे मंदिर साक्ष देत आहे. गणेशमूर्ती ही डाव्या सोंडेची असते. परंतु या मंदिरातील काळ्या पाषाणातील ही गणेशमूर्ती उजव्या सोंडेची असून,दूरदुरून गणेशभक्त दर्शनासाठी येत असतात.
अकोट शहराला पुरातन ऐतिहासिक वारसा आहे. नागपूर सुम्याचा कारभार सांभाळणारे रघुजी भोसले यांनी १८ व्या शतकात अकोटातील सोमवारवेस येथे सिद्धिविनायक मंदिर बांधले होते.यासंदर्भात एक आख्यायिका आहे ती अशी सन १७५१ मध्ये रघुजी भोसले हे कर आणि शेतसारा वसुलीसाठी अकोट परिसरात आले होते.निजामाला त्याची चाहूल लागताच त्याने रघुजी भोसलेंवर हल्ला केला. अकोटातील सोमवारवेस भागात रघुजी मोसले यांचा हत्तीखाना,घोडपागा आणि सैन्याची एक तुकडी होती.निजामाच्या अचानक हल्ल्यामुळे रघुजी भोसले यांनी या हत्तीखान्यात आश्रय घेतला त्यामुळे त्यांचे प्राण वाचले.त्यादिवशी संकष्ट चतुर्थी होती.गणेशानेच हनीच्या रूपातआपले प्राण वाचवले म्हणून त्यांनी या ठिकाणी सिद्धिविनायकाचे मंदिर बांधले, असे सांगितले जाते.अकोट परिसरातील अडगाव-सिरसोली येथे सन १८०२ मध्ये इंग्रज आणि मराठ्यांचे युद्ध झाले होते.त्यासाठी ती भोसले हे अकोट परिसरात आले होते.तशी शासकीय नोंददेखील अकोला डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरमध्ये आहे.सिद्धिविनायक मंदिराबरोबरच भोसल्यांनी अकोट शहरात आणखी दोन गणेश मंदिरांची बांधणी केल्याचे सांगितले जाते.नरसिंग महाराज मंदिराजवळ डाव्या सोंडेची प्राचीन गणपती मंदिर आहे.तर तिसरे गणपती मंदिर परकीय आक्रमणात नष्ट झाल्याचे भाविक सांगतात. सिद्धिविनायक मंदिरात दरवर्षी गणेश जयंती अत्यंत उत्साहात साजरी केली जाते.या दिवशी महाप्रसादाचे आयोजन केले जाते. या मंदिराच्या सभागृहाचे बांधकाम श्रमदानातून केले होते.

> मूर्तीचे रूप झाकले होते शेंदूराच्या पाख सिद्धिविनायक मंदिरातील मूर्ती ही पूर्वी शेंदुरलेप चर्चित होता मात्र, फेब्रुवारी २००१ मध्ये शेंदुराचा हा थर निखळला होता. त्या शेंदुराच्या लेपाखाली सिद्धिविनायकाची मूर्ती शाबूत दिसून आली. अतिशय सुंदर,मनमोहक,रेखीव,कोरीव,आणि उजव्या सोंडेच्या गणेशमूर्तीचे हे मूळरूप अनेक वर्ष दुराखाली झाकलेले होते.साडेचार फूट उंच ३ फूट रुंद अशी काळ्या पाषाणातील ही चतुर्भुज मूर्ती आहे.सिंहासनावर आरूढ असलेल्या या मूर्तीच्या डोक्यावर नागदेवता आहे.

## पैलपाडा येथे निशुल्क आरोग्य शिबीर संपन्न

### सुयोग देशमुख मित्र परिवार व्दारे आयोजन




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कुरणखेड , दि. ३१ :** येथून जवळच असलेल्या पैलपाडा येथे आज ३१ऑगस्ट रविवारला आरोग्य शिबीर संपन्न झाले .सन्मित्र मानस हॉस्पिटल अकोला येथिल डॉ.राम बुटे, डॉ.भरत बागेरे आणि सौ.मंगलाताई गावंडे यांच्या उपस्थितीमध्ये ५५ रुग्णांची तपासणी करण्यात आली .
यावेळी सरपंच वर्षाताई राजेश गऊळ, ग्रा. प. सदस्य दिपालीताई भारसके, माजी ग्रा.प. सदस्य सुरेश खंडारे, राजेश देशमुख, बबनराव देशमुख,रामराव गावंडे, हमीदभाई, बबन गोगटे, पद्मा देशमुख, पुष्पा गुहे, साधना देशमुख,देवराव काळंके, रामदास भारसके,प्रसाद देशमुख,विक्की गोरले, विशाल देशमुख,गोविंदा गुहे, ओम गोमाशे, रोशन पाचपोर, अनिकेत देशमुख, सतीश देशमुख, सुजल गावंडे, प्रथमेश मोरे, अमर वस्तकार, योगेश भलतीलक,यश सांगळूदकर आदीची उपस्थिती होती.

## महत्त्वाचे

### जाचक निकष नको; सरसकट पंचनामे करा!



**वाशिम :** जिल्ह्यात संततधार पाऊस, अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे शेतजमिनीसह पिकांचे मोठे नुकसान झाले. कोणतेही जाचक निकष, अटी न ठेवता सरसकट पंचनामे करण्याची मागणी वैशाली मेश्राम यांनी केली आहे. ऑगस्ट महिन्यात जिल्ह्यातील सर्वच महसूल मंडळांमध्ये संततधार पाऊस, अतिवृष्टी झाली. परंतु, अनेक ठिकाणी अद्ययावत अचूक पर्जन्यमापक यंत्रणा नाही, काही महसूल मंडळांमध्ये स्वयंचलित हवामान केंद्राद्वारे पर्जन्यमानाचे आकडे चुकीचे नोंदविले होते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविम्याचा लाभमिळण्यासाठी याकडे वरिष्ठांनी लक्ष देण्याची मागणी वैशाली मेश्राम केली.त्यामुळे बहुतांश महसूल मंडळांमध्ये पिकांचे अतोनात नुकसान झालेले असतानाही, प्रत्यक्षात अतिवृष्टीची नोंद नसल्याने नुकसान भरपाईपासून शेतकऱ्यांना वंचित राहण्याची वेळ येऊ शकते.

### शिव गणेश मंडळाच्यावतीने आरोग्य तपासणी

**शेलुबाजार :** महाराष्ट्र राज्य आरोग्य विभाग यांच्यातर्फे राबविण्यात येणाऱ्या श्री गणेशा आरोग्याचा या उपक्रमा अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र शेलूबाजार यांच्या वतीने उपकेंद्र पार्डी ताड अंतर्गत हिसई येथील शिव गणेश मंडळ व शेलूबाजार येथील शिव गणेश मंडळ शेलुबाजारच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करून रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. या शिबिरामध्ये रुग्णांची रक्तदाब, रक्तातील साखर तसेच इतर तपासण्या करून औषधोपचार करण्यात आले तसेच कीटकजन्य आजार जसे डेंग्यू मलेरिया या सारख्या आजाराविषयी जनजागरण करण्यात आले. हिसई येथील शिवशंभू गणेश मंडळ येथील आरोग्य तपासणीकरिता डॉ शेख सादिक (समुदाय आरोग्य अधिकारी) गजानन पवार (आरोग्य कर्मचारी) अनिकेत मुळे (आरोग्य कर्मचारी) वंदना भगत ह्या चमूने योग्य रित्या पार पडले.

## निधन वार्ता

### प्रवीण श्रीराव



**उंबर्डा बाजार :** येथील प्रतिष्ठित नागरिक व माजी ग्रा.प. सदस्य प्रविण काशिनाथ श्रीराव यांचे हृदय विकारांच्या तीव्र झटक्याने वयाच्या ५५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले , भाऊ, बहीण असा मोठा आप्त परीवार आहे.

### शोभाबाई सराफ



**उंबर्डा बाजार :** येथून जवळच असलेल्या ग्रा.प. प्रिप्री (भोयर) चे सरपंच प्रदिप नामदेवराव सराफ यांच्या मातोश्री नामे शोभाबाई नामदेवराव सराफ यांचे दीर्घ आजाराने वयाच्या ७१ व्या वर्षी निधन झाले त्यांच्या मागे दोन मुले , एक मुलगी, नातवंडे असा मोठा आप्त परीवार आहे.

# आठवडी बाजाराला जोडणारा पूल धोकादायक

## प्रशासनाचे दुर्लक्ष : नागरिकांचा जीव टांगणीला

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**शेलुबाजार, दि. ३१ :** येथील आठवडी बाजाराला जोडणाऱ्या अडान नदीवरील दोनही पुलाची अत्यंत दुरावस्था झाली आहे मात्र पुलाच्या दुरावस्थेकडे संबंधितांचे दुर्लक्ष असल्याने व्यापारी बाजारकरू तसेच नागरिकांचे हाल होत असल्याने रोष व्यक्त केल्या जात आहे.
जिल्ह्यात शेलुबाजार येथील आठवडी बाजार प्रसिद्ध आहे आठवड्याच्या बुधवारी भरणाऱ्या आठवडी बाजाराच्या निमित्ताने जिल्ह्यातील तसेच इतर जिल्ह्यातील व्यावसायिक या ठिकाणी व्यवसाय करण्यासाठी येत असतात. आठवडी बाजाराला जोडणाऱ्या अडाण नदीवर दोन पुल आहेत.
मात्र मागील आठवड्यात झालेल्या जोरदार पावसाने या पुलाची अत्यंत दयनीय अशी अवस्था झाली आहे दोन्ही पुलाचा काही भाग खसला आहे. त्यामुळे या मार्गावरून जाणे धोकादायक झाले आहे. आठवडी बाजारात माल नेण्यासाठी बाजार करून सर्वांना मोठी कसरत करावी लागते. आठ दिवस उलटूनही संबंधितांनी या पुलाची कुठलीही दुरुस्ती केली नाही. त्यामुळे नागरिक चांगलेच संतप्त झाले आहे.
या पुलावरून बुधवारी अवजड वाहने वाहतूक करतात त्यामुळे एखादी दुर्घटना घडवण्याची शक्यता नाकारता येत नाही. दोन्ही पुलाची उंची कमी असून नदीला पुराचे पाणी आले तर दोन्ही पूल नेहमीच पाण्याखाली जातात त्यामुळे गावाचा आणि आठवडी बाजाराचा संपर्क तुटून आठवडी बाजार इतरत्र हलविण्याची वेळ येते या ठिकाणी असलेल्या दोन्ही पुलाची तातडीने दुरुस्ती करणे गरजेचे असतांना मात्र कुठलीही उपाययोजना करण्यात आली नाही. या ठिकाणी पुराची तात्पुरती दुरुस्ती किंवा एखाद्या पुलाची उंची वाढवून नवीन पुलाची उभारणी करण्याची आवश्यकता आहे. शेलूबाजार नगरीचे ग्रामदैवत असलेल्या सतीआईचे मंदिर देखील आठवडी बाजार परिसरात आहे त्यामुळे या ठिकाणी धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने नागरिकांची वर्दळ असते मात्र पुलाला अनेक ठिकाणी खड्डे पडले तसेच पुलाचा भाग ढासळला आहे त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने भाविकांमध्ये तसेच व्यापारी व नागरिकांमध्ये रोष व्यक्त केल्या जात आहे. तातडीने या पुलाची दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकाकडून केली जात आहे.

# शेतकरी हवालदिल : पिकासह शेती साहित्यही गेले वाहून



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. ३१ :** रिसोड तालुक्यात मागील काही दिवसापासून ढगफुटी सदृश्य पाऊस पडत असल्याने यात पैनगंगा नदीकाठच्या शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. यामध्ये शेती साहित्य सोलर पंप मोटार पाईप तसेच अनेक प्रकारचे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे साहित्य पाण्यात वाहून गेले आहे. शासनाने याचा पंचनामा करून शेतकऱ्यांना त्वरित मदत करण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्याकडून करण्यात येत आहे.
रिसोड तालुक्यातील खडकी सदार येथे दिनांक १६ ते १८ ऑगस्ट दरम्यान मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने पैनगंगा नदीकाठच्या सर्व्हे क्रमांक १०५ मध्ये असलेला सोलर पंप पेनगंगा नदीला मोठ्या प्रमाणात पूर आल्याने नदाबाई भागवत बोडखे व इतर शेतकऱ्यांच्या शेतातील सोलर पंप वाहून गेल्याने त्यांना लवकरात लवकर शासनाने मदत करण्यात यावी अशी मागणी त्यांच्याकडून करण्यात येत आहे.
अनेक महागडी औषधे फवारून शेतकऱ्यांनी आपले पीक वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांचा पावसामुळे खर्च वाया गेला. पिकाबरोबरच शेती साहित्य स्प्रिंकलर सोलर पंप मोटर अशा प्रकारचे सर्व साहित्य वाहून गेल्याने शेतकरी अर्थिक संकटात सापडला आहे.

## मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीतः ओला दुष्काळ जाहीर करा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ३१ :** तालुक्यातील हट्टी शिवारात २९ ऑगस्ट रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पावसामुळे गावातील नाले ओसंडून वाहू लागले असून, शेकडो हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेली आहे. नाल्याकाठच्या शेतात पाणीच पाणी साचल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.
शेतकऱ्यांनी परिश्रमाने फुलविलेली पिके काही तासांत उद्‌ध्वस्त झाली असून, शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या मते, कष्ट करून उभे केलेले पीक काही क्षणांत नष्ट झाले. त्यामुळे आता कर्जाचा बोजा, पुढील हंगामाची भीती आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न डोईवर आला आहे. गावातील परिस्थिती गंभीर असून, शेतकरी मोठ्या चिंतेत आहेत. शासनाने त्वरित दखल घेऊन पंचनामे करावेत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. परिसरात पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचे चित्र आहे.

## ९० कंत्राटी कामगारांना पूर्ववत कामावर घेण्याचे आश्वासन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. ३१ :** सफाई व कचरा संकलनाच्या कामावर किमान वेतनासह पुर्ववत रुजु करुन घेण्याच्या मागणीसाठी गेल्या ११ ऑगष्टपासुन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसलेल्या कंत्राटी सफाई कामगारांनी पुर्ववत कामावर रुजु करुन घेण्याच्या आश्वासनामुळे आपले अर्धनग्न साखळी उपोषण २५ ऑगष्ट रोजी मागे घेतले. यावेळी आमदार श्याम खोडे यांनी उपोषण मंडपास भेट देवून उपोषणकर्त्यांच्या मागण्या समजून घेतल्या व त्यांना टप्प्याटप्प्याने पुर्ववत कामावर रुजु करुन घेण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे कामगावर वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.
याबाबत अधिक माहिती अशी की, नगर परिषद अंतर्गत घंटागाड्या व टँकरद्वारे कचरा उचलण्यासाठी जवळपास १० ते १२ वर्षापासून सुमारे ९० कामगारांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात आली होती. हे सर्व कामगार गेली अनेक वर्षे प्रामाणिकपणे काम करत असून त्यांच्या कष्टावर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत होता. मात्र, गत २५ जुलै रोजी नविन निविदेनुसार नव्या कंत्राटदाराने जुन्या व अनुभवी कामगारांना प्राधान्य न देता त्यांना कामावरून कमी करून दुसऱ्या कामगारांना नियुक्त करण्यात आले. परिणामी, आतापयर्त काम करणाऱ्या जुन्या कंत्राटी कामगारांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली होती. या जुन्या कामगारांनी केलेल्या किमान वेतनाच्या मागणीला नगर परिषद प्रशासनाने नकार दिल्यानंतरही हे कामगार काम करण्यास तयार असल्याची मागणी केली होती. त्यामुळे या कंत्राटी कामगारांनी किमान वेतनासह कामावरुन रुजु करुन घेण्याच्या मागणीसाठी ११ ऑगष्टपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्धनग्न साखळी उपोषण छेडले होते. दरम्यान २५ ऑगष्ट रोजी आमदार श्याम खोडे यांनी उपोषण मंडपास भेट देवून कामगारांच्या मागण्या समजून घेतल्या. व या कामगारांना टप्प्याटप्प्याने पुर्ववत कामावर रुजु करुन घेण्याबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे कामगारांना आपले उपोषण २५ ऑगष्ट रोजी मागे घेतले. या उपोषणात सफाई कामगार अर्जुन नेमाडे, अमर चौधरी, संतोष काळे, राहुल ठोके, रवि पठाडे, मनोज घाटे, गणेश इंगोले, योगेश आपटे, गणेश मोरे, अल्ताब चौधरी, सुधीर बोरकर, माधव कुचेकर, जयदीप ढोके, कृष्णा नेमाडे, शे. सलीम गुलाब, विला ढेले, राजु खंदारे, रामा भोंगळ, आकाश इंगोले, आदी सफाई कामगार सहभागी झाले होते.

## उमरा शमशोद्दीन येथे संयुक्त जयंतीनिमित्त गायनाचा कार्यक्रम

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३१ :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व महाकवी वामनदादा कर्डक यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त परिवर्तन कला महासंघ व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज बहूउद्देशिय संस्थेच्या आयोजनातून शुक्रवार, २९ ऑगष्ट रोजी तालुक्यातील ग्राम उमरा शमशोद्दीन येथे विनामुल्य गायनाचा सांस्कृतीक कार्यक्रम उत्साहात पार पडला.
कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित उपसरपंच चेतन भगत, माजी सरपंच दगडु श्रृंगारे, कृषी सहाय्यक मुंढे, महासंघाचे जिल्हाध्यक्ष शेषराव मेश्राम, धम्मानंद इंगोले यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन व हारार्पण करण्यात आले. प्रारंभी गायीका सुजाता श्रृंगारे यांनी 'करिते पुजा मी आधी गौतमाची' या वंदन गिताने कार्यक्रमात रंगत आणली. त्यानंतर सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये कवीगायक सुरेश श्रृंगारे, तबलावादक कचरु खडसे, ढोलकीवादक मारोती निरगुडे, विष्णू भगत, जेष्ठ गायक मुकींदा पडघान, सिताराम श्रृंगारे, राजाराम श्रृंगारे, सुदाम श्रृंगारे, गजानन खडसे, लोडुजी भगत, महादेव भगत, कव्वाली गायक विठ्ठल सुर्वे, भागपत कापसे, गजानन भगत, रामेश्वर भगत, गौतम पडघणे, विठ्ठल गिरी, प्रशांत खडसे, उपसरपंच चेतन भगत, सुरेश भगत आदी कलावंतांनी वामनदादा कर्डक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर आधारीत विविध गिते गावून रसिकांना मंत्रमुग्ध केले. तसेच गायीका जिजाबाई घनगावकर, पंचाबाई कांबळे, सुनिता राऊत, सखुबाई भगत, शिलाबाई भगत, वैशाली भगत, शोभा भगत, रेखा भगत, यशोदा खडसे, सविता खडसे, यशवंता खडसे, पद्मा भगत, यमुना गायकवाड, अंतकला भालेराव, सुजाता भगत, शुभांगी भगत, रमा पडघणे, कुंदा श्रृंगारे, शाहीर दत्ता वानखेडे, गजानन सावळे, प्रकाश अंबेकर, माणिक भगत आदी कलावंतांनीही एकापेक्षा एक गिते गावून श्रोत्यांना खिळवून ठेवले. यावेळी मुरलीधर भगत यांनी कार्यक्रमाला सहकार्य केले.

## शेंदुरजना येथे बच्चु कडू यांच्या सभेस प्रतिसाद

### मुंबईत शेतकरी कर्ज मुक्ती आंदोलनाची तयारी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. ३१ :** शेंदुरजना आढावा येथील नाईक चौकमध्ये माजी मंत्री बच्चु कडु यांची शेतकरी -शेतमंजुर हक्क सभा दिनांक ३० ऑगस्ट रोजी घेण्यात आली. या वेळी कार्याध्यक्ष बल्ल जवंजाळ, दामुअण्णा इंगोले,पंकजपाल महाराज, रमेश महाराज,मनोहर राठोड उपस्थित होते. विधानसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेकऱ्यांचा ७/१२ करुया कोरा कोरा करणार असे आश्वासन दिले होते. त्या प्रमाणे शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करुन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्ज माफी द्यावी. या मागणीसाठी ही सभा आयोजित करण्यात आली होती.
बच्चू कडू यांनी महाराष्ट्र सरकारला दिलेल्या आश्वासनाची आठवण करुन देत जाहीर निषेध व्यक्त केला सरकारने दिलेल्या आश्वासना प्रमाने जर शेतकरी कर्ज माफी केली तर शेतकरी आत्महत्या थांबतील आणी शेतकरी वर्गाचा कर्जाचा भार थोडा हलका होईल आणी शेतकऱ्यांना चार दिवस जगण्याची अशा पल्लवीत होईल असे मनोगत यावेळी बच्चु कडु व्यक्त केले. शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी, २८ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबईत धरणे आंदोलनाची तयारी केली जात आहे. सभा यशस्वी करण्यासाठी प्रहार मा.तालुका प्रमुख शाम पवार, चेतन पवार, रवि राऊत, ता अध्यक्ष प्रशांत धोत्रे, सर्वेश खाडे, करण वाघमारे, कपिल राठोड, अविशान डोंगरे, युवराज राठोड,संजय राठोड, राहुल भगत, अजय पवार, लहु राठोड, रोशन चव्हाण, रुषि चौधरी आदींनी योगदान दिले.

## शिक्षणाचा बट्ट्याबोळ | शाळांची दुरवस्थाः विद्यार्थांची होतेय कुचंबना

# जि. प. शाळेच्या वर्गखोल्या मोजताहेत शेवटच्या घटका!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**रिसोड, दि. ३१ :** रिसोड जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण भागात ७७० शाळा आहेत. त्यापैकी ३५० वर्ग खोल्या जीर्ण झाल्या आहेत. तर १५० वर्ग खोल्या दरवस्थेत आहेत. बहतांश शाळेत स्वच्छ्ता गृहे नाहीत. कुठेकुठे घाणीने माखले आहेत. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे. तरीही गोरगरिबांची मुले जिल्हा परिषद शाळेत शिकत आहेत. एकीकडे जिल्हा परिषद शाळांची अवस्था दयनीय आहे. तर दुसरीकडे मात्र शिक्षण विभागाचा कार्पोरेट लुक सजला आहे. त्यामुळे सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते की, शिक्षा असा प्रश्न पालकामधून होत आहे.
तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक व्याड, मांडवासह तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेची जीर्ण इमारत धोकादायक बनल्या आहे. इमारत द्रुस्तीसाठी, शाळा व्यवस्थापन समितीने प्रस्ताव दिल्यानंतरही शिक्षण विभाग याकड़े मात्र दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप येथील ग्रामस्थांनी केला आहे. व्याड येथील १ ते ७ वी पर्यंत शाळा आहे. या जिल्ह्या परिषद शाळेत १५० हुनआधिक मुली-मुलं शिक्षण घेत आहेत.
मात्र सद्यास्थित पावसाळा असल्याने वर्ग खोल्या वरचे पत्रे पुर्ण पणे जिर्ण झाले असून वर्गात पाणी पडत आहे. त्यामुळे मुलांना शिक्षण घेता येत नाही तर दोन वर्गखोल्या अतिशय जीर्ण झाल्या असून त्यावरचे टिनपत्रे सुध्दा उडुन गेली आहेत. शासनाने याकडे लक्ष देऊन नवीन वर्ग खोल्या बाधाव्यात आशी मागणी पालकामधून होत आहे.

> येथील जिल्हा परिषद शाळेच्या वर्ग खोल्या जीर्ण झाल्या आहेत. आम्हाला नवीन खोल्या नसल्यामुळ मुलांना व मुलीना जीर्ण वर्ग खोल्यातच शिक्षण घ्यावे लागते.प्रशासनाने तरी लक्ष देऊन जिल्हा परिषद शाळांच्या वर्ग खोत्या बांधून द्याव्या.
>
> **प्रदिप बोंडे,**
> ग्रा.प. सदस्य, व्याड रिसोड

> या जिल्हा परिषद शाळेचे बाधकाम ई.स.१९३७ साली १ते ७ वर्ग खोल्याचं बांधकाम करण्यात आले असून त्या पुर्ण पणे जिर्ण झाल्या असून पावसाळ्यात पाणी पत्रांमधून वर्ग खोल्यात पडत आहे. शासनाने ह्या वर्ग खोल्या पाडुन नविन वर्ग खोल्या बाधाव्यात.
>
> **भागवत बोंडे**
> पालक, व्याड, रिसोड

## पदोन्नती झाल्याबद्दल अमोल पाटणकर यांचा सत्कार



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ३१ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ओएसडी अमोल पाटणकर यांची सह सचिव पदी पदोन्नती नुकतीच पदोन्नती करण्यात आली. या पृष्ठभूमीवर पाटणकर यांचा मानोरा येथील दैनिक अजिंक्य भारत च्या कार्यालयात तालुका प्रतिनिधी संजय अलदर यांनी दि. ३० ऑगस्ट रोजी शाल श्रीफळ आणि पुष्प गुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी डॉ महेंद्र चव्हाण, पत्रकार माणिक डेरे, अभिजीत पाटील, धनुर्धर लवटे, प्रवीण म्हातारमारे, ओम बलोदे, धनगर समाज तालुका अध्यक्ष अनिकेत लवटे,शासकीय कंत्राटदार निखिलेश भोरकडे, युवा नेतृत्व विशाल राठोड, उपसरपंच सतीश सोनोने आदी उपस्थित होते.

## गणेश दर्शन



जलतारे प्लॉटचा राजा अकोट



छत्रपती प्रतिष्ठान गणेशोत्सव मंडळ गांधी चौक अडगाव बु.



श्री चिंतामणि गणेश उत्सव मंडल रामकृष्णनगर कौलखेड अकोला




सार्वजनिक गणेश मंडळ मुडपूरा अडगाव बु



श्री विघ्नहर्ता गणेश उत्सव मंडळ पळसोद

# पतीपत्नीचे खंडणी रॅकेट उघडकीस

## १८ लाख रुपये उकळल्यानंतर आणखी पाच लाख रुपयांची मागणी

### पोलिसांचा सापळा, आरोपी दांपत्य अटकेत

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. ३१ :** तालुक्यातील खरबढोरे येथील एका दांपत्याने खंडणीच्या माध्यमातून तब्बल १८ लाख ७४ हजार रुपयांची रक्कम उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात आरोपींनी पुन्हा पाच लाख रुपयांची मागणी केली असता पोलिसांनी सापळा रचून त्यांना रंगेहात पकडले. या कारवाईत रोख रक्कम, दुचाकी व मोबाईल असा एकूण २



लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

प्राप्त माहितीनुसार, अकोल्यातील ५१ वर्षीय व्यक्तीची ओळख लता नितेश थोप (वय ३०, रा. खरबढोरे) हिच्याशी १६ जून २०२५ रोजी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अकोला शाखेत झाली. वारंवार संपर्कानंतर तिने फिर्यादीस आपल्या गावी बोलावले. तेथे तिचा पती नितेश प्रभाकर थोप (वय ३५) अचानक आला आणि फिर्यादीस धमकावत त्यांचे फोटो काढले. बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करण्याची भीती दाखवून सुरुवातीला तीन लाख रुपये उकळले. नंतर वेळोवेळी धमक्या देत त्यांनी तब्बल १८ लाख ७४ हजार रुपये घेतले. अलीकडेच आरोपी दांपत्याने पुन्हा पाच लाख रुपयांची मागणी केली. फिर्यादीने त्वरित पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी सापळा रचून ठरल्याप्रमाणे फिर्यादीने आरोपींना एक लाख रुपये दिल्यानंतर मूर्तिजापूरअकोला रोडवरील टोलनाक्यावर त्यांना रंगेहात पकडण्यात आले. या कारवाईत १ लाख रुपये रोख, दोन दुचाकी (किंमत १.५ लाख रुपये) व दोन मोबाईल (किंमत १३ हजार रुपये) असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**कायदेशीर कारवाई**

या गुन्ह्यात आरोपींचा सक्रीय सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्याने कलम ३०८(२), ३०८(६), ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींना न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास ठाणेदार श्रीधर गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक चंदन वानखडे करीत आहेत.

## कष्टकऱ्याच्या लढाईला श्री विठ्ठल गणेशोत्सव मंडळाचा हातभार

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३१ :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री विठ्ठल गणेशोत्सव मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याच अंतर्गत पहिल्याच दिवशी हृदयाला भिडणारा उपक्रम राबवण्यात आला.

फक्त पंधरा-सोळा वर्षांचा लहानगा किरण यादव, उत्तर प्रदेशातून आपल्या परिवारासोबत वाशिममध्ये येऊन रेल्वे स्टेशनवर तात्पुरत्या वास्तव्यास आहे. घरचा आधार असलेले वडील आजारी असून त्यांच्यावर पायाचे ऑपरेशन झालेले आहे. घराची सारी जबाबदारी या चिमुकल्या खांद्यावर आली आहे. किरण दिवसेंदिवस शहरात फिरून प्रत्येकाला बूट पॉलिश करण्याची विनंती करतो. फक्त दोनशे रुपयांच्या छोट्याशा भांडवलावर हा बालक आपल्या



आई-वडिलांचा उदरनिर्वाह करत आहे. लहान वयातल्या खेळण्याच्या दिवसांत तो आपल्या घामातून कुटुंबाचा संसार चालवत आहे. त्याच्या मेहनतीतून उमटणारे संघर्षाचे चित्र प्रत्येकाला विचार करायला भाग पाडते. किरणची कहाणी ऐकून श्री विठ्ठल गणेशोत्सव मंडळाने त्याला आर्थिक मदत केली. एका लहानशा व्यवसायातून कुटुंबासाठी जगण्याची झुंज देणाऱ्या या मुलाच्या हाताला आधार देऊन मंडळाने सामाजिक बांधिलकी जपली. या वेळी मंडळाचे अमोल राजगुरू, किशोर वाघमारे, विशाल राजगुरू, उमेश इंगोले, काळे, शिवाजी जावळे उपस्थित होते. किरणसारख्या मेहनती मुलाने दाखवलेला आदर्श अनेकांना प्रेरणा देणारा ठरेल.

## पिंपळखुटा येथील नदीत वाहून गेलेला युवक दुसऱ्या दिवशी मिळाला

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**पिंपळखुटा, दि. ३१ :** पातूर तालुक्यातील पिंपळखुटा येथे शनिवारी सकाळी एक युवक करन सुनिल वानखडे वय २४ नदीत वाहून गेल्याची घटना घडली होती होती वंदे मातरम बचाव पथकाचे शनिवारी खूप परिश्रम केले पन करन सुनिल वानखडे हा युवक शनिवारी संध्याकाळपर्यंत मिळाला नव्हता मात्र रविवारी सकाळ पासून पुन्हा रेस्क्यू सुरु केले असता चार ते पाच वाजता च्या दरम्यान शहापूर पिंपळखुटा नदीच्या मेळावर मृत्य अवस्तेत आढळला वंदे मातरम रेस्क्यू टीम व सोबत पिंपळखुटा येथील नागरिकांनी यांनी तात्काळ चान्नी पोलिसांना माहिती दिली चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रवींद्र लांडे घटनास्थळी हजर झाले व पंचनामा करून प्रेत उत्तरिय तपासणीसाठी अकोला जिल्हा रुग्णालयात पाठविले उत्तरीय तपासणी नंतर त्यांच्यावर पिंपळखुटा येथे अंतिम संस्कार करण्यात येईल करण ची मयत झाल्यामुळे पूर्ण पिंपळखुटा गाव शोकाकुल झाले आहे पुढील तपास चान्नी पोलीस स्टेशन करत आहे.






एकता गणेश उत्सव मंडळ पाटील पुरा पातुर नंदापूर



महात्मा ज्योतिबा फुले गणेश उत्सव मंडळ माळीपुरा पातुर नंदापूर.


## अकोला बाजार पेठ






























अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
बुलडाणा, सोमवार,दि.१ सप्टेंबर२०२५



## महत्त्वाचे

### ई-केवायसी करण्याचे आवाहन

**बुलडाणा :** केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळणाऱ्या शेतकऱ्यांपैकी २ हजार ७७९ शेतकऱ्यांची ई केवायसी आणि ४ हजार २५३ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग प्रलंबित आहे. शेतकऱ्यांनी प्रलंबित ई केवायसी, आधार सीडिंग व बँक खात्याला डिबीटी इनेबल करणे किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँक मध्ये खाते उघडून त्या खात्याला आधार संग्न करून डिबीटी इनेबल करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाचे तंत्र अधिकारी समृद्धी वांगसकर यांनी केले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र आणि शासनाकडून वार्षिक प्रत्यकी सहा हजार आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेमार्फत वार्षिक प्रत्येकी सहा हजार रुपये शेतकरी कुटुंबांना दिले जात आहेत. त्यासाठी ई-केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्यावश्यक आहे, नसल्यास शेतकरी वंचित राहतील. लाभापासून

### ई-पीक पाहणी आवश्यक

**खामगाव :** हंगाम २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार राज्यात नाफेड च्या वतीने पणन महासंघामार्फत कडधान्य व तेलबिया पिकांची खरेदी करण्यात येणार आहे. खरेदीसाठी शेतकऱ्यांना ई-पिक पाहणी नोंद अस-लेला ७/१२ उतारा आवश्यक राहणार आहे. कडधान्य व तेलबिया पिकांमध्ये मुंग, उडिद, सोयाबीन व तुर या पिकांचा समावेश असून संपूर्ण खरेदी प्रक्रिया पारदर्शक, कार्यक्षम व पूर्णपणे ऑनलाईन प्रणालीद्वारे राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पणन अधिकारी एम. जी. काकडे यांनी दिली. केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेचा लाभघेण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांनी शासनाने दिलेल्या काल-ावधीत आपल्या पिकांची ई-पिक पाहणी पूर्ण करावी. अन्यथा शेतकऱ्यांना खरेदी योजनेत सामील होता येणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

### खामगांव येथे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून स्वप्नील राठोड

**खामगाव :** खामगांव येथे उपविभागीय पोलीस अधिकारी पद रिक्त होते. या पदाचा पदभार मेहकरचे उपविभागीय अधिकारी प्रदिप पाटील यांचेकडे होते. आता या पदावर धाराशिव येथील उपविभागीय पोलीस अधिकारी स्वप्नील राठोड यांची बदली करण्यात आली असून ते लवकरच आपला पदभार स्विकारणार असल्याचे समजते. स्वप्नील राठोड यांच्या नियुक्तीनंतर या उपविभागाला कायमस्वरूपी उपविभागीय पोलीस अधिकारी मिळणार आहेत. आगामी सण उत्सव बघता शहरातील शांतता व कायदा सुव्यवस्था आबाधीत रहावी याकरीता या रिक्तपदी सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करणे गरजेचे होते.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १६२५ - २२५५ |
| गहू | २५०० - २६०० |
| तुर | ५१५० - ६४२५ |
| हरभरा | ४४०० - ५९२५ |
| सोयाबीन | ३८५० - ४५६० |
| उडीद | ५१०० - ५१०० |
| मका | १६०० - १६०० |
| भुइमुग | ४४०० - ४४०० |
| बाजरी | १८०० - २३०० |
| तीळ | ८४०० - ८४०० |

## लोकप्रतिनिधींना पडला भटक्यांच्या विसर; एकजूट व भावनिक वातावरणात साजरा झाला विमुक्त भटके दिवस

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मेहकर दि.३१ :** शासनाच्या निर्णयानुसार दरवर्षी ३१ ऑगस्ट रोजी विमुक्त भटके दिवस साजरा करण्यात येतो. सन १९४७ ला आपला भारत देश स्वतंत्र झाला, मात्र देशातील भटक्या समाजाला खरी स्वातंत्र्याची चाहूल ३१ ऑगस्ट १९५२ रोजी लागली, जेव्हा समाजाला ''विमुक्त'' दर्जा मिळाला. या ऐतिहासिक दिवसाचे स्मरण म्हणून मेहकर येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे विशेष म्हणजे, मेहकर तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधींना निमंत्रण देऊनही त्यांनी या सामाजिक ऐतिहासिक कार्यक्रमाला पाठ फिरविली. यामुळे समाजमनात तीव्र नाराजी व भावनिक उद्रेक दिसून आला. ''भटक्या समाजाच्या वेदना लोकप्रतिनिधींना दिसत नाहीत का?'' असा संतप्त सवाल उपस्थितीने केला.

या कार्यक्रमाचे आयोजन समाधान गुरलकर, विजय चव्हाण, भानुदास पवार, दुर्गादास काटे व भास्कर सावळे यांनी केले होते. कार्यक्रमाला भटके नाथ जोगी, मसणजोगी, घीसाडी, पांचाळ, जोशी, बंजारा, वासुदेव, गोपाळ समाज, वडार, गोंधळी आदी विविध भटक्या जमातींच्या बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकजुटीचा संदेश दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय चव्हाण यांनी केले. या वेळी संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष पांडुरंग पाटील, दामोदर परगले, ॲड. विष्णू सरदार, बळीराम पवार यांनी मार्गदर्शक भाषणे केली. समाजाच्या न्याय हक्कांवर, शिक्षण व आरक्षणावरील अन्यायावर त्यांनी संताप व्यक्त केला. या कार्यक्रमात गोंधळी समाज, मसणजोगी व वासुदेव बांधवांनी आपले पारंपारिक कार्यक्रम सादर करून वातावरण भारावून टाकले. समाजातील परंपरा, कला व संस्कृतीचा जागर झाला. यावेळी पलावरील मुलांना कपडे वाटप करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविण्यात आले. कार्यक्रमास प्रकाश गुळवे, नामदेव बिलावर, सारंग मळेकर, राजाराम वाट, रामेश्वर यदने, संदीपकुमार बोरकर, सुनील गाडेकर, दुर्गादास काटे, शिवाजी काटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात भटक्या समाजाचा इतिहास, संघर्ष आणि अन्यायाविरोधातील लढ्याचा भावनिक आविष्कार झाला. लोकप्रतिनिधींनी गैरहजेरी लावल्याने समाजात नाराजी व्यक्त झाली असली तरी, भटक्या समाजाच्या विविध घटकांनी एकत्र येऊन या दिवसाचे औचित्य साधत ''आम्ही एक आहोत'' हा ठाम संदेश दिला.

## एकनिष्ठा फाउंडेशनची माणुसकी; रस्त्याच्याकडेला पडलेल्या बेवारस वृद्धास दिले जीवदान



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.३१:** येथील चौधरी वाईन शॉपी समोर सरकी लाईन परिसरात एक बेवारस वृद्ध पाच दिवसांपासून भरपावसात रस्त्याच्या कडेला गंभीर जखमी व आजारी अवस्थेत पडला होता. त्याच्या शरीराला आळ्या पडल्या होत्या, दुर्गंध पसरला होता. त्यामुळे कोणीही त्याच्या जवळ जात नव्हते.

दि. २९ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता ही माहिती एकनिष्ठा गौ-सेवा रक्तसेवा फाउंडेशनला मिळाल्यानंतर सुरजभैय्या यादव हे तात्काळ घटनास्थळी पोहोचले. सहकारी धर्मेंद्रसिंग चव्हाण यांच्या मदतीने वृद्धास ऑटोमध्ये बसवून सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात नेल्यानंतर सर्वप्रथम त्याचे मळकट कपडे बदलून, गरम पाणी व डेटॉल साबणाने अंघोळ घालून त्याला स्वच्छ वस्त्र परिधान करून देण्यात आली. त्यानंतर तातडीने अतीदक्षता विभागात नेऊन उपचार सुरू करण्यात आले. डॉ. अनंता पेसोडे यांनी तपासणी करून रुग्णाला अकोला रेफर करण्याचा सल्ला दिला. मात्र त्याला सामान्य रुग्णालयाच्या वार्ड क्रमांक १ मध्येच दाखल करण्यात आले. या सेवाकार्यात सुरजभैय्या यादव, शुभम क्षिरसागर, निलेश झाडोकार, डॉ. अंबादास गावंडे, प्रज्वल झाडोकार, सिद्धेश्वर निर्मळ, विशाल पवार, ध्रुव तोमर, संतोष सोळंके, चेतन सारसर, विकास शेगोकार आदींनी योगदान दिले. रुग्णाची चौकशी केली असता त्याचे नाव ओंकार झापर्डे (वय ५५, रा. जुनाफैल, खामगाव) असल्याचे समोर आले. त्याबाबतची माहिती तात्काळ शिवाजी नगर पोलीस स्टेशनला देण्यात आली आहे. सध्या वृद्धावर सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही माहिती सुरजभैय्या यादव यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

## केळवद तंटामुक्ती अध्यक्षपदी संजय पाटील

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.३१ :** महात्मा गांधी तंटामुक्ती समिती केळवदच्या अध्यक्षपदी संजय भगवान पाटील यांची सोमवार २५ ऑगस्ट रोजी ग्रामसभेतून अविरोध निवड झाली आहे. या अगोदरही त्यांनी दोन वर्ष तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. तसेच संजय पाटील हे सध्या ग्रामसेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहे.

गावात शांतता व सुवस्था अबाधित राखण्यासाठी आगामी काळात व्यसन मुक्तीवर व्यापक पातळीवर काम करणार आहे. तसेच गावात १०० टक्के दारुबंदीवर भर देणार असल्याचेही संजय पाटील यांनी नियुक्तीनंतर सांगितले. त्यांच्या निवडीबद्दल चिखली पोलिस स्टेशनचे ठाणेदार संग्राम पाटील, एपीआय समाधान वडने, सरपंच पती प्रताप पाटील, बीट जमदार अनिल वाघ, केळवदचे पोलीस पाटील नारायण हिवाळे, शाळा समिती अध्यक्ष सुरेश यंगड, धरम मोरे, नितीन हिवाळे यांच्यासह केळवद ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## लोकशाही दिन २ सप्टेंबरला

**बुलडाणा दि.३१ :** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्यानुसार सप्टेंबर महिन्याचा लोकशाही दिन मंगळवार, दि. २ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे.

लोकशाही दिनासाठी तक्रारदारांनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील अशाप्रकारे पाठवावेत, असे प्र. निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी कळविले आहे.

## मराठी कवितेचे मूळ थेरी गाथेत- सुरेश साबळे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मोताळा दि.३१ :** मराठी साहित्य क्षेत्रात आज विपूल प्रमाणत कविता लिहीली जात आहे. जागतीक पातळीवर कवितेने साहित्यात महत्वपूर्ण सांस्कृतिक जबाबदारी केलेली आहे.

आज जेव्हा मराठी कवितेचा अवकाश अकॅडेमीक पातळीवर सांगण्यात येतो तेव्हा साधरणतः ज्ञानेश्वरांपासून प्रारंभ सांगण्यात येतो. परंतु वास्तवतः मराठी साहित्याच्या इतिहासाकडे अधिक चौकसपणे प्रामाणिकतेने अभ्यासक म्हणून पाहिल्यास मराठी कवितेचा प्रारंभकाळ थेरी गाथेपासुन सुरू होऊन , महानुभाव पंथाची महादंबा यांचे धवळे, संत तुकाराम असा मराठी कवितेचा प्रवास झाल्याचे दिसुन येते, असे विचार प्रसिध्द साहित्यिक सुरेश साबळे यांनी बुलढाणा



येथील विदर्भ महाविद्यालयात राज्यस्तरीय कवितामहोत्सव समारोप सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना मांडले. यावेळी सभास्थानी ईश्वर मगर, प्रा.बी.ए.खरात, कॉम्रेड पंजाबराव गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रारंभी आयोजकांचे वतीने प्रा. मुनेश्वर जमेईवार, प्रा. डॉ. लक्ष्मण शिराळे, प्रा. डॉ. पि. डी. हुडेकर, प्रा. डॉ. संगिता काळणे पवार मॅडम यांनी शाल, स्मृतीचिन्ह, पुष्पगुच्छ देउन सत्कार केला. प्राचार्य गोविंद गायकी यांनी प्रारंभी प्रस्तावीक भाषणात दिवसभर कविता महोत्सवाच्या विविध सत्रात झालेल्या प्रत्येक कार्यक्रमाचा सविस्त आढावा घेतला. प्रा.बी.ए.खरात यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिवसभराच्या कार्यक्रमाचा आढावा घेतला आणि हा राज्यस्तरीय कविता महोत्सव यशस्वी झाल्याचे सांगून इंग्रजी कविता सादर करत महोत्सवाचा यशस्वी समारोप केला. कॉमरेड पंजाबराव गायकवाड यांनी समर्पक भाषण केले. आभार प्रदर्शन प्रा. वैभव वाघमारे यांनी केले.

## संतांच्या कार्याची प्रेरणा घेऊन नवीन ऊर्जा प्राप्त होते- श्याम उमाळकर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि.३१ :** स्थानिक श्री संत गजानन महाराज मंदिर येथे ऋषीपंचमी व श्रीच्या पुण्यतिथी महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गजानन महाराज सेवा समितीचे अध्यक्ष श्याम उमाळकर होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला हभप देवदत्त पितळे महाराज यांचे प्रवचन झाले. ह्या प्रसंगी प्रमुखपाहुणे म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव घुमरे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रा. आशिष रहाटे, जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस कलीम खान तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रदीप देशमुख, तालुका शिवसेना प्रमुख निंबा पांडव, शहर काँग्रेस अध्यक्ष पंकज हजारी, शहर शिवसेना प्रमुख किशोर गारोळे, माजी नगराध्यक्ष साहेबराव पाटोळे, माजी नगराध्यक्ष भूषण मापारी, लोणार शहर काँग्रेस अध्यक्ष समद भाई, प्रा गजानन खरात, नंदू बोरे, वसंतराव देशमुख त्या कृपाळ, माजी सभापती सागर पाटील, सौ.आरती दीक्षित ॲड. आकाश घोडे उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये जिल्हा गौरव पुरस्कार देऊन सन्मानीत झालेले ॲड. अनंतराव वानखेडे, भूषण मिनासे, राजेश मापारी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना श्याम उमाळकर यांनी सत्यजित परिवाराचे वतीने राबवित असलेल्या उपक्रमाची माहिती देत गजानन महाराज सेवा समितीच्या कार्याचा आढावा दिला. संतांचे विचारातून नवनवीन कार्य करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे सांगितले. यावेळी उपाध्यक्ष सुरेश मुंदडा, हभप गायकवाड महाराज, बबनसेठ जैस्वाल, राजन महाजन, तुषार धाराशिवकर, डॉ. सुजित महाजन, घनश्याम जोशी, ॲड. गोपाल पाखरे, विनायक टाले, मारोतराव वानखेडे, सत्यनारायण धोंडगे, विजेंद्र धोंडगे, तनशीराम मानघाले, दत्ता घनवट, विकास माऊली, नितीन शिंदे, प्रा संजय वानखेडे, आकाश घायवट, छोटू गवळी, युनूस पटेल, सुखदेव ढाकरके, उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक माजी नगराध्यक्ष विलासराव चनखोरे यांनी तर सूत्रसंचालन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सेवादलाचे सरचिटणीस शैलेश बावस्कर यांनी आभार संस्थांनचे उपाध्यक्ष सुदेश लोढे यांनी मानले.

## पन्नास परिक्षार्थीनी दिली पोलिस भरती लेखी सराव परिक्षा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**अंढेरा दि.३१ :** जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी गणेश उत्सव काळात नवनवीन संकल्पना रुजवत अनेक महत्वपूर्ण संकल्पना अंमलात आणलेल्या असताना अंढेरासह परिसरातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे तसेच आगामी होऊ घातलेली पोलिस भरतीची तयारी करणारे मुले आणि मुली यांची आपरेशन परिवर्तन अंतर्गत ठाणेदार रुपेश शक्करगे यांनी दि.३१आगस्ट २०२५ रोजी अंढेरा पोलिस स्टेशनच्या प्रांगणात सकाळी साडे दहा ते बारा दरम्यान स्पर्धा परीक्षा तसेच पोलिस भरती लेखी सराव परीक्षेचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

अंढेरा ठाणेदार रुपेश शक्करगे यांच्या आवाहनाला परिसरातील स्पर्धा परीक्षा तसेच पोलिस भरतीची तयारी करणारे मुले आणि मुलीनी उत्तम प्रकारे प्रतिसाद देत तब्बल ५० परिक्षार्थीनी हजेरी लावली. लेखी परिक्षेचे सर्व नियम पाळत मुलां - मुलींनी परिक्षा दिली.यावेळी सर्वाचे मोबाईल फोन जप्त करण्यात आले होते.आप-आपसात कोणी बोलणार नाही म्हणून पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



**संत भगवान बाबा गणेश मित्र मंडळांचे सहकार्य**

गावातील संत भगवान बाबा गणेश मित्र मंडळांचे पदाधिकारी यामध्ये समाधान नागरे,सचिन सानप,अमोल सानप,विकास कायंदे,विशाल वाघ,विलास मानवतकर यांचे लेखी सराव परीक्षेदरम्यान मौलाचे सहकार्य लाभले.झालेल्या लेखी सराव परीक्षेत पहिल्या तीन उमेदवारांना ठाणेदार रुपेश शक्करगे यांच्या वतीने योग्य बक्षीस देण्यात येणार आहे.

## हिंदू सणांवर बंदी की रोगाची दहशत; दुसरबीड परिसरात चर्चेला ऊत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**दुसरबीड दि.३१ :** सनातन हिंदू धर्मातील प्राचीन परंपरा, वैदिक सण-उत्सव व धार्मिक पर्वांवर गेल्या काही वर्षांत न्यायालयीन बंदीचे संकट वारंवार ओढवताना दिसत आहे. चिकनगुनिया, कोरोना, लंपी रोग, तसेच विविध व्हायरस यांच्या नावाखाली अनेक सणांवर निर्बंध आणले गेले. याच दरम्यान काही लिबरल सोशल मीडियाच्या माध्यमातून भीती आणि दहशतीचे वातावरण पसरवले जात असल्याचा आरोप होत आहे.

जाणकारांच्या मते, हिंदू धर्माचे सण कायमस्वरूपी थांबविण्याचा एक अदृश्य कट रचला जातोय का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. अलीकडच्या काळात नाशिक व प्रयागराज येथे दोन महाकुंभ मोठ्या अडचणींतून पार पडले. विशेषतः उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यानाथ यांच्या नेतृत्वाखाली प्रयागराज महाकुंभ व्यवस्थित संपन्न झाला. मात्र येणाऱ्या नाशिक कुंभमेळा २०२७ मध्ये अशाच पद्धतीचे कटकारस्थान होण्याची भीती वर्तवली जात आहे.

हिंदू सण-उत्सवांवर न्यायालयीन बंदीचे कारण म्हणून पर्यावरण व प्रदूषणाचे मुद्दे वारंवार पुढे केले जातात. दीपावळी आली की वायू प्रदूषण, होळी आली की पाण्याचा अपव्यय, गणेशोत्सव-नवरात्र-दसरा आला की ध्वनी प्रदूषण, तर वटसावित्री, नागपंचमी, पोळा यांसारख्या सणांवर इतर कारणांनी आडकाठी केली जाते. त्यामुळे न्यायपालिका काही अंशी लिबरल व डाव्या विचारसरणीच्या दबावाखाली काम करत असल्याचा आरोप केला जातो. देशातील काही गट लिब्राडू, डाव्या विचारसरणीचे संघटन, नक्षलवादी, दहशतवादी घटक काँग्रेससह काही राजकीय पक्षांच्या मदतीने देशात अस्थिरतेचे वातावरण निर्माण करत असल्याची टीका होत आहे. या पार्श्वभूमीवर सनातन हिंदू नवयुवक समाजाने जागृत होऊन धर्मरक्षणासाठी संघटित होण्याची गरज आहे, अशी भावना विविध सामाजिक व धार्मिक संघटनांतून व्यक्त केली जात आहे.

## माटरगाव बु. येथे गोदाम बांधकामाचा लोकार्पण सोहळा व नवीन बाजाराचा शुभारंभ

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि.३१ :** कृषी उत्पन्न बाजार समिती शेगाव अंतर्गत माटरगाव बुद्रुक उपबाजार येथे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे व कृषी उत्पन्न बाजार समिती, शेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक १००० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामाचा लोकार्पण सोहळा व नवीन धान्य बाजाराचा शुभारंभ सहकार नेते पांडुरंगदादा पाटील यांचे हस्ते उत्सहात पार पडला.

या लोकार्पण सोहळ्यास अध्यक्षस्थानी माटरगाव येथील प्रतिष्ठित नागरिक अनंतराव आळशी हे होते. प्रमुख अतिथी म्हणून माऊली ग्रुपचे चेअरमन ज्ञानेश्वरदादा पाटील, दिनेश एम.डागा, उपसरव्यवस्थापक महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालय, अमरावती, एम.जी. काकडे, जिल्हा पणन अधिकारी बुलढाणा, जिल्हा परिषद माजी सभापती सुरेशभाऊ वनारे, भीम रावजी राऊत, शेगांव खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष रघुनाथ भांबेरे, जिल्हा परिषद सदस्य राजूभाऊ देवचे, माटरगाव चे सरपंच इनायतभाई, ग्रामसेवा सोसायटी माटरगावचे अध्यक्ष राजेश बाजारे, पंचायत समितीचे सदस्य विठ्ठल सोनटक्के, शेतकरी नेते कैलासभाऊ फाटे, बाजार समितीचे माजी सभापती गजाननराव भटकर, उपसभापती सुनील वानखडे, देवलाल पाटील लांजुळकर, माजी पोलीस पाटील दिलीप देशमुख, गजाननराव देशमुख, निवृत्तीभाऊ खवले, निंबाळकर साहेब, गजानन निखाडे, महादेवराव देठे, दिंडोकार साहेब यांचे सह कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गोपाळराव मिरगे उपसभापती श्रीकांत तायडे संचालक विठ्ठलदादा पाटील,श्रीधरदादा पाटील, रमेश पाटील, दादाराव निळे, योगेश थारकर, परेश्वर हिंगणे, अमोल लांजुळकर, संजय गव्हांदे, गुलाब खा, रितेश टेकडीवाल, श्रीधर पुंडकर, वासुदेवराव धुमाळे, तेजराव दळी, अरुण पाटील खोंड, संजय शेळके, संतोष भारसाकडे, शेगांव खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष अनंतराव बोरसे, संचालक नारायण नावकार, आदी मान्यवरांची उपस्थिती होती. शेतकरी बांधवांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या हेतूने राबविण्यात येत असलेल्या या प्रकल्पाचे अनेकांनी कौतुक केले. धान्य बाजाराच्या शुभारंभामुळे शेतकऱ्यांना विक्रीसाठी सुलभता मिळणार असून, गोदामाच्या माध्यमातून त्यांच्या कृषी उत्पादनाची सुरक्षित साठवणुकीची सोय निर्माण झाली आहे. त्यामुळे परिसरातील शेतकरी बांधवांनी आपला शेतीमाल सदर धान्य बाजारात विक्रीला आणावा असे आवाहन यावेळी सहकार नेते पांडुरंगदादा पाटील यांनी केले. पणन मंडळाच्या योजना, व बाजार समिती करीत असलेले उत्कृष्ट कामकाज यावर भर देऊन पणन मंडळामार्फत व बाजार समिती मार्फत उभारण्यात आलेल्या या अत्याधुनिक गोदामाचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन दिनेश एम डागा उपसरव्यवस्थापक कृषी पणन मंडळ अमरावती यांनी केले. तर ज्ञानेश्वरदादा पाटील यांनी आपले भाषणामधून शेतमाल तारण योजना, शासनाचे किमान आधारभूत योजनेअंतर्गत उपबाजार येथील नाफेड खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांनी शेतीमाल विक्री करणे बाबत उपस्थित शेतकरी बांधवांना आवाहन करून शेतकरी हितासाठी बाजार समितीचे संचालक मंडळ सदैव कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन व्यक्त केले. कृषी पणन मंडळ पुणे व बाजार समिती शेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने उभारलेले हे अत्याधुनिक गोदाम ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठा आधार ठरणार आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या कृषी मालाला योग्य भाव मिळण्यास मदत होईल, तसेच बाजार समितीच्या व्यवहारात पारदर्शकता व गती येणार असल्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष अनंतराव आळशी यांनी आपल्या भाषणातून सांगितले. या कार्यक्रमाप्रसंगी पांडुरंगदादा पाटील यांना लोकमत गौरव पुरस्कार मिळाल्याबाबत त्यांचा सत्कार शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन माटरगाव ग्रामपंचायत व विविध कार्यकारी सहकारी संस्थेमार्फत करण्यात आला. तसेच शेगाव तालुका खरेदी विक्री संघाला राज्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झाल्यामुळे खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष श्रीधरदादा पाटील यांचे सह उपस्थित संचालक मंडळाचा सत्कार सुद्धा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन करण्यात आला. तसेच नव्याने सुरू झालेल्या धान्य बाजारात आपला शेतीमाल विक्रीला आणणारे शेतकरी बांधवांचा सत्कार सुद्धा शेला, हार, टोपी व नारळ देऊन बाजार समितीच्या वतीने करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव विलास पुंडकर यांनी केले तर सूत्रसंचालन मनिष देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन समितीचे सभापती गोपाळराव मिरगे यांनी केले. या कार्यक्रमास बाजार समितीचे कर्मचारी, व्यापारी, परिसरातील ग्रामसेवा सोसायटीचे अध्यक्ष, सदस्य, ग्रामपंचायतचे सरपंच, सदस्य, व शेतकरी बांधव यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## महत्त्वाचे

### बच्चू कडू यांचे उपस्थितीत मेळाव्याचे आयोजन

**खामगाव :** शेतकरी दिव्यांग बांधवांचे नेते प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष, माजी मंत्री बच्चूभाऊ कडू यांची हिवरखेड, ता. खामगांव व बुलढाणा येथे शेतकरी शेतमजुरांच्या न्याय हक्कासाठी मेळावा आयोजित करण्यात आला आहे तरी या मेळाव्याकरिता आवर्जून उपस्थित रहावे असे प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते गजानन लोखंडकार व प्रहार नेते शत्रुघ्न इंगळे यांनी आवाहन केले आहे. हा मेळावा दि. ३१ ऑगस्ट, रविवार रोजी सकाळी ११:०० वाजता, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह जिल्हा परिषद प्रांगण बुलडाणा येथे होणार आहे. या मेळाव्यात दिव्यांग बांधवांच्या समस्या व ज्वलंत प्रश्नांवर बच्चू भाऊ कडू शासनाला जाब विचारणार आहेत. आपल्या न्यायासाठी, आपल्या हक्कासाठी, बच्चू भाऊ कडूंसोबत ठामपणे उभे राहण्यासाठी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. हीच खरी दिव्यांग बांधवांची लढाई आहे आणि बच्चू भाऊ कडूंच्या नेतृत्वखाली न्याय मिळवण्याची हीच खरी वेळ आहे. असे प्रहार जनशक्ती पक्ष, प्रहार अपंग क्रांती बुलडाणा जिल्हा यांच्या वतीने कळविण्यात आले आह

### गणेश चतुर्थी निमित्त शासकीय दिव्यांग तपासणी बंद

**खामगाव :** बुलढाणा जिल्हा सामान्य उपचारासाठी आलेल्या महिलेची पोथ अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटस उपडकीस आली आहे. या प्रकरणी बुलडाणा शहर पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला घडली. आहे. ही घटना २४ ते २५ ऑगस्ट दरम्यान फिर्यादी रंजना शिकलाल बधीर (वय ४८, रा. बोरी आहात. खाम गाव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या आई कमालबाई अबू सरसाहेबांना २० ऑगस्ट रोजी बुलढाणा येथील सरकारी दभावान्यात दाखल करण्यात आले होते. त्या आयसीयूमध्ये उपचार घेत असताना २४ ते २५ ऑगस्ट दरम्यान रुग्णालयातील गदीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची पोत, ज्यामध्ये ३२ मणी व एक होरले होते, वजन सुमारे साडेचार ग्रॅम, किंमत अंदाजे २५ हजार रुपये, लंपास केली याप्रकरणी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पोहेका नेता कच्यूम यांनी गुन्हा दाखल केला आहे. तपास पोहेका प्रकाश बाजड करीत आहेत.

### बुलडाणा अर्बनकडून अथर्वशीर्ष पठणाला भाविकांचा प्रतिसाद

**खामगाव :** बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाच्या वतीने संस्थेच्या गोवर्धन इमारतीमधील सभागृहात गुरुवार दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी ७.०० वाजता अथर्वशीर्ष या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या धार्मिकतेचे पौरोहित्य संजय पाठक गुरुजी यांनी केले. यात महिला, जेष्ठ नागरिक व भक्तगणचा समावेश होता. या अथर्वशीर्ष पठणाच्या वेळी गणेशोत्सव मंडळाचे उपाध्यक्ष प्रशांत काळवाघे यांच्यासह श्रीकांत जोशी, महेश केसाळे, शिरीष देशपांडे, महेश महाजन, स्वप्निल ठाकुरद्वारे, केदार दामले, प्रसाद देशपांडे, संजय कुलकर्णी यांची उपस्थिती होती. या उपक्रमासाठी बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळ कार्यकारिणी व शहरातील भक्तगणांनी उत्साहपूर्ण वातावरणात पठण केले. यावेळी परिसरातील भाविक मोठया संख्येने उपस्थित होते.

## जातनिहाय जनगणना आरक्षणातील वाद मिटविण्याचा एकमेव शास्त्रशुद्ध मार्ग; ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाची भूमिका

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.३१ :** महाराष्ट्रात मागील काही वर्षांपासून मराठा व ओबीसी आरक्षण प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत आहे. विविध न्यायालयीन निर्णय, आंदोलनं व राजकीय घडामोडी यामुळे हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे. या पार्श्वभूमीवर ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाने भूमिका व्यक्त केली असून जातनिहाय जनगणना हा आरक्षणातील वाद मिटविण्याचा एकमेव शास्त्रशुद्ध मार्ग असल्याचे म्हटले आहे. आरक्षणाचा उद्देश हा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना न्याय देणे हा आहे. त्यामुळे याचे राजकारण न होता प्रत्यक्ष मागासलेपणाचा शास्त्रशुद्ध व डेटा-आधारित अभ्यास व्हावा. याकरिता जातनिहाय जनगणना हा एकमेव योग्य मार्ग आहे.

जातनिहाय जनगणनेची गरज

जातनिहाय जनगणनेतून समाजातील प्रत्योक घटकाची खरी संख्या व त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती समोर येईल. शासनाने आरक्षण व इतर शैक्षणिक, रोजगार क्षेत्रातील संधींचे वितरण डेटा-आधारित व न्याय्य पद्धतीने करता येईल. आजतागायत जे गट उपेक्षित राहिले आहेत त्यांचे मागासलेपण वस्तुनिष्ठरीत्या सिद्ध करता येईल. समाजात निर्माण होणारे गैरसमज, एकमेकांबद्दलचा अविश्वास आणि संघर्ष टाळता येईल.

शासनाची जबाबदारी

राज्य व केंद्र सरकारने एकत्रितपणे निष्पक्ष व पारदर्शक जातनिहाय जनगणना करावी, आणि मिळालेली आकडेवारी तातडीने प्रसिद्ध करावी. ही माहिती सार्वजनिक न केल्यास समााजात संशय, संभ्रम आणि तणाव निर्माण होतो. त्यामुळे पारदर्शकता हाच विश्वास निर्माण करण्याचा पाया आहे.

ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाची भूमिका

संघाने स्पष्ट केले आहे की ते नेहमीच सामाजिक सलोखा, बंधुता व न्याय याला प्राधान्य देतात. आरक्षणावरून समाजात तणाव निर्माण न होता, घटनात्मक व शास्त्रशुद्ध मार्गाने सर्व घटकांना न्याय मिळावा, यासाठी संघ लवकरच विविध ठिकाणी जनजागृती अभियान राबविणार आहे. महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवून दिलेला समानतेचा मार्ग आजही मार्गदर्शक आहे. म्हणूनच ओबीसी, मराठा, एससी, एसटी, अल्पसंख्याक अशा सर्व वंचित घटकांनी एकमेकांविरुद्ध संघर्ष करण्याऐवजी शासनाकडून न्याय्य जनगणनेची मागणी एकजुटीने करावी, असे आवाहन संघटनेचे महासचिव राम वाडीभष्मे यांनी केले आहे.

## 'मराठा आरक्षणासाठी' आमदार सिद्धार्थ खरात यांची मनोज जरांगे पाटील यांच्याशी आझाद मैदानावर चर्चा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**मेहकर दि ३१:** मराठा समाजाच्या न्याय्य आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनात एक महत्वपूर्ण घटना घडली. शिवसेना ठाकरे गटाचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि मेहकर-लोणार मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी आज मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनाला भेट दिली. या भेटीमध्ये आ.खरात यांनी आंदोलनाच्या प्रमुख नेत्यांशी सविस्तर चर्चा केली आणि समाजाच्या न्याय्य मागण्यांना समर्थन दिले. आमदार सिद्धार्थ खरात यांनी या आंदोलनाला पूर्ण समर्थन दर्शवित मराठा समाजाच्या हक्कांसाठी शासकीय पातळीवर लवकरात लवकर निर्णय घेण्याची मागणी केली. ''मराठा समाजाला शैक्षणिक, सामाजिक आणि रोजगाराच्या दृष्टीने न्याय मिळवण्यासाठी राज्य सरकारने तातडीने आणि ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे,'' असे ते म्हणाले.

तसेच, त्यांनी हेही स्पष्ट केले की प्रत्येक पिढीला समान संधी मिळणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. ''मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी जो संघर्ष सुरू झाला आहे, त्यामध्ये सशक्त आणि विधायक भूमिका घेऊन आम्ही समाजाच्या पाठीशी उभे राहणार आहोत,'' असे आमदार खरात यांनी व्यक्त केले. मनोज दादा जरांगे पाटील यांची भेट सिद्धार्थ खरात यांनी यावेळी मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रमुख नेते आणि समाजातील एक प्रेरणास्त्रोत, मनोज दादा जरांगे पाटील यांची भेट घेतली. जरांगे पाटील यांचे आंदोलनाने संपूर्ण राज्यभर मेंदूला लागणारे आवाज दिले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाच्या आरक्षणासंबंधी बऱ्याच अडचणी दूर होण्याची आशा आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नाही, तर रोजगाराच्या संधींसाठी आणि सामाजिक न्यायासाठी देखील आहे. समाजातील आर्थिक पिछाडी, शैक्षणिक पातळीवर कमतरता आणि रोजगाराच्या संधी न मिळाल्यामुळे मराठा समाज आजही मागे पडलेला आहे. त्यामुळे मराठा समाजाला शासकीय आरक्षण मिळवणे, यासाठी हे आंदोलन जोमाने सुरू आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने यामुद्द्याची गांभीर्याने दखल घेतली आहे आणि त्यावर लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. तथापि, आंदोलनकर्तांनी राज्य सरकारवर दबाव टाकला आहे की, त्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत हे आंदोलन सतत सुरु ठेवले जाईल.

## हैदराबाद मॅरेथॉनमध्ये बुलडाण्याच्या धावपटूंचा डंका!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.३१ :** देशातील दुसरी सर्वात मोठी आणि कठीण समजल्या जाणाऱ्या एनएमडीसी हैदराबाद मॅरेथॉन स्पर्धेत बुलढाण्याच्या धावपटूंनी दबदबा निर्माण केला. आव्हानांचा सामना करीत वेळेत स्पर्धा पूर्ण करुन मातृतीर्थ जिल्ह्याची मान उंचावली. एनएमडीसी हैदराबाद मॅरेथॉन ही दरवर्षी हैदराबादमध्ये आयोजित केली जाते. ही वार्षिक मॅरेथॉन स्पर्धा असून मुंबई मॅरेथॉननंतर देशातील दुसरी सर्वात मोठी मॅरेथॉन आहे. रविवारी २४ ऑगस्ट रोजी झालेल्या या मॅरेथॉनमध्ये देशातील १५० शहरांमधून स्पर्धकांनी सहभाग घेतला. भारत, केनिया व इथिओपियातील आंतरराष्ट्रीय धावपटूंचा सहभाग स्पर्धेचे आकर्षण ठरले. बुलडाणा हे स्पोर्ट हब म्हणून उदयास येत आहे. जिल्ह्यातील खेळाडूंनी वेगवेगळ्या खेळांमध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर झेंडा रोवला आहे. बुलढाणा रनिंग क्लबच्या धावपटूंचा नेहमीच विविध मॅरेथॉनमध्ये सहभाग असतो. यंदाच्या एनएमडीसी हैदराबाद मॅरेथॉनमध्ये सुद्धा बुलढाणा रनिंग क्लबच्या स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. कॉम्रेड डॉ.विजय वाघ, कॉम्रेड महेश महाजन, अजाब आखरे, कॉम्रेड संतोष जाधव, डॉ. संदीप पऱ्हाड, गणेश देव्हरे, योगेश शर्मा, पांडुरंग नाफडे, भारतसिंग राजपूत, स्वप्नील कळवाघे यांनी मॅरेथॉन उत्तम वेळ नोंदवत पूर्ण केली. तसेच डॉ. गजेंद्र निकम, डॉ. योगेश शेवाळे , प्रियंका सुरुशे, विवेक सुरुशे, रवी चव्हाण, अंकित काळे, गजानन पाटील, नीलेश शिंदे यांनी हाफ मॅरेथॉनमध्ये उत्तम वेळ नोंदवली.

## काँग्रेस युवानेते कपिल राठी यांचा वाढदिवस विविध कार्यक्रमांनी साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**मलकापूर दि. ३१:** युवा काँग्रेस नेते कपिल राठी यांच्या वाढदिवसानित्त मलकापूर येथील मराठा मंगल कार्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन दी.२९ ऑगस्ट रोजी करण्यात आले. या कार्यक्रमात चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे या प्रदर्शनात जुने काँग्रेस कार्यकर्त्यांचे छायाचित्रण व त्यांच्या कार्याची माहिती मांडण्यात आली होती. त्यामुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळाला तर नव्या कार्यकर्त्यांना प्रेरणाही मिळाली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले माजी आमदार राजेशभाऊ एकडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''काँग्रेस पक्षाला जुने कार्यकर्ते हेच खरे बळ असून त्यांचे अनुभव व कार्याची परंपरा नवे कार्यकर्ते पुढे नेत आहेत. कपिल राठी यांच्या वाढदिवसानिमित्त घेतलेले हे उपक्रम जुनी-नवी पिढी एकत्र आणणारे ठरले असून पक्ष संघटनेत नवचैतन्य संचारेल,'' असे त्यांनी सांगितले. त्यावेळी काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष अँड हरीश रावळ ,रशीद खा जमादार, दत्ताजी हिवाळे, माजी नगराध्यक्ष श्यामकुमार राठी, प्रमोद दादा अवसरमोल, प्रा. डॉ. अनिल खचे, डॉक्टर मेहबूब, काँग्रेसचे शहर अध्यक्ष रहिस जमादार, संतोष जस्वाल, सोपानराव शेलकर, अनिल गांधी ,संभाजी शिर्के, आदींनी आपले विचार व्यक्त केले गजानन तायडे, एस.पी.संबारे सर, अण्णा पाटील, दिलीप आढाव सर, कृष्णा क्षीरसागर, रजिक शेख, ईश्वर भदाले, तसेच यावेळी राठी यांचे अनुयायी, युवा कार्यकर्ते, ज्येष्ठ काँग्रेस नेते पत्रकार तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. एकीकडे सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून तर दुसरीकडे पक्षाच्या कार्यकर्त्यांना एक आणून कपिल राठी यांनी वाढदिवस साजरा केल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## संघपाल पनाड यांना राज्यस्तरीय 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार' जाहीर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**सुलतानपूर दि.२९ :**समाजातील उपेक्षित, वंचित व गोरगरिबांच्या न्यायासाठी आयुष्यभर झटणारे लोणार तालुक्यातील ज्येष्ठ समाजसेवक नागवंशी संघपाल पनाड यांना यंदाचा राज्यस्तरीय ''महामानव भारतरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार'' जाहीर झाला आहे. हा पुरस्कार आंबेडकरी चळवळ मेहकर व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटना यांच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे. नागवंशी संघपाल पनाड यांनी गेली अनेक दशके समाजकार्याच्या क्षेत्रात अविरतपणे कार्य केले आहे. गोरगरीब, पीडित, वंचित आणि उपेक्षित घटकांच्या अडचणी ओळखून त्यांच्या सोबत खंबीरपणे उभे राहणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, सामाजिक एकतेचा प्रचार-प्रसार करणे, आणि प्रत्योक दुःखी माणसाच्या वेदना समजून त्याला मदत करणे हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य राहिले आहे. गावागावांत पोहोचून संकटग्रस्त कुटुंबांना आधार देणे, गोरगरिबांच्या हक्कांसाठी लढा देणे आणि विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांनी खऱ्या अर्थाने समाजसेवेचे आदर्श उदाहरण घालून दिले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची यापूर्वीही तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय पातळीवर अनेकदा दखल घेण्यात आली असून, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार'' हा त्यांच्या कार्याला लाभलेला सर्वोच्च सन्मान मानला जात आहे.

## 'यशवंत' संस्थेकडून पर्यावरण मित्र प्रदीप डांगे सन्मानित

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.३१ :** शहरातील यशवंत सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष विनोद फकीरा इंगळे यांच्या सकल्पनेतून बुलडाणा शहरातील विविध क्षेत्रात उल्हेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तिचा सन्मान संस्था दर वर्षी करते, यावर्षी पर्यावरण क्षेत्रात उल्हेखनिय कार्य करणाऱ्या पर्यावरण मित्र प्रदिप डांगे यांचा सत्कार अनिल शेळके, सामाजिक कार्यकर्ते, सुभाष पाटिल, डॉ अतुल वानेरे, यांच्या हस्ते सन्मान पत्र देऊन करण्यात आला.

प्रदिप डांगे गेल्या ७ ते ८ वर्षा पासुन पर्यावरण क्षेत्रात उल्हेखनिय कार्य करत आहे, यामधे प्रामुख्याने पर्यावरण संरक्षण,पर्यावरण संगोपन, पर्यावरण विषई जनजागृतिपर सायकल रैली, जन्मदिनी वृक्ष लाऊ अंगणी, असे अनेक उपक्रम पर्यावरण मित्रमंडळ यांच्या माध्यमातून करत असतात, याचीच दखल घेऊन यशवंत सेवाभावी बहुउद्देशीय संस्थेकडून पर्यावरण मित्र प्रदिप डांगे यांचा सत्कार सन्मानपत्र देऊन करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्तित प्रा. प्रदिप जाधव, संजय मोरे, गौतम सरकटे, प्रकाश गवई , सागर जाधव, राज सरकटे, जगताप, प्रशिक झीने सह विशेष उपस्तिति मधे, पर्यावरण मित्र, निलेश शिंदे,अनु माकोने, प्रा. जीवन जाधव , दिपक पाटिल, सार्थक डांगे सह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## गावकऱ्यांचे अवैध धंद्यांविरोधात ग्रामपंचायत व पोलिसांना निवेदन



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मंगरुळ नवघरे दि.३१ :** गावातील सामाजिक वातावरण बिघडविणाऱ्या अवैध धंद्यांविरोधात मंगरूळ नवघरे ग्रामस्थांनी एकजुटीने ठाम भूमिका घेतली आहे. गावामध्ये सर्रास सुरू असलेल्या अवैध दारू विक्री, पेट्रोलची अवैधरित्या होणारी विक्री तसेच गुटखा विक्री याविषयी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीसह अमडापूर पोलिस स्टेशनमध्ये निवेदन देत ठोस कारवाईची मागणी केली.

यावेळी तब्बल ६८ नागरिक ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहून सामूहिक निवेदन सादर करण्यात आले. गावकऱ्यांनी स्पष्टपणे सांगितले की, या अवैध धंद्यांमुळे तरुण पिढी भरकटत असून गावातील शांतता, आरोग्य व सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात अवैध धंदे तातडीने बंद करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. ग्रामपंचायत सरपंच व सचिव या प्रकरणी कोणती ठोस भूमिका घेतात याकडे आता संपूर्ण गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

''गावात सुव्यवस्था टिकून राहावी, आरोग्यदायी वातावरण निर्माण व्हावे आणि भावी पिढी सुरक्षित राहावी, यासाठी प्रशासनाने व पोलिसांनी कठोर पावले उचलावीत,'' अशी एकमुखी मागणी नागरिकांनी केली.

## नगर परिषदेच्या सांस्कृतिक भवनाचे बांधकाम निकृष्ट

### संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्याची चिखली शहर काँग्रेसची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**चिखली दि.३१ :** नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक ६ मध्ये नगर परिषद शाळा क्रमांक १ येथे सुरू असलेल्या सांस्कृतीक भवनाच्या बांधकामामध्ये प्रचंड पारदर्शकता हवी आहे. कारण हे सांस्कृतीक भवन अनेक कार्यक्रमांचे केंद्रबिंदू असणार आहे. शिवाय ते शहराच्या वैभवात भर टाकणार आहे. मात्र चिखली नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक ६ मध्ये नगर परिषद शाळा क्रमांक १ येथे सुरू असलेल्या सांस्कृतीक भवनाच्या बांधकामाकामध्ये प्रचंड भ्रष्टाचार व निकृष्ट दर्जाचे काम उघडकीस आले आहे. एकप्रकारे हा जनतेने भरलेल्या कररुपी पैशाचा अपव्यय आहे. तरी संबधितांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी चिखली शहर काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सवडतकर यांनी बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

यावेळी झालेल्या चर्चेअंती जिल्हाधिकाऱ्यांनी थर्ड पार्टी द्वारे ऑडिट करण्याचा रिमार्क निवेदनावर दिला आहे, हे विशेष! चिखली शहर काँग्रेसच्या वतीने मंगळवार २६ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद आहे की, सांस्कृतीक भवनाच्या बांधकामामध्ये प्रचंड भ्रष्टाचार सुर आहे. सदर बांधकामध्ये कॉलम वाकलेले आहेत, लोखंडी सपोर्ट तुटलेले आहेत, पाया व मुळापासुन आधार ढसाळलेला आहे, पुन्हा सिमेंट काँक्रीट टाकरण्याची वेळ आलेली आहे. या सर्व बाबींवरून हे स्पष्ट दिसुन येते की, काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. यामुळे शासकीय निधीचा अपव्यय होवुन मुलांच्या व नागरीकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे संबंधीत ठेकेदार, अभियंता व जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ चौकशी करून कठोर कारवाई करावी, निकृष्ट दर्जाचे बांधकाम तातडीने दुरूस्त करून शाळेतील मुलांच्या सुरक्षेची हमी द्यावी, निष्कृष्ट दर्जाचे काम रद्द करून पुन्हा शासकीय निकषानुसार गुणवत्तापूर्ण काम करून द्यावे, या कामात झालेल्या निधी अपव्ययाची सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत भविष्यात सदर ठिकाणी जिवितहानी झाल्यास याला सर्वस्वी प्रशासन जबाबदारी राहील, असे निवेदनात म्हटले आहे. नगर परिषद प्रशासनाने या गंभीर विषयाकडे गांर्भीयाने लक्ष घालावे व वरील प्रमाणे तातडीची कारवाई करण्यात यावी. अन्यथा काँग्रेसच्या वतीने विद्यार्थांच्या सुरक्षेसाठी व शासनाच्या निधीच्या बचावासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, अशा इशारा चिखली शहर काँग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे. जिल्हाधिकारी बुलडाणा यांना देण्यात आलेल्या निवेदन प्रसंगी शहर अध्यक्ष राहुल सवडतकर, युवक काँग्रेसचे रिक्की काकडे, बाजार समिती संचालक जय बोन्द्रे, शहेजादअली खान, जाकीर भाई, यांची उपस्थिती होत. तर मुख्याधिकारी चिखली यांना देण्यात आलेल्या निवेदनावर शहर अध्यक्ष राहुल सवडतकर, माजी अध्यक्ष अतहरोद्दीन काझी, डॉ. मोहमंद इसरार, प्रा.निलेश गावंडे, युवक कॉग्रेसचे रिक्की काकडे, प्रदिप पचेरवाल, गोकुळ शिगणे, विजय गाडेकर, भगवानराव खरात, शहजाद , जय बोंदे, कैलास खराडे, खलील बागवान, जाकीर शेख, डॉ. अमोल लाहने, जका , विजय जागृत, प्रकाश सपकाळ, भास्कर चांदोरे, आरिफ बागवान, दिपक इंगळे, प्रशात भटकर, प्रा. मिलींद मघाडे, पवन गवारे, मंगेष जागृत, सुनिल सुरडकर, नजिर कुरेषी, सोहील शेख, राहुल चवरे, रवि वानखेडे, समीर खान, यांच्यासह सेनेचे श्रीराम झोरे, आनंद गैची, रवि पेटकर, पुंजाजी शेळके, हारून , अजीम यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, सोमवार दि. १ सप्टेंबर २०२५

# कंपनीतील विषारी पाणी शिरल्याने मासे मृतावस्थेत

## एसएमएस कंपनीवर नागरिकांचा रोष | आ. राजेश वानखडे यांची तात्काळ पाहणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३१ :** पंचतारांकित एमआयडीसी परिसरातील जलशुद्धीकरण करणाऱ्या एसएमएस कंपनीतून बाहेर सोडण्यात आलेले विषारी व रासायनिक पाणी थेट जलस्त्रोतामध्ये शिरल्याने रविवारी जामठी नाल्यात असंख्य मासे व जलचर प्राणी मृत्युमुखी पडल्याने परिसरात खळबळ उडाली.आजूबाजूला शेती असल्याने याठिकाणी अनेक जनावरे याच ठिकाणी पाणी पितात त्यामुळे भविष्यात जनावरांच्या जीवितास देखील धोका असल्याचा संशय शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

या घटनेची माहिती मिळताच आ. राजेश वानखडे यांनी तत्काळ जामठी नाला येथे धाव घेतली. त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून शेतकरी व ग्रामस्थांच्या व्यथा जाणून घेतल्या.जामठी नाला येथून सुरू असलेल्या पाण्याच्या प्रवाहात यावेळी अनेक मासे व जलचर प्राणी मृत्युमुखी झाल्याचे आढळले. पाण्याचा रंग ही यावेळी बदलला होता. लालसर रंगाचे दूषित आणि विषाक्त पाणी या नाल्यात शिरल्याने या विषाक्त पाण्यामुळे अनेक जनावरेही दगावण्याची शक्यता आहे.



एसएमएस कंपनीविरोधात आजवर ग्रामस्थांनी अनेक तक्रारी दाखल केल्या मात्र कंपनीवर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. नांदगाव पेठ, सावर्डी परिसरातील अनेक जलस्तोत्रांमध्ये पावसाळ्यात हे पाणी शिरत असून नागरिकांमध्ये संसर्गजन्य रोगाची भीती निर्माण झाली आहे. सद्यस्थितीत अनेक नागरिकांना पिण्याच्या पाण्यातून विषाक्त पाण्याचा पुरवठा होत असून भविष्यात या विषाक्त पाण्यामुळे गावकऱ्यांना अनेक रोगराईचा सामना करावा लागणार हे निश्चित आहे.

या गंभीर प्रकारामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी आ. राजेश वानखडे यांना तक्रार सादर करून या विषाक्त व दूषित पाण्याचा प्रवाह थांबविण्याची विनंती केली. आ. राजेश वानखडे यांनी शेतकऱ्यांच्या तक्रारीवर जिल्हाधिकाऱ्यांशी तातडीने चर्चा करून या दूषित व विषारी पाण्याच्या प्रवाहावर तात्काळ बंदोबस्त करण्यात येईल, असे ठाम आश्वासन त्यांनी शेतकऱ्यांना दिले. स्थानिक शेतकऱ्यांनी यापूर्वीही अनेकदा या कंपनीच्या रासायनिक पाण्यामुळे पिके व जलस्त्रोतांचे मोठे नुकसान होत असल्याची तक्रार केली होती. मात्र रविवारी घडलेल्या घटनेने संतापाची लाट उसळली आहे.

यावेळी आ. राजेश वानखडे सह प्रदीप गौरखेडे, राजू चिरडे, विनोद पटेल, उमेश डोईफोडे,अजयसिंग चव्हाण व परिसरातील असंख्य शेतकरी यावेळी उपस्थित होते.तात्काळ हे दूषित आणि विषाक्त पाणी बंद झाले नाही तर एसएमएस कंपनीवर सर्व गावकरी मोर्चा काढून कंपनी बंद पाडणार असा थेट इशारा संतप्त शेतकऱ्यांनी दिला आहे.

> एसएमएस कंपनीतील विषारी पाणी जामठी नाल्यात शिरल्याने शेकडो मासे मृतावस्थेत दिसून आले. त्यामुळे नाल्याच्या शेजारी असलेल्या शेतकऱ्यांनी चिंता व्यक्त केली आहे. या घटनेची महिती तिवसा मतदार संघाचे आ. राजेश वानखडे यांना कळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवून संबंधित कंपनीवर कारवाई करण्याचे आश्वासन नागरिकांना दिले आहे.

# दरोडा टाकणारे आरोपी पोलिसांच्या ताब्यात

## सुरूची हॉटेल दरोडा प्रकरण, चार आरोपी अटक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३१ :** शहरातील गाडगेनगर परिसरातील हॉटेल सुरूची बार अँड रेस्टॉरंटवर २९ ऑगस्ट रोजी झालेल्या दरोड्याचा उलगडा शहर गुन्हे शाखेने केला आहे. या कारवाईत प्रमुख आरोपींसह काही साथीदार पोलिसांच्या ताब्यात आले आहेत. २९ ऑगस्टच्या रात्री आशीष मकेश्वर, सिद्धार्थ वानखडे, तेजस देशमुख, सागर खिराडे आणि आणखी काही साथीदारांनी हॉटेल सुरूचीचे गेट तोडून आत प्रवेश केला. तेथील मॅनेजरला मारहाण करून जीवघेणी धमकी दिली, टेबल-खुर्च्य

फोडल्या आणि गल्ल्यातील ४ ते ५ हजार रुपये लुटून आरोपी पसार झाले. याप्रकरणी गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता. या आरोपींच्या



शोधासाठी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी स्वतंत्र पथके तयार केली. गुप्त माहितीवरून रहाटगाव परिसरात छापा टाकण्यात आला आणि सागर खिराडे, निखील चक्रे व सिद्धार्थ वानखडे हे तिघे जेरबंद झाले. चौकशीत कबुली दिल्यानंतर उर्वरित आरोपी आशीष मकेश्वर व प्रतिक वानखडे यांनाही अटक करण्यात आली. आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी अटकेत आलेले आरोपी पूर्वीपासून गुन्हेगारी जगतात सक्रिय आहेत. त्यांच्या नावावर खून, खुनाचा प्रयत्न, दंगा व शस्त्र बाळगणे अशा गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. ही धडाकेबाज कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त रमेश धुमाळ व सहाय्यक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीाय महेश इंगोले, सुनील लासूरकर, फिरोज खान, सतीश देशमुख, आस्तिक देशमुख, जहीर शेख, विकास गुडधे, मंगेश शिंदे, संग्राम भोजने, रंजीत गावंडे, विशाल वाकपांजर व योगेश पवार यांनी केली.

# दहशत पसरविणाऱ्या गुंडला केली अटक

## राजापेठ पोलिसांची कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३१ :** घरफोड्या व चोरीच्या मालिकेतील कुख्यात ठरलेला आणि शहरात दहशत निर्माण करणारा सुजीत सहदेवराव भोंगारे (रा. गायत्री नगर, सरोज कॉलनी, अमरावती) अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला. राजापेठ पोलिसांनी वॉरंट पथकाच्या मदतीने त्याला अटक करून न्यायालयात हजर केले आहे. सन २०२० मध्ये भोंगारेने आपल्या साथीदारासह अमरावती शहरात घरफोड्यांची मालिका राबवली होती. त्यावेळी मोठे एलईडी टीव्ही आणि इतर साहित्य चोरून परिसरात धास्ती निर्माण केली होती. त्याच्यावर शहरातील विविध पोलिस ठाण्यांत चोरी व घरफोडीचे तब्बल २० हून अधिक गुन्हे नोंद आहेत. तो न्यायालयीन कोठडीत असताना जामिनावर सुटला आणि फरार



झाला होता. न्यायालयाने त्याच्यावर पकड व प्रोक्लमेशन वॉरंट जारी केले होते तसेच काही प्रकरणांत त्याला फरार घोषित करण्यात आले होते. २९ ऑगस्ट रोजी तो विकलेल्या घराच्या व्यवहारासाठी जिल्हा परिषद कार्यालया समोरील निबंधक कार्यालयात आल्याची माहिती मिळताच, राजापेठ पोलिसांचे वॉरंट पथक तत्काळ खाना झाले. पथकाने त्याला तेथेच गाठून अटक केली. न्यायालयाच्या आदेशानुसार आरोपी सुजीत भोंगारे याला भादंविच्या कलम ४५४, ४५७, ३८० अंतर्गत पकड वॉरंटान्वये अटक करण्यात आली आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त शाम घुगे आणि सहाय्यक पोलिस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलिस निरीक्षक पुनित कुलट यांच्या नेतृत्वाखाली वॉरंट पथकातील पोलिस हवालदार आशिष विघे, विक्रम देशमुख, जगदीश वानखडे, सतीश टपके व आबिद शेख यांनी केली.

# बस स्टँड जागेवरून वाद; पाच जणांवर गुन्हे दाखल

**कुऱ्हा :** अंजनसिंगी येथे बस स्टँडच्या जागेवरून झालेल्या वादातून पाच जणांनी एका कुटुंबाला शिवीगाळ करून, मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गैरकायदेशीर जमाव, जबर दुखापत आणि धमकी देण्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल केला आहे. दिगांबर डोमाजी दिवे (६०), अवधुत दिगांबर दिवे (४५), तेजस अवधुत (२३), यश अनिल वाळके (२५) व जय अवधुत दिवे (२३) सर्व रा. अंजसिंगी अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. अंजनसिंगी येथे बस स्टँडच्या जागेवरून हा वाद उफाळला. फिर्यादी कुणाल सुभाष जयस्वाल (२९, रा. अंजनसिंगी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे तीन कर्मचारी आणि तेजा दिवे यांच्यासह बस स्टँडच्या जागेबाबत चर्चा करत होते. यावेळी अवधुत दिवेस यांनी जुन्या बस स्टँडची जागा याच ठिकाणी होती आणि नवीन बस स्टँडही येथेच व्हायला हवे, असे मत व्यक्त केले. यावर फिर्यादीने त्यांच्या घराजवळ बस स्टँड होऊ देणार नाही, असे स्पष्ट केले. यातून वाद वाढला. पाचही जणांनी फिर्यादी आणि त्यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ केली. त्यांनी फिर्यादीच्या वडिलांच्या डोक्यावर स्टीलच्या कुबडीने मारहाण केली.

## मध्यरात्री फिरणारे दोन संशयित ताब्यात

**अमरावती** - शहरातील नागपुरी गेट पोलिसांनी रात्री गस्तीदरम्यान वेगवेगळ्या कारवायांत दोन इसमांना शुक्रवारी (दि. २९) ताब्यात घेतले. हे दोघेही मध्यरात्री विविध परिसरात संशयास्पदरित्या फिरताना आढळून आले. त्यांची हालचाल गुन्हेगारी उद्देशाची असल्याचा संशय असून, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली.

# कुख्यात गुंडावर तडीपारीची कारवाई

## शिरखेड पोलिसांची कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**शिरखेड :** सण-उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी जिल्हा पोलिसांकडून कठोर पावले उचलली जात आहेत. त्याचाच भाग म्हणून शिरखेड पोलिसांनी दहशत पसरवणारा



अभिजीत उर्फ अभिनय राजकुमार वानखडे (२९, रा. कवठाळ, ता. मोर्शी) यास जिल्ह्याच्या हद्दीतून हद्दपार केले आहे.

वानखडे याच्यावर शारीरिक गुन्ह्यांसह अनेक गंभीर प्रकरणे दाखल असून, पूर्वी केलेल्या प्रतिबंधात्मक कारवाईंचा त्याच्यावर काहीही परिणाम झाला नव्हता. उलट त्याची गुन्हेगारी प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत होती. यामुळे शिरखेड पोलीस ठाण्याचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लुले यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ (१) (अ) (ब) अंतर्गत वानखडे याच्याविरुद्ध तडीपारीचा प्रस्ताव तयार करून सादर केला. हा प्रस्ताव मोर्शी उपविभागीय अधिकारी यांनी मान्य केला व वानखडे याला दोन महिन्यांसाठी अमरावती जिल्ह्याच्या हद्दीतून तडीपार करण्याचे आदेश दिले.

# अमरावती-मुंबई विमानसेवा ठप्प

## ऑपरेशनल समस्येचे कारण; लोकप्रतिनिधींवर नागरिकांचा रोष

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३१ :** कायम वादाच्या भोवऱ्यात राहणारी अमरावती-मुंबई विमानसेवा पुन्हा एकदा ठप्प झाली आहे. ऑपरेशनल समस्येचे कारण देत २१ ऑगस्टपासून बंद आहे. यामुळे प्रवाशांत रोष वाढत आहे. २० वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अमरावती विमानतळावरून अमरावती-मुंबई विमानसेवा सुरू झाली. मात्र २१ ऑगस्टपासून ही सेवा बंद असल्याची माहिती समोर आली आहे. ३१ ऑगस्टपर्यंत अमरावती विमानतळावरून कोणत्याही विमानाचे उड्डाण होण्याची चिन्हे दिसत नाही. शनिवारी (दि. ३०) अलायन्स एअरचे अमरावती विमानतळ व्यवस्थापक राजकुमार पटेल यांनी दावा केला. त्यानुसार सोमवार (दि. १) पासून उड्डाण नियमित असे सांगितले. २२, २५ आणि २७ ऑगस्ट रोजी उड्डाणे रद्द करण्यामागे ऑपरेशनल समस्या असल्याचा दावा त्यांनी केला. २१ ऑगस्टपासून बंद असलेल्या अमरावती-मुंबई हवाई सेवेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून



कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. तसेच, अमरावती-मुंबई हवाई सेवा सुरू करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत. अमरावती आणि मुंबई दरम्यान विमानसेवा चालवणाऱ्या अलायन्स एअर कंपनीने २१ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत अमरावती विमानतळावरून विमानांचे ऑपरेशन बंद करण्याबाबत विमानतळ प्राधिकरणाला लेखी कळवले आहे. या कालावधीत अलायन्स एअरचे कोणतेही विमान मुंबईहून अमरावतीला येणार नाही किंवा अमरावतीहून मुंबईला जाणार नाही.

अलायन्स एअरचे अमरावती विमानतळ व्यवस्थापक राजकुमार पटेल यांनी सांगितले की, ऑपरेशनल समस्यांमुळे तीन उड्डाणे रद्द करावी लागली. याबाबत प्राधिकरण आणि प्रवाशांना माहिती देण्यात आली. सोमवार (दि. १) पासून उड्डाण नियमित होतील. आठवड्यात अमरावतीच्या येणाऱ्या आणि जाणाऱ्या तिन्ही उड्डाणांचे बुकिंग देखील नेहमीप्रमाणे सुरू असल्याचे व्यवस्थापक त्यांनी सांगितले.

## कंपनीकडे फक्त ४ विमाने

अमरावती आणि मुंबई दरम्यान हवाई सेवा चालवण्याची जबाबदारी अलायन्स एअर कंपनीकडे आहे. मात्र त्यांच्याकडे पुरेशी विमान नाहीत. माहितीनुसार, या कंपनीकडे २० विमानांचा ताफा असणे आवश्यक आहे. परंतु कंपनीकडे उपलब्ध असलेल्या २० विमानांपैकी फक्त ४ विमाने कार्यरत आहेत, म्हणजेच उड्डाण करण्यास सक्षम आहेत. अलायन्स एअर कंपनी या ४ विमानांच्या मदतीने आपले कामकाज चालवत असल्याची माहिती आहे.

# थोडक्यात

## व्यवस्थापकाला शिवीगाळ करीत लुटले

**अमरावती:** कठोरा मार्गावरील बालाजी नगर येथील सुरूची बार अँड रेस्टॉरंटमध्ये चार नियमित ग्राहकांसह चार अज्ञातांनी बार व्यवस्थापकाला मारण्याची धमकी देत शिवीगाळ केली. इतकेच नव्हे, तर गल्ल्यातील ४ ते ५ हजार रुपये जबरीने हिसकावून नेले. याबाबत बार मालक मदनलाल रामलाल जयस्वाल (६२, रा. श्रीकृष्ण नगर) यांनी गाडगे नगर पोलिसात तक्रार दिली. सविस्तर वृत्तानुसार, फिर्यादीच्या बारमध्ये बार व्यवस्थापक व अन्य सात कर्मचारी कार्यरत आहेत. २९ ऑगस्ट रोजी रात्री साडे बाराच्या सुमारास त्यांच्या बारचे बंद गेट तोडून चार नियमित ग्राहकांसह अन्य चौघे आत आले. त्यांनी व्यवस्थापकाची मानगूट पकडून त्याला जीवे मारण्याची धमकी देत शिवीगाळ केली. इतकेच नव्हे, तर तेथील टेबल, खुर्चा व अन्य साहित्याचीही फेकाफेक केली. सोबतच गल्ल्यातील ४ ते ५ हजारांची रोख जबरीने हिकावून निघून गेले. व्यवस्थापकाने ही बाब फिर्यादीच्या कानावर टाकली. त्यांनी त्वरित गाडगे नगर पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी एकूण आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## पाण्यावरून दोन गटात वाद

अमरावती : हरताळा येथे नळाचे पाणी भरताना ते रस्त्यावर वाहत असल्याने शेजाऱ्यांना महिलेसह तिचा पती व दिरासोबत वाद घालत त्यांना शिवीगाळ करीत मारहाण केली. याबाबत महिलेच्या तक्रारीवरून भातकुली पोलिसांनी शुभम गजानन डोईफोडे (३०) याच्यासह दोन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास भातकुली पोलीस करीत आहे.

## वाहनातून मिक्सर मशीनची चोरी

**मोर्शी :** दापोरी येथे फिर्यादी संजय विठ्ठलाल नागले (४९) यांच्या आयसर गाडीतून (एमएच ४०-बीजी ६१८३) अज्ञाताचे चार मिक्सर मशीन चोरून नेल्या. त्याची अंदाजे किंमत ५ हजार रुपये आहे. याबाबत त्यांच्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

## क्षुल्लक वादावरून युवकाला मारहाण

**धारणी :** शेतात आलेले पोपट पळवायला गेलेल्या युवकाला दोघांनी शिवीगाळ करीत काठीने मारहाण केली. ही घटना हिराबंबई येथे घडली. जखमी मुलाचे वडील जगदिश सहू तडोकार (४०) यांच्या तक्रारीवरून धारणी पोलिसांनी मोहन एरांग झामरे (२८) व कैलास एरांग झामरे (३०) दोघेही रा. हिराबंबई यांच्या गुन्हा नोंदवला.

## जेवणाच्या कारणावरून पत्नीला काठीने मारहाण

**परतवाडा :** बाहेरून आलेल्या पतीने पत्नीला जेवण वाढायला सांगीतले असता, पत्नीने त्याला जाब विचारत हटकले. त्याचा राग आल्याने पतीने लाकडी काठीने तिला मारहाण केली. त्यात तिच्या डोक्याला दुखापत झाली. ही घटना सावळी दतुरा येथे घडली.

## पिशवीतून रोकड लंपास

**दर्यापूर :** आईच्या खात्यातून फिर्यादी प्रति रामचरण ग्रहवंशी (४८, रा. राजपुतपुरा, दर्यापूर) यांनी ५० हजार रुपये काढले. ते एका पिशवीत ठेवून ती दुचाकीला लावली. बुटी चौकात ते दूध घेण्यासाठी गेले. परत आले असता, त्यांना दुचाकीला पैशांची पिशवी दिसली नाही. अज्ञाताने ती चोरून नेल्याची तक्रार त्यांनी दर्यापूर पोलिसात नोंदवली.

## थोडक्यात

### शहरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अमरावती :** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश दि. ३० ऑगस्ट ते दि. १३ सप्टेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी कळविले आहे.

### जिल्हास्तरीय लोकशाही दिन मंगळवारी

**अमरावती :** जिल्हास्तरीय लोकशाही दिन दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. परंतु दि. १ सप्टेंबर रोजी ज्येष्ठागौरी पूजन निमित्त सार्वजनिक सुटी असल्यामुळे सप्टेंबर महिन्याचा लोकशाही दिन, मंगळवार, दि. २ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिक्षक निलेश खटके यांनी केले आहे.

### आधार, स्वयंम योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**अमरावती :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. यामध्ये वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना यांचा लाभ घेण्यासाठी १८ सप्टेंबरपूर्वी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बारावीनंतरच्या बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय वसतिगृहामध्ये अर्ज करणे अनिवार्य आहे. अर्ज hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार आहे.

### स्वाधार योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांपैकी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील इयत्ता अकरावी व बारावी तसेच इयत्ता बारावी नंतरच्या व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमा मध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ घेता येईल. परंतु ५० टक्क्यांपेक्षा जास्त गुण असलेल्या विद्यार्थ्यांनाच या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

### राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धा

**अमरावती :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने आज मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात पार पडली. खासदार डॉ. अनिल बोंडे आणि आमदार संजय खोडके यांच्या हस्ते क्रिडा दिनाचे उद्घाटन झाले. यावेळी शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. नितीन चव्हाळ आणि जिल्हा शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनेचे अध्यक्ष अजय आळशी उपस्थित होते.

# डॉक्टरांचे कोट्यवधींचे मानधन थकले

## सुपर स्पेशालिटी डॉक्टर संपावर, रुग्णांचे बेहाल | ११ किडनी प्रत्यारोपणासह शेकडो शस्त्रक्रिया ठप्प

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३१ : अमरावतीतील सुपर स्पेशालिटी रुग्णालय, जे विभागातील गोरगरीब रुग्णांना जीवनदायी ठरत होते, सध्या मोठ्या संकटातून जात आहे. या रुग्णालयातील २५ स्पेशालिस्ट डॉक्टरांनी गेल्या आठवड्यापासून संप पुकारला असून, ११ किडनी ट्रान्सप्लांटसह ३०० ते ४०० हून अधिक रुग्णांची महत्त्वाची शस्त्रक्रियेची कामे ठप्प झाली आहेत. डॉक्टरांचे कोट्यवधी रुपयांचे मानधन मागील वर्षभरापासून थकीत असून, मानधनात वाढीची मागणीही शासनाकडून प्रलंबित आहे.**




शहराचे माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी या गंभीर परिस्थितीवर संताप व्यक्त करत लोकप्रतिनिधींवर ताशेरे ओढले. गोरगरिबांना उच्च दर्जाच्या आरोग्यसेवा मिळाव्यात म्हणून सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारले. मात्र आज स्थिती अशी आहे की, मानधन न मिळाल्याने डॉक्टर संपावर आहेत आणि रुग्ण शस्त्रक्रियेअभावी धोक्यात आहेत. लोकप्रतिनिधी नवीन प्रकल्प सुरू करणे तर दूरच, पण उभारून दिलेल्या सुविधा तरी नीट चालवू शकत नाहीत. हे त्यांच्या अकार्यक्षमतेचे मूर्तिमंत उदाहरण आहे, अशी कठोर टीका डॉ. देशमुख यांनी केली. गोरगरीबांच्या आरोग्याशी संबंधित असा ज्वलनशील प्रश्न असताना लोकप्रतिनिधींनी हस्तक्षेप न करणे ही लाजिरवाणी बाब आहे. पालकमंत्र्यांनी तातडीने लक्ष घालून डॉक्टरांचे थकीत मानधन अदा करावे, मानधन वाढीच्या मागण्या पूर्ण कराव्यात आणि तातडीने शस्त्रक्रिया सुरू कराव्यात अशी मागणी डॉ. देशमुख यांनी केली.

**नागरिकांना जीवघेणी स्थिती**

या संपामुळे दररोज शेकडो रुग्ण अडकले आहेत. किडनी ट्रान्सप्लांट, कार्डिओलॉजी, न्युरोलॉजी, पेडियाट्रिक्स व प्लास्टिक सर्जरीसारख्या शस्त्रक्रिया थांबल्या आहेत. रुग्णालयाचा पूर्ण कारभार ठप्प असून, जीव धोक्यात घालून रुग्णांना खासगी रुग्णालयात जावे लागत आहे.

**सुपर स्पेशालिटीची दुसरी टप्पाही थांबलेला**

दुसऱ्या टप्प्यात मेंदूविकार, कॅन्सर आणि हृदय शस्त्रक्रियेसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करायच्या होत्या. चार वर्षांपूर्वी आवश्यक यंत्रसामग्री मंजूर झाली होती, मात्र आजतागायत ती बसवली गेली नाही. यावरून लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेचे अधोरेखन होत असल्याचे डॉ. देशमुख म्हणाले.

### गोरगरीबांसाठी जीवनदायी ठरलेले हॉस्पिटल

सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची स्थापना २००८ मध्ये झाली. तेव्हापासून किडनी, पेडियाट्रिक्स, प्लास्टिक सर्जरी, हृदय यांसारख्या अत्यावश्यक शस्त्रक्रिया गोरगरीब रुग्णांना उपलब्ध झाल्या. या शस्त्रक्रिया खाजगी रुग्णालयात अतिशय महाग असतात. त्यामुळे पूर्वी अनेक रुग्ण उपचाराअभावी मृत्यूमुखी पडत होते. सुपर स्पेशालिटीच्या माध्यमातून ही दरी भरून निघाली. मात्र गेल्या काही वर्षांत डॉक्टरांचे मानधन वेळेवर न मिळाल्याने संकट वारंवार निर्माण होत आहे.

### सुपर स्पेशालिटी संपाचे ठळक मुद्दे

२५ डॉक्टर संपावर आहे. यामध्ये युरोलॉजी, कार्डिओलॉजी, न्युरोलॉजी, पेडियाट्रिक्स, प्लास्टिक सर्जरीतील तज्ज्ञ डॉक्टरांचा सहभाग आहे. या डॉक्टरांचे ऑगस्ट २०२४ पर्यंत वेतन मिळाले; परंतू त्यानंतर १ सप्टेंबरपासून थकबाकी आहे. जीआर २०१३ पासून वेतन स्थिर असून, हे दर रिव्हाईज न केल्याने डॉक्टरांचा विरोध आहे. अनेकदा संप केला आहे. २०१३, २०१५, २०१७, २०२१ नंतर आता पुन्हा संप पुकारला आहे. या संपामुळे 11 किडनी ट्रान्सप्लांटसह ३००-४०० शस्त्रक्रिया ठप्प पडल्या आहेत. त्यामुळे गोरगरिब रुग्णांवर उपचारांचा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## आदर्श महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि. ३१ :** स्थानिक धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श विज्ञान ज. भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे नुकताच राष्ट्रीय क्रीडा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. बायस्कर, प्रमुख अतिथी डॉ. दीपक शृंगारे, डॉ.अजय चिंचमलातपुरे, सौरभ पांडेय उपस्थित होते. प्रास्ताविक शारीरिक व क्रीडा विभागाचे विभाग प्रमुख डॉ. अजय चिंचमलातपुरे यांनी केले. खेळ विषयक जनजागृती पर शपथ




उपस्थित विद्यार्थ्यांना देण्यात आली. महाविद्यालयातील उत्तुंग व वेगवेगळ्या स्तरावर महाविद्यालयाचे नाव उंचावणाऱ्या उत्कृष्ट खेळाडू अर्पिता वाघमारे, स्नेहल कोटनाके, उज्वला कोटनाके, राजनंदिनी इंगोले, खुशी ठावरे वेदांत वऱ्हाडे यांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यानंतर डॉ. शृंगारे यांनी आपल्या उत्कृष्ट शैलीत मेजर ध्यानचंद यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत असताना खेळाचे आपल्या आयुष्यातील महत्त्व व्यक्त केले. त्यानंतर अध्यक्ष मार्गदर्शनात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बायस्कर यांनी महाविद्यालयात खेळ या विषयासंबंधी ज्या सुविधा उपलब्ध आहेत त्यांचा विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन आपल्या व्यक्तिमत्त्वांमध्ये विकास घडवून आणावा अशी अपेक्षाही व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा विशाल मोकाशे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. ओबेद कुरेशी, प्रा. रुपेश डहाके, प्रा. पंकज धामसे, प्रा. डॉ. सचिन मनोहरे, प्रा. मोहसीन, प्रा. फुरकान पठाण, प्रा. प्रवीण केचे, प्रा.नरेंद्र नागपुरे, डॉ. पूनम गहुकर, डॉ. शिल्पा विधळे, प्रा. राऊत, सह अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## शेंदूरजनाघाट येथे रक्तदान शिबिर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वरूड, दि. ३१ :** शिवसेनेच्या वतीने शेंदुरजनाघाट येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक राजे छत्रपती शिवाजी महाराज हिंदुरुदय सम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांना वंदन करून शिवसेना पक्षाचे मुख्य नेते माजी मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शक अमरावती जिल्ह्याचे शिवसेना नेते आनंदराव अडसूळ व ज्यांची नुकतीच अमरावती जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख पदी निवड झाली. असे आमचे लाडके नेते राष्ट्रीय सचिव कॅप्टन अभिजीत अडसूळ व वरूड तालुक्याचे युवा शिवसेना नेते अमोल भुयार यांच्या नेतृत्वात शिवसेना शहरप्रमुख पवन गोरडे यांच्या




वाढदिवसानिमित्त मोठ्या उत्साह मध्ये भव्य रक्तदान शिबिर पार पडले. यावेळी वरूड तालुक्यातील शेंदूरजनाघाट गावामध्ये असंख्य शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच गावातील ३९ नागरिकांनी रक्तदान केले. रक्तदान हेच श्रेष्ठदान समजून शिवसेनाप्रमुखांनी सांगितल्या प्रमाणे ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण समजून शिवसैनिकांनी रक्तदान केले. यावेळी अमोल भुयार गौरव सरोदे पवन गोरडे नितीन सिनकर अनिल लोखंडे हर्षल हमाने मुकेश माकोडे राज पंधरे सुनील तिजारे अक्षय इंगळे विजय घोरमाडे असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

## मुरूमाची अवैध वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

### दर्यापूर तहसील पथकाची कारवाई

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. ३१ :** महसूल विभागाच्यावतीने अवैध गौण खनिज वाहतुकीवर सातत्याने कारवाई सुरू आहे. गेल्या दोन दिवसांत दर्यापूर तहसील कार्यालयाच्या पथकाने तीन वाहनांवर कारवाई केली आहे.

शनिवारी (दि. 30) सकाळी नगर परिषद कार्यालयासमोर महसूल विभागाच्या पथकाने विना क्रमांकाचा, विनापरवाना मुरूम वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त केला. पथकाने चालकाकडे परवानगीपत्र आणि रॉयल्टीची माहिती विचारली असता, त्याच्याकडे कोणतीही कागदपत्रे आढळली नाहीत.

सदर मुरूम शासकीय कामासाठी जात असल्याचे सांगण्यात आले, मात्र अधिकृत परवानगी नसल्याने ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. या कारवाईत अंदाजे एक ब्रास मुरूम, तसेच ट्रॅक्टर व ट्रॉली जप्त करून पंचनामा तहसील कार्यालयात सादर करण्यात आला आहे. ट्रॅक्टर तहसील कार्यालय परिसरात जमा करण्यात आला आहे. ही कारवाई मंडळ अधिकारी राजेश मिरगे, तलाठी विश्वनाथ गोंडाणे, तलाठी गीते व तलाठी इंगळे यांच्या उपस्थितीत पार पडली.

## उत्कृष्ट अध्यापन स्पर्धेत गांधी विद्यालयाचे शिक्षक प्रशांत दुधे प्रथम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि.३१ :** २१ ऑगस्ट रोजी महानगर पालिका शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या उत्कृष्ट अध्यापन विडिओ निर्मिती स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाचा भव्य कार्यक्रम महानगर पालिका सभागृहात संपन्न झाला. या समारंभाला शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, मानकर, राठोड, व्यास, सौ. देव व सपकाळ आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्य शैक्षणिक संशोधन परिषद, पुणे यांच्या वतीने मागील वर्षी जिल्हा व तालुका स्तरीय उत्कृष्ट अध्यापन विडिओ निर्मिती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत संपूर्ण



महाराष्ट्रातील अनेक शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता.

त्यात अमरावती तालुक्यातील बडनेरा येथील गांधी विद्यालयाचे इंग्रजी विषयाचे शिक्षक प्रशांत आनंद दुधे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. समारंभात त्यांना मनपा शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम यांच्या हस्ते रु. ३०००, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

आपल्या यशाचे श्रेय दुधे यांनी संस्थेचे अध्यक्ष डॉ. हेमंतजी देव, उपाध्यक्ष राजेश टारपे, आनंदराव इंगोले, सभापती रामेश्वरजी लाड व प्राचार्या वंदना टिक्कस व सर्व शिक्षकवृंद यांनी शिक्षक प्रशांत दुधे यांचे अभिनंदन केले आहे.



## शहीद भगतसिंग गणेशोत्सव मंडळाला आ. रवि राणांची भेट

**अमरावती, दि. ३१ :** दरवर्षी प्रमाणे राजापेठ येथील शहीद भगतसिंग मंडळाने यावर्षी सुद्धा सुप्रसिद्ध असलेल्या प्रभू खाटू श्रीश्याम जी नरेश यांच्या भव्य दिव्य देखाव्याचे उद्घाटन लोकप्रिय आमदार रवीभाऊ राणा यांचे हस्ते करण्यात आले त्यावेळी मंडळाचे अध्यक्ष अनुप अग्रवाल यांच्या समवेत मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आमदार रवीभाऊ राणा यांचे शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला त्यावेळी राजापेठ ठाण्याचे ठाणेदार पुनीत कुलट, दिनेश सेठिया,गजानन रेवाळकर, विनोद गुहे, नितीन बोरेकर ,प्रमोद सोनोने, सुरज मिश्रा, गुड्डू माहुलकर अक्षय गावंडे, रत्नदीप पेठकर, डॉ चैतन्य बुरखंडे मनोज अग्रवाल,अनिल अग्रवाल,राहुल निकोरे, शेरू चव्हाण मंगेश तटके कुशल बोबडे शेखर चव्हाण, इत्यादी मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# युवक काँग्रेसचे वोट चोर खुर्ची छोड आंदोलन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ३१ :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते तसेच लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी देशभरातील निवडणूक प्रक्रियेत वोट चोरी संदर्भात केलेल्या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर, युवक काँग्रेसने या प्रकरणाला गंभीरपणे घेत एका देशव्यापी आंदोलनाची सुरुवात केली आहे. याच संदर्भात, शनिवारी अमरावती शहरात (जिल्हा) युवक काँग्रेस आणि नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (एन.एस.यू.आय.) यांच्या संयुक्त विद्यमाने 'वोट बोर खुर्ची छोड' हे आंदोलन बस स्थानक परिसरात करण्यात आले.

आंदोलनाचे आयोजन युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू आणि प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्या आदेशानुसार करण्यात आले होते. कॉग्रेस नेते राहुल गांधी यांनी ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथील पत्रकार परिषदेत निवडणूक आयोग आणि भारतीय जनता पक्ष







## जिल्हाध्यक्ष निलेश गुहे यांच्या नेतृत्वात बसस्थानक परिसरात निदर्शने

(भाजप) यांच्यावर गंभीर आरोप केले होते. त्यांनी दावा केला की, महाराष्ट्रात सुमारे १ कोटी संदिग्ध मतदार मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. आणि बेंगलुरूच्या महादेवपुरा विधानसभा क्षेत्रात १ लाखांहून अधिक फर्जी मतदारांची नोंद आहे. यासह मध्य प्रदेश, हरियाणा आणि बिहार येथील निवडणुकांमध्येही मतदार यादीत अनियमितता आणि बोट चोरी झाल्याचा आरोप त्यांनी केला. या पार्श्वभूमीवर, अमरावती येथील आंदोलनाचा उद्देश निवडणूक आयोगाच्या कथित निष्क्रियते आणि भाजपच्या कथित मत चोरीच्या कटावर जनजागृती करणे हा होता.

या आंदोलनात युवक काँग्रेस आणि एन.एस.यू.आय.च्या सर्व पदाधिकारी व कार्यकत्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) बसेसवर 'वोट चोर खुर्चीं छोड', 'स्टॉप बोट चोरी', आणि देश का नेता कैसा हो, राहल गांधी जैसा हो असे स्टिकर लावण्यात आले. यासह, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पोस्टर असलेल्या बसेस बरही स्टिकर चिकटविण्यात आले. यावेळी तीव्र नारेबाजी करण्यात आली. हे आंदोलन वोटर अधिकार यात्रा या देशव्यापी मोहिमेचा एक भाग आहे, ज्यामध्ये राहुल गांधी आणि इतर काँग्रेस नेत्यांनी निवडणूक आयोगाच्या कथित पक्ष पातीपणा विरोधात आवाज उठवला आहे. बिहार, कर्नाटक, महाराष्ट्र आणि हरियाणामधील मतदार यादीतील अनियमित तांवर लक्ष केंद्रित करून, काँग्रेसने एक वेबसाइट सुरू केली आहे, ज्याडले नागरिक 'वोट चोरी' विरोधात नोंदणी करू शकतात आणि डिजिटल मतदार यादी सार्वजनिक करण्याची मागणी करू शकतात, वोट घोर खुर्ची छोड आंदोलन हा लोकशाहीच्या रक्षणासाठी आणि निवडणूक प्रक्रियेत पारदर्शिता सुनिश्चित करण्यासाठी युवक काँग्रेसचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली, काँग्रेस पक्ष आणि त्यांचे सहकारी पक्ष निवडणूक आयोगावर दबाव वाढवत आहेत, जेणेकरून मतदार यादीतील कथित अनियमिततांवर कारवाई होईल, भविष्यात वोट चोरी रोखली जाईल. अमरावलीतील हे आंदोलन हा या लढ्याचा एक भाग आहे. ज्यामुळे स्थानिक पातळीवर जनजागृती झाली पाहिजे आणि लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहन मिळेल. यावेळी निलेश गुहे, संकेत कुलट, वैभव देशमुख, नितीन काळे, निलेश वानखडे, पंकज मांडले, स्वप्नील साव, विशाल वानखडे, शिवानी पाटील, मयूर निंभोरकर, शुभम बांबल, सुमित मानकर, मयुर गोरखेडे, अजिंक्य धवने, अमित गुडघे, बंटी टाक, अंकुश ठाकूर, स्वराज पोटे, अनिकेत भोसले आदी उपस्थित होते.

अजिंक्य भारत
आपलं यवतमाळ
सोमवार, दि. १ सप्टेंबर २०२५ www.ajinkyabharat.com



## महालक्ष्मी पूजन



अविनाश विश्वनाथ सोनोने (वर्ष ७६ वे)
रा. वासवी नगर आर्णी...



प्रकाश तुकाराम अंदुरे (वर्षे १२५ वे)
रा. जुनीवस्ती आर्णी...



रवींद्र किसनराव बुटले (वर्ष ५२ वे)
रा. देऊरवाडी (बुटले) ता. आर्णी.



कोटंबा येथील प्रमोद विठ्ठलराव शिरभाते यांनी १०३ वर्षांची अखंडित परंपरा जपत, घरातच महालक्ष्मी पूजनाचा भव्य सोहळा मोठ्या भक्तिभावाने साजरा केला.



दारव्हा : तालुक्यातील बोरी (चंद्रशेखर) येथील सुंदर कांड मंडळ अनेक वर्षांपासून महालक्ष्मी पूजनानिमित्त घरोघरी १६ प्रकारच्या भाज्या व केळीची पाने पोहोचविण्याचा अनोखा सेवाधर्म जपत आहे. या कौतुकास्पद उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे. (छाया : आशीष सावंकार)

# उपजिल्हा रुग्णालयाला समस्यांचा विळखा

## अखेर पालकमंत्र्यांनी घेतला आढावा; नागरिकांच्या तक्रारींची दखल; आरोग्य यंत्रणेला सुधारणेचे निर्देश

**आशीष सावंकार**



**दारव्हा, दि.३१:** येथील उपजिल्हा रुग्णालयातील सोयी-सुविधांचा बोजवारा उडाल्याच्या आणि रुग्णांना योग्य उपचार मिळत नसल्याच्या वाढत्या तक्रारींची गंभीर दखल घेत, जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी शुक्रवारी (दि. २९) सायंकाळी रुग्णालयात एका उच्चस्तरीय आढावा बैठकीचे आयोजन केले. या बैठकीत त्यांनी रुग्णालयातील प्रत्येक विभागाच्या समस्या जाणून घेत, आरोग्य यंत्रणेला रुग्णसेवेचा दर्जा सुधारण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश दिले. या बैठकीमुळे आतातरी रुग्णालयाचा कारभार सुधारेल, अशी आशा निर्माण झाली आहे.

नागरिकांना उत्तम आणि प्रभावी आरोग्यसेवा मिळावी, या उद्देशाने आयोजित या बैठकीत पालकमंत्री संजय राठोड यांनी रुग्णालयातील अनेक त्रुटींवर बोट ठेवले. त्यांनी सांगितले की, रुग्णालयातील कर्मचारी आणि डॉक्टरांनी रुग्णांशी सौजन्याने वागून त्यांना तत्परतेने सेवा दिली पाहिजे. रुग्णालयातील सेवा-सुविधांचा सविस्तर आढावा घेताना त्यांनी अनेक सकारात्मक उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेतला. या बैठकीला अकोला आरोग्य मंडळाचे उपसंचालक डॉ. सुशीलकुमार वाघमारे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांसारखे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यांच्यासोबत उपविभागीय अधिकारी विजय सूर्यवंशी, तहसीलदार रवी काळे, मुख्याधिकारी विठ्ठल केदारे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेश मनवर, निवासी आरोग्य अधिकारी रमेश मांडण, पोलिस निरीक्षक शिवप्रकाश मुळे, गटविकास अधिकारी राजीव शिंदे, शिवसेना जिल्हाप्रमुख यशवंत पवार आणि तालुकाप्रमुख मनोज सिंगी यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

### धूळखात पडलेले ट्रॉमा केअर सेंटर

■ दारव्हा उपजिल्हा रुग्णालयातील ट्रॉमा केअर सेंटरची इमारत अनेक वर्षांपासून तयार असूनही, ती केवळ धूळ खात पडून आहे. राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांच्या रुग्णांसाठी ही सुविधा जीवनदायी ठरू शकते. मात्र, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे ती सुरू होऊ शकली नाही. या बैठकीत पालकमंत्री संजय राठोड यांनी ही बाब गांभीर्याने घेत, हे सेंटर तात्काळ सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता अपघातग्रस्तांना वेळेवर उपचार मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांची फौज झाली हजर!

■ रुग्णालयाच्या कारभाराचे गांभीर्य लक्षात घेऊन पालकमंत्र्यांनी बोलावलेल्या या बैठकीला संपूर्ण जिल्हा आणि स्थानिक प्रशासनातील अधिकाऱ्यांची फौज हजर होती. आरोग्य विभागाचे उपसंचालक, जिल्हा शल्यचिकित्सक, डीएचओ यांच्यापासून ते एसडीओ, तहसीलदार, मुख्याधिकारी आणि पोलिस निरीक्षकांपर्यंत सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते. या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे बैठकीतील निर्णयांना अधिक वजन प्राप्त झाले असून, त्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रशासनावर दबाव निर्माण झाला आहे.

या सर्वसमावेशक बैठकीमुळे रुग्णालयाच्या समस्या मुळापासून सोडविण्यासाठी मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## अतिवृष्टीने पिकांचे नुकसान

**राळेगाव, दि. ३१ :** तालुक्यातील वडकी परिसरात अतिवृष्टीने शेती, घरे आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर, स्थानिक शेतकरी शंकर वरघट यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून पंचनामे करून मदतीची मागणी केली आहे. हे पत्र राळेगावच्या उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत पाठवण्यात आले आहे. यावेळी यश ढोकणे, गौरव राऊत, अक्षय परिसे, स्वप्निल नेहारे, सुहास उमाटे, राज नागपुरे, अंकित चौधरी, मोहित भोयर, सुमित धोटे, सुरज माणेकर, नीलेश चौधरी, रोशन पयधन, करण आमटे, अमर ढोक, सचिन आत्राम, करण नेहारे, अमर कांबळे, दर्शन पाडवार, गणेश शेंडे, सुजल कुळसंगे, अमर मेश्राम, करण मेश्राम आदी उपस्थित होते.

## शासनाच्या योजना अल्पसंख्याक बांधवांपर्यंत पोहोचवा

### महेबुब शेख : सर्वधर्म समभावाचा संदेश देत भाजपाचा संवाद दौरा

**यवतमाळ, दि. ३१, प्रतिनिधी**



केंद्र आणि राज्य सरकार सर्वधर्म समभावाची भावना ठेवून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शासकीय योजना पोहोचविण्यासाठी कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन भाजपा अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाध्यक्ष महेबुब शेख मस्तान यांनी केले. जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल चव्हाण यांच्या निर्देशानुसार आयोजित संघटनात्मक संवाद दौऱ्यात ते बोलत होते.

गुरुवारी (दि. २८) त्यांनी जिल्ह्यातील आर्णी, यवतमाळ, कळंब, राळेगाव आणि बाभुळगाव या पाच तालुक्यांचा दौरा करून अल्पसंख्याक आघाडीच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती अल्पसंख्याक बांधवांपर्यंत पोहोचविण्याचे आणि त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले. या दौऱ्यात भाजपाचे माजी जिल्हा सचिव राहुल सोयाम यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती. सर्व तालुक्यांमध्ये कार्यकर्त्यांनी महेबुब शेख यांचे उत्साहात स्वागत केले. आगामी काळात अधिकाधिक अल्पसंख्याक बांधवांना पक्षाशी जोडून संघटना मजबूत करावी, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. या दौऱ्यामुळे कार्यकर्त्यांशी सकारात्मक चर्चा झाली आणि शासनाच्या सर्वसमावेशक धोरणांबद्दल जनजागृती करण्यास मदत झाली. हा दौरा यशस्वी झाल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.

## मनोरुग्णाने फोडले आलिशान थार वाहन

**वणी, दि. ३१ प्रतिनिधी**



शहरातील टिळक चौकात एका मनोरुग्णाने भरदिवसा हैदोस घालत नागपूर येथील एका वकिलाच्या थार गाडीची तोडफोड केली. या घटनेने परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण पसरले होते. पोलिसांनी अखेर त्या मनोरुग्णाला ताब्यात घेतले आहे. मात्र, त्याने यापूर्वीही हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नागपूर येथील ॲड. अभिषेक ढोबळे कामानिमित्त वणीत आले होते. त्यांनी आपली थार गाडी (क्र. एमएच-३१-एफयू-९५९७) टिळक चौकात उभी केली. दुपारी एक वाजताच्या सुमारास, एका मनोरुग्णाने दगडाने हल्ला करत गाडीची समोरील आणि चालकाच्या बाजूची काच फोडली. यात त्यांचे सुमारे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले. या प्रकारामुळे नागरिक भयभीत झाले. याच व्यक्तीने काही दिवसांपूर्वी एका महिला वाहतूक कर्मचाऱ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता, त्यावेळी पोलिसांनी कारवाई करणे टाळले होते.

## राजूर कॉलनीतील अवैध धंद्यांविरोधात मनसे आक्रमक

**वणी, दि. ३१ प्रतिनिधी**



तालुक्यातील राजूर कॉलनीमध्ये सुरू असलेल्या अवैध धंद्यांमुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडले आहे. यावर कठोर कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने वणी पोलिसांना दोन दिवसांचा अल्टिमेटम दिला असून, कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

वणीतील राजूर कॉलनी परिसर अवैध धंद्यांमुळे चर्चेत आला आहे. 'वरली मटका'सारख्या धंद्यांमुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत असून, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. या गंभीर परिस्थितीची दखल घेत मनसेचे तालुका अध्यक्ष फाल्गुन गोहोकार यांनी वणी पोलिसांना निवेदन सादर केले. या अवैध धंदे चालकांकडून राजकीय व पत्रकारितेच्या नावाखाली पोलिसांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. त्यामुळे पोलिस कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याचा संशय व्यक्त होत आहे. जर यावर ठोस पाऊले उचलली नाहीत, तर राजूरचे सामाजिक सलोखा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी मनसे शांत बसणार नाही, असा इशारा फाल्गुन गोहोकार यांनी दिला आहे. निवेदन देताना शंकर बोरगलवार, सोमेश्वर ढवस, उमेश नवले, प्रवीण दुमोरे, मयुर घाटोळे, भोला चिकणकर, लकी उपरे, सूरज काकडे, धीरज बगवा, उमेश सातपुते, अमोल पारखी, मारोती सातपुते, बाळू सोनटक्के आणि अमोल राजुरकर यांच्यासह अन्य महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते. पोलिस आता यावर काय कारवाई करतात, याकडे राजूरमधील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## पत्रकाराचा वाढदिवस ठरला पर्यावरणपूरक

### शाळेच्या आवारात लावली झाडे; मनोज माघाडे यांना वृक्षारोपणाने शुभेच्छा



**आर्णी, दि.३१ प्रतिनिधी**

आर्णी पत्रकार संघाने दैनिक 'अजिंक्य भारत'चे विशेष प्रतिनिधी तथा पत्रकार संघाचे सदस्य मनोज माघाडे यांचा ३५ वा वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा केला. रविवारी (दि. ३१) बाबा कंबलपोस उर्दू शाळेत मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून माघाडे यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष युनूस शेख व अंजली ड्रेसेसचे संचालक राजेश श्रीवास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पत्रकार संघाने आयोजिलेल्या या पर्यावरणपूरक उपक्रमामुळे वाढदिवस साजरा करण्याची एक नवी, सकारात्मक पद्धत रुजू होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी आर्णी पत्रकार संघाचे सल्लागार प्रमुख प्रमोद कुदळे, अध्यक्ष आबिद फानन, प्रसाद जाधव, नौशाद अली, जफर पठाण, सचिन शिंदे, पूजा ढाले, रंजना आडे, विनोद सोयाम, परवेज बेग मिर्झा, जाकीर सोलंकी, रशीद मलनस, आरिफ पठाण, कादीर मलनस, राहुल वानखडे, मुरली राठोड आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

# चमत्कार नव्हे, ध्यानाच्या सामर्थ्यानेच घडले 'हॉकीचे जादूगार'

## डॉ. विजय माने : अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयात क्रीडा दिन उत्साहात, विद्यार्थ्यांनी गाजवले मैदान

**यवतमाळ, दि. ३१ प्रतिनिधी**

**हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या खेळातील जादू हा कोणताही चमत्कार नसून, ती त्यांच्या ध्यान, साधना आणि अफाट मनोएकाग्रतेतून प्रकट झालेली उर्जा होती. आजच्या पिढीने कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी त्यांच्या याच एकाग्रतेचा वारसा अंगीकारला पाहिजे, असे प्रेरणादायी प्रतिपादन शासकीय अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजय माने यांनी केले. मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात आयोजित 'राष्ट्रीय क्रीडा दिन' कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या कार्यक्रमाने मेजर ध्यानचंद यांच्या स्मृतींना उजाळा दिला आणि विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना प्रोत्साहन दिले.**




कार्यक्रमाची सुरुवात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी अध्यक्षीय भाषणात डॉ. विजय माने यांनी ध्यानचंद यांच्या जीवनातील अनेक अज्ञात पैलूंवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, विज्ञानही हेच सांगते की, मन केंद्रित केल्यास मानवी कार्यक्षमता अनेक पटींनी वाढते. योगशास्त्र आणि न्यूरोसायन्स यांचा संगम ध्यानचंद यांच्या व्यक्तिमत्वात दिसतो. त्यांनी विद्यार्थ्यांना खेळ, शिक्षण किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात प्रगती करण्यासाठी ध्यान आणि एकाग्रतेचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमाला डॉ. जयश्री उघाडे, डॉ. आनंद भुसारी, डॉ. थोरात, डॉ. सांगळे, प्रा. सावळे, प्रा. नाकाडे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार संचालन विद्यार्थिनी प्रगती पुडे हिने केले. या निमित्ताने महाविद्यालयाच्या पटांगणावर विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बुद्धिबळ यांसारख्या खेळांसोबतच रस्सीखेच आणि लगोरी या देशी खेळांचाही समावेश होता. १०० आणि २०० मीटर धावण्याच्या स्पर्धांनी विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह संचारला होता. दिवसभर चाललेल्या या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत क्रिडा दिनाचा आनंद लुटला.

### हिटलरलाही दिला होता नकार!

■ सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजय माने यांनी आपल्या भाषणात मेजर ध्यानचंद यांच्या देशभक्तीचा एक महत्वाचा किस्सा सांगितला. बर्लिन ऑलिम्पिकमधील ध्यानचंद यांचा अद्भुत खेळ पाहून जर्मनीचा हुकूमशहा अडॉल्फ हिटलर इतका प्रभावित झाला होता की, त्याने ध्यानचंद यांना जर्मनीच्या सैन्यात मोठे पद आणि नागरिकत्वाची ऑफर दिली होती. मात्र, ध्यानचंद यांनी ती ऑफर स्वाभिमानाने नाकारत, भारत माझा देश आहे आणि मी शेवटपर्यंत भारतासाठीच खेळणार, असे बाणेदार उत्तर दिले होते.

# चालगणी ग्रामसभेत ग्रामस्थांचा एल्गार

## ग्रामसेवकाच्या मनमानी कारभारावर प्रश्नांचा भडिमार; उत्तरे देण्यास टाळाटाळ केल्याने अखेर ग्रामसभाच रद्द

**उमरखेड, दि.३१ प्रतिनिधी**



येथील पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या चालगणी ग्रामपंचायतीची ग्रामसभा ग्रामसेवक आणि ग्रामस्थ यांच्यातील वादामुळे चांगलीच गाजली. विविध विकासकामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करीत ग्रामस्थांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यास ग्रामसेवक ए. के. सुरवसे यांनी टाळाटाळ केली. केवळ कागदोपत्री सभा पूर्ण दाखवून वेळमारून नेण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मात्र, जागरूक ग्रामस्थांनी 'आधी प्रश्नांची उत्तरे द्या, मगच कोरम रजिस्टरवर सह्या करू,' अशी ठाम भूमिका घेतल्याने ग्रामसेवकांची चांगलीच भंबेरी उडाली. अखेरीस, ग्रामस्थांनी सह्या करण्यास नकार दिल्याने कोरम पूर्ण न झाल्यामुळे शनिवारी (दि. ३०) आयोजित करण्यात आलेली ही ग्रामसभा रद्द करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवली.

चालगणी ग्रामपंचायतीची ग्रामसभा शनिवारी आयोजित करण्यात आली होती. सभेच्या सुरवातीपासूनच ग्रामस्थ आक्रमक पवित्र्यात होते. त्यांनी गावातील विविध विकासकामांच्या दर्जावर आणि खर्चावर प्रश्न उपस्थित करण्यास सुरवात केली. मात्र, ग्रामसेवक ए. के. सुरवसे यांनी मूळ मुद्यांना बगल देत वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. त्यांचा हा डाव लक्षात येताच उपस्थित ग्रामस्थांनी प्रश्नांचा भडिमार सुरू केला. 'आम्ही विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिल्याशिवाय कोणीही कोरम रजिस्टरवर सही करणार नाही,' असा एकमुखी निर्णय ग्रामस्थांनी घेतला. अचानक झालेल्या या विरोधाने ग्रामसेवक गोंधळून गेले. त्यांच्याकडे अनेक प्रश्नांची उत्तरेच नसल्याने ते निरुत्तर झाले. ग्रामस्थांच्या या अनोख्या आंदोलनामुळे कागदोपत्री सभा गुंडाळण्याचा ग्रामसेवकांचा प्रयत्न फसला. उपस्थितांनी सह्याच न केल्याने सभेचा कोरम अपूर्ण राहिला आणि ग्रामसेवकाच्या आडमुठेपणामुळे अखेर सभा रद्द झाल्याचे जाहीर करण्यात आले. या प्रकारामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारातील त्रुटी आणि अधिकाऱ्यांचा मनमानीपणा पुन्हा एकदा समोर आला आहे. ग्रामस्थांनी सभेत केवळ प्रश्नच विचारले नाहीत, तर गंभीर आरोपही केले. गावातील मागासवस्तीतील विकासकामांमध्ये मोठा गैरप्रकार झाल्याचा आरोप त्यांनी केला. निकृष्ट दर्जाचे रस्ते आणि नाली बांधकाम, तसेच अशुद्ध पाणीपुरवठा यांसारख्या समस्या त्यांनी मांडल्या. या कामांवर खर्च झालेल्या निधीचा हिशोब देण्याची मागणीही त्यांनी केली. या आरोपांमुळे ग्रामपंचायतीच्या आर्थिक कारभारावरच संशय निर्माण झाला असून, चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे. येथे कार्यरत ग्रामसेवक ए .के. सुरवसे हे गेल्या अनेक वर्षांपासून चालगणी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे साहजिकच त्यांचे गावातील राजकीय लोकांसोबत संबंध वाढले. त्यामुळे ते राजकीय लोकांच्या मर्जीतील लोकांनाच विविध शासनाच्या योजनांचा फायदा पोहोचवित असल्याचा आरोपदेखील यावेळी करण्यात आला.

### पंचनाम्यातही दुजाभावाचा आरोप

**तालुक्यात १५ ऑगस्ट ते २० ऑगस्टदरम्यान जोरदार झालेल्या अतिवृष्टीमुळे व पूर परिस्थितीमुळे काही नागरिकांच्या घरात पुराचे पाणी घुसले होते, तर काहींच्या घराच्या भिंती पडल्या होत्या. या बाबीचा पंचनामा करताना संबंधित ग्रामसेवकांनी दुजाभाव करीत मर्जीतील लोकांची नावे या यादीत समाविष्ट केली असून या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी यावेळी ग्रामस्थांनी केली आहे.**

## गणेशोत्सव-२०२५



**श्री बाल गणेश उत्सव मंडळ, ओम सोसायटी, यवतमाळ**
**अध्यक्ष : तनिष्क जयस्वाल, उपाध्यक्ष : प्रथमेश पाटील, सचिव : सुपर्ण कोल्हेकर**

१९२५ पासून विश्वास हिच प्रतिष्ठा.....
विष्णू जगन्नाथ भालेराव
मेन रोड, सराफा बाजार, यवतमाळ.
फोन : ०७२३२ - २४४७००
8928 444 700, Mob. 9767244700
आता घर बसल्या सोन्यामध्ये गुंतवणूक करणे सहज शक्य
VJB Gold App Playstore व Appstore वरून डाऊनलोड करा.

## महत्वाचे

### शेतकऱ्याची आत्महत्या



**यवतमाळ :** कर्जबाजारीपणा आणि नापिकीला कंटाळून तालुक्यातील बोथबोडन येथील शेतकरी प्रेम हरी जाधव (वय ४५) यांनी रविवारी सकाळी कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केली. त्यांच्यावर बँकेचे व खाजगी असे लाखोंचे कर्ज होते. त्यातच सोयाबीनचे पीक व्हायरसमुळे उद्ध्वस्त झाल्याने ते पूर्णपणे खचले होते. विशेष म्हणजे, २००९ मध्ये त्यांच्या वडिलांनीही आत्महत्या केली होती. त्यांच्या या टोकाच्या पावलामुळे गावात हळहळ व्यक्त होत असून, शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले व दोन मुली असा परिवार आहे. या भागातील ही ३० वी शेतकरी आत्महत्या आहे.

### साहित्य लंपास

**पांढरकवडा :** गोडावूनमधील साहित्य लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी सिंघानिया ले-आऊट माऊली हॉटेल समोरील असलेल्या गोडाऊनचा कुलुप कोंडा तोडून आत प्रवेश करून बोरींगचे पाईप १० नग, कपलिंग १० नग, टिलु पंप, कुलरचे मोटार, फवारनी पंपचे बॅट्या २ नग, लोखंडी साखळ्या, सिलिंग फॅन ४ नग तसेच इसतर साहीत्य अज्ञात चोरट्याने लंपास केले. याप्रकरणी सुनिल श्रीधर जोशी यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

# ग्राम सफाईनंतर अंधश्रद्धेला मूठमाती देत स्मशानभूमीतच ग्रामसभा

## पाथ्रड (गोळे) या गावाचा इतर गावांपुढे आदर्श, तंटामुक्त समितीच्या अध्यक्षांची निवड

**उमेश इंगोले**




**नेर (परसोपंत), दि.३१ :** तालुक्यातील आदर्श गाव म्हणून ओळख असलेल्या पाथ्रड (गोळे) येथे ग्रामसफाईनंतर आदर्श ग्रामसभा पार पडली. ही ग्रामसभा चक्क स्मशान भूमीतच पार पडली. अंधश्रद्धेला मूठमाती देण्याकरिता इतर गावांसमोर आदर्श उभा केला आहे. ही ग्रामसभा तालुक्यात चर्चेचा विषय झाली आहे.

ग्रामसभा सुरू होण्यापूर्वी गावात आणि स्मशानभूमीत साफसफाई करण्यात ग्रामस्थांनी पुढाकार घेतला. तसे बघितले तर स्मशानभूमी हे वैराग्याचे ठिकाण आहे. या ठिकाणी भांडण-तंटा करण्याच्या भानगडीत फारस कोणी पडत नाही. नेमकी हीच बाब हेरून सरपंच नीलिमा रोशन चोपडे यांनी स्मशानभूमी येथे ग्राम सभेचे आयोजन करून ग्राम सभेतील वादविवाद, तंटा याला पूर्णविराम देत अंधश्रद्धेला मूठमाती देण्याचा प्रयत्न केला आणि ग्राम सफाई केल्याने खऱ्या अर्थाने ही ग्रामसभा आदर्श ठरली आहे. या ग्रामसभेमध्ये कर वसुली, कर भरणे, स्मार्ट ग्राम पुरस्कार यामध्ये भाग घेणे, माझी वसुंधरा योजना, घरकुल योजना, सौर ऊर्जा योजना. मनरेगा अंतर्गत कामे करणे आणि तंटामुक्त समितीची निवड करणे इत्यादी विषयावर चर्चा झाली. या ग्रामसभेत तटामुक्त समितीचे अध्यक्ष म्हणून अनिल चव्हाण यांची निवड करण्यात आली. तर, उपाध्यक्ष म्हणून बाबूजी गोळे यांची निवड एकमताने करण्यात आली. यावेळी या मंचावर सरपंच नीलिमा रोशन चोपडे, उपसरपंच रजनी खडसे, ग्राम पंचायत सदस्य प्रीतम गावंडे, नितीन चहांदे, आकाश तोंडेरे, रामहरी कोळवते, हर्षदा गावंडे, पंजाबराव खडसे, पोलिस पाटील प्रफुल्ल नेरकर, उमेश गोळे, रवी मानव, ग्रामसेवक अमोल घावडे, रोशन चोपडे, अतुल उडाखे, उमेश गोळे, गुणवंत चोपडे, निकिता कुर्‍हाटकर, उमेद ग्राम संघ, रेखा चव्हाण माहीम ग्राम संघ, महानंदा ढोकं (कृषी सखी), देवानंद गायनर, श्रीधंर घोडे. दुर्गेश नेरकर, नरेंद्र गायनर, यांचेसह गावातील पुरुष, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सभेच्या यशस्वितेकरिता ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

> **मृत्यू हे जीवनातील अंतिम सत्य आहे. स्मशानभूमी हे वैराग्याचे ठिकाण आहे. या ठिकाणी कोणीही वादविवाद, भांडण करण्याच्या भानगडीत पडत नाही. स्मशानभूमीबद्दल असलेली भीती, अंधश्रद्धांना मानवी मनातून नाहीसे करणे, स्मशानभूमी हा गावाचाच भाग आहे. ग्रामसफाईमधून आदर्श ठेवत, गावाच्या विकासाकरिता तंटामुक्ती समिती निवड बिनविरोध व्हावी, या उद्देशाने ग्रामसभा स्मशानभूमीत घेण्यात आली.**
>
> -नीलिमा चोपडे, सरपंच, पाथ्रड (गोळे) ता. नेर.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्याला २० वर्षे कारावास

## पांढरकवडा सत्र न्यायालयाचा निकाल

**पांढरकवडा, दि. ३१ प्रतिनिधी**



केळापूर तालुक्यातील मोरवा येथे अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम पंकज अशोक पेंदोर याला पांढरकवडा येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. न्यायाधीश अभिजीत देशमुख यांनी रविवारी (दि. ३१) हा निकाल दिला असून, आरोपीला १५ हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

१९ मार्च २०२३ रोजी पंकज पेंदोर याने पीडितेला तिच्या घराच्या अंगणातून उचलून नेत बाजूच्या शेतात तिच्यावर अत्याचार केला होता. कुटुंबीयांनी शोध घेतला असता तो रंगेहाथ सापडला. मात्र, त्याने घटनास्थळावरून पळ काढला. पीडितेच्या तक्रारीनंतर पोलिस उपनिरीक्षक अंजली कानबाळे यांनी तपास करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. सहा साक्षीदारांची साक्ष आणि पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविले. सरकार पक्षाकडून अतिरिक्त शासकीय अभियोक्ता प्रशांत मानकर यांनी, तर बचाव पक्षाकडून अ‍ॅड. एम.

# पुसदमध्ये दोन किलो गांजासह तिघे जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, सव्वा लाखांचा माल जप्त

**पुसद, दि. ३१ प्रतिनिधी**



जिल्ह्यात अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या पोलिस अधीक्षकांच्या आदेशानंतर, स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. पुसदमध्ये गांजा विक्रीसाठी जमलेल्या तिघांच्या मुसक्या आवळण्यात आल्या असून, त्यांच्याकडून तब्बल दोन किलोपेक्षा जास्त गांजा आणि सव्वा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईने अंमली पदार्थ विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाईचे आदेश देताच, स्थानिक गुन्हे शाखेची पथके सक्रिय झाली होती. शनिवारी (दि. ३०) पुसद येथील गुन्हे शाखा पथकाला त्यांच्या गुप्त खबऱ्याकडून एक पक्की माहिती मिळाली. के. डीं. जाधव तांड्याजवळ काही इसम गांजा विक्रीच्या तयारीत असल्याची ती खबर होती. क्षणाचाही विलंब न लावता, पथकाने वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन सापळा रचला. ठरलेल्या ठिकाणी पल्सर मोटारसायकलवरून आलेल्या तीन संशयितांना पोलिसांनी घेरले. गुलजमान ऊर्फ भुऱ्या खान अलीयार खान (४५), शेख फिरोज शेख समशेर कुरेशी (४५) आणि सैफअली खान सफीउल्ला खान (२६) असे त्यांची नावे आहेत. त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्यांची झडती घेतली. मोटारसायकलवरील एका गुलाबी पिशवीत दोन किलो १७६ ग्रॅम गांजा लपवून ठेवल्याचे उघड झाले. पोलिसांनी तात्काळ तिघांनाही ताब्यात घेतले आणि त्यांच्याकडून गांजा, मोटारसायकल, मोबाईल असा एकूण एक ६४ हजार १२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या तिघांविरुद्ध पुसद शहर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दिग्रस महालक्ष्मी दर्शन



दिलीप जगन्नाथ सिंगदकर रा. श्रीदुर्गामाता चौक, दिग्रस
वर्ष १०७ वे



एकनाथ दत्तुजी बदुकले रा. श्रीदुर्गामाता चौक, दिग्रस
वर्ष - १०८ वर्ष



किसन तुकाराम दुधे, मोठा मारोती मंदिराजवळ, दिग्रस
वर्ष- ३६ वे



गणेश पांडुरंग करोडदेव रा. गांधीनगर, दिग्रस
वर्ष - ६१ वे

# चौथीतील शिवांशने बाप्पासाठी रंगविले १८३ देशांचे झेंडे

## उबंटु स्कूलच्या चिमुकल्याची अनोखी गणेशभक्ती, ज्ञानाची आवड आणि सर्जनशीलतेचा मिलाफ

**यवतमाळ, दि. ३१ | प्रसाद नायगावकर**

**एकीकडे वयाची नऊ वर्षे पूर्ण केलेली मुले जिथे खेळण्यांच्या आणि गोष्टींच्या विश्वात रमलेली असतात, तिथे शहरातील एका चिमुकल्याने जगातील देश, त्यांची संस्कृती आणि राष्ट्रीय ध्वज यांच्याबद्दलच्या आपल्या आवडीला गणेशोत्सवाच्या सजावटीचे माध्यम बनवले आहे. उबंटू इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता चौथीत शिकणाऱ्या शिवांश आगाशे नावाच्या या विद्यार्थ्याने यंदाच्या गणेशोत्सवात आपल्या घरच्या बाप्पासाठी तब्बल १८३ देशांचे झेंडे स्वतःच्या हाताने रंगवून एक आगळीवेगळी आरास तयार केली आहे. त्याच्या या अनोख्या कल्पकतेचे आणि ज्ञानाचे सर्वत्र कौतुक होत आहे.**



शिवांशची ही कामगिरी केवळ सजावटीपुरती मर्यादित नाही, तर ती त्याच्या विलक्षण स्मरणशक्तीची आणि जिज्ञासू वृत्तीचीदेखील साक्ष देते. तो केवळ झेंडे रंगवून थांबला नाही, तर तो प्रत्येक झेंडा अचूक ओळखतो आणि त्या देशाबद्दलची रंजक माहितीही आत्मविश्वासाने सांगतो. त्याच्या या कौशल्याने त्याचे कुटुंबीय आणि शिक्षकही अचंबित झाले आहेत. यंदा गणेशोत्सवात आपल्या लाडक्या बाप्पासाठी काय वेगळे करायचे, या विचारातून त्याला ही कल्पना सुचली. त्याने अनेक दिवस मेहनत घेऊन, प्रत्येक देशाच्या झेंड्याचा बारकाईने अभ्यास करून ते कागदावर उतरवले आणि रंगवले. या सजावटीमुळे त्याच्या घरातील गणेश मंडप हा जणू काही 'विश्व दरबार' बनला आहे, जिथे बाप्पाच्या साक्षीने संपूर्ण जग एकत्र आल्याचा भास होतो. शिवांशच्या या प्रयत्नामुळे उत्सव आणि शिक्षण यांचा सुंदर मिलाफ कसा साधता येतो, याचे उत्तम उदाहरण त्याने समाजासमोर ठेवले आहे. त्याच्या या कामगिरीमुळे उबंटू इंग्लिश स्कूलच्या शिरपेचातही एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. शाळेने त्याच्या या अद्वितीय कामगिरीबद्दल त्याचे विशेष अभिनंदन केले आहे. शिवांशच्या या अनोख्या कामगिरीवर त्याच्या शाळेने कौतुकाचा वर्षाव केला आहे. शाळेच्या प्रतिनिधींनी सांगितले की, प्रत्येक मुलामध्ये स्वतःला व्यक्त करण्याची एक वेगळी पद्धत असते. शिवांशने भक्ती, सर्जनशीलता आणि ज्ञानाची आवड यांचा सुरेख संगम साधला आहे. यातून हेच सिद्ध होते की, शिक्षण केवळ वर्गखोल्यांपुरते मर्यादित नसून ते सण, कला आणि श्रद्धेच्या माध्यमातूनही तितकेच प्रभावीपणे प्रकट होऊ शकते.

### बाप्पाच्या मंडपात 'वसुधैव कुटुंबकम'

**शिवांशने तयार केलेल्या १८३ देशांच्या झेंड्यांच्या आरासमुळे त्याच्या घरातील गणेशोत्सवाला एक वैश्विक स्वरूप प्राप्त झाले आहे. या सजावटीतून गणपती बाप्पाच्या साक्षीने संपूर्ण जगाला एकाच चौकटीत पाहण्याचा अनुभव मिळतो. नकळतपणे का होईना, त्याच्या या कल्पनेतून 'वसुधैव कुटुंबकम म्हणजेच 'संपूर्ण विश्व हे एक कुटुंब आहे' या भारतीय संस्कृतीतील उदात्त विचाराचे प्रतिबिंब उमटले आहे. ही सजावट केवळ एक कलाकृती न राहता, ती जागतिक एकात्मतेचा संदेश देणारी ठरली आहे.**